पाक्षिक

समाज आणि राष्ट्राच्या नवचरनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ । अंक २४ वा । मूल्य : रु. ३० । दिनांक : १ ते १५ ऑगस्ट २०२२

## स्वातंत्र्य



## फुले आणि काटे



या अंकात

डॉ. रावसाहेब कसबे

शेषराव चव्हाण

यशवंत मनोहर

डॉ. सुखदेव थोरात

बी.जी. वाघ

प्रो. विमल थोरात

जयदेव डोळे

विजय नाईक

बी.व्ही. जोंधळे

प्रा. डॉ. शशिकांत पाटील

आज–कालचे प्रश्न



पाक्षिक
# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ ।
अंक २४ । मूल्य : रु. ३० । दिनांक : १ ते १५ ऑगस्ट २०२२

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com
(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकूर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.

**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट
8888541822

● **जाहिरात विभाग संपर्क**
९८२११४५४०९ / ८८०५१५१४५२

**अंकाची वार्षिक वर्गणी ६००/– रुपये फक्त**

● **द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्**
द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

**ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे**

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

**संपादकीय :** धावणाऱ्या स्वातंत्र्यातील रांगणारी समता – ३/ भारत प्रकाशाकडून अंधाराकडे – **डॉ. रावसाहेब कसबे** – ५ / डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दृष्टी, दूरदृष्टी आणि इशारे! – **शेषराव चव्हाण** – १२ / स्वातंत्र्याची पंचाहत्तरी आणि संविधानभारत! – **यशवंत मनोहर** – १५ / स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तर वर्षांनंतर दलित कुठे आहेत? – **डॉ. सुखदेव थोरात** – २० / भारताच्या स्वातंत्र्याचे भवितव्य – **बी.जी. वाघ** – २५ / भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव : भारतीय स्त्रीची प्रगती – **प्रो. विमल थोरात** – २९ / आझादी का अनृत उत्सव – **जयदेव डोळे** – ३२ / भारत वय वर्षे ७५ – **विजय नाईक** – ३६ / कुठे आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील सामाजिक स्वातंत्र्य? – **बी.व्ही. जोंधळे** – ४० / **ग्रंथ परिचय :** अण्णा सावंत यांचे 'फुलटायमर' म्हणजे कामगार चळवळीचा इतिहास – **प्रा. डॉ. शशिकांत पाटील** – ४३ /**आज–कालचे प्रश्न** – **पंक्चरवाला** – ४५

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए–४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय

# धावणाऱ्या स्वातंत्र्यातील रांगणारी समता

सर्वप्रथम पंचाहत्तरी पार करत असलेल्या स्वातंत्र्याला मानाचा मुजरा. या स्वातंत्र्यामुळे आपल्या सर्वांना स्वतंत्र देशातील एक स्वतंत्र नागरिक म्हणून आणि भारताला स्वतंत्र, स्वायत्त अशी ओळख प्राप्त झाली. सुमारे शंभर वर्षांच्या अथक संघर्षानंतर आणि अनेकांच्या बलिदानानंतर प्राप्त झालेले स्वातंत्र्य आपण जपून ठेवू शकलो. आपल्या बरोबर किंवा आगेमागे स्वतंत्र झालेल्या अनेक शेजारी राष्ट्रांत कधी-कधी हुकूमशाही, एकाधिकारशाहीने, धर्मवादाने आणि सत्तावादाने खो-खोचा खेळ मांडला. लोकांनी निवडून दिलेले नेते लष्कराच्या वर्दी आणि बंदुकीने हद्दपार केले. काहींना फासावर लटकवले गेले. लोकशाहीचा संकोच झाला किंवा तिची जागा अन्य कोणत्या तरी अनिष्ट गोष्टीने घेतली. भारतात असे घडले नाही, त्याला दोन कारणे होती. एक या सर्वांना पायबंद घालणारी भारतीय राज्यघटना आणि नागरिकांच्या मनात रुजू पाहणाऱ्या स्वातंत्र्य आणि लोकशाहीच्या भावना. याचा अर्थ आपल्या लोकशाहीवर, स्वायत्ततेवर कधी काळे ढग फिरकलेच नाहीत, असे नाही. आपल्या सीमांना कधी धोका पोहोचला नाही असे नाही; पण आपण त्यावर मात केली. अनेक शेजाऱ्यांशी लढून-लढून आपण आपल्या सीमा आणि देशाचे सार्वभौमत्व जपून ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यात आपल्याला यश आले आहे. आणीबाणीसह आपणही अनेक राजकीय संकटांना टक्कर दिली आहे. अनेक नैसर्गिक संकटांशी मुकाबला केला आहे. दुष्काळ, रोगराई, महापूर, भूकंप आदी अनेक नैसर्गिक शत्रूंशी लढून आपण पुरून उरलो आहोत. धरणे बांधण्यापासून ते चंद्रावर पाऊल ठेवण्यापर्यंत, अण्वस्त्र निर्मितीपासून ते अणुचाचणीपर्यंत, महामार्ग उभे करण्यापासून ते घरटी संडास उभा करण्यापर्यंत, नोबेल पुरस्कार जिंकण्यापासून ते आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली छबी निर्माण करण्यापर्यंत, आंतरराष्ट्रीय सत्तेचा तोल सांभाळण्यासाठी मदत करण्यापासून ते साक्षरतेचा अश्व पळवण्यापर्यंत अनेक गोष्टी आपल्याकडे घडवल्या, घडवल्या गेल्या. या सर्वांचे प्रेरणास्रोत असलेल्या संविधानाला आणि गांधी, नेहरू, आंबेडकरांच्या विचारांना आपण बऱ्यापैकी जपून ठेवले. राजस्थानातील सती प्रथा बंद करण्यापासून ते शाहबानो प्रकरणापर्यंत, राज्या-राज्यांतील बरेच वाद मिटवण्यापासून ते स्वतंत्र राज्ये निर्माण करण्यापर्यंत बरेच काही या स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांत आपण कमावले आहे, हे कोणालाच नाकारता येणार नाही. कृषी क्षेत्रात आपण हरित क्रांतीचा प्रयोग करण्याचा प्रयत्न केला. देशाच्या दोन पंतप्रधानांची आणि खुद्द राष्ट्रपित्याची हत्या होऊनही आपण न खचता स्वातंत्र्याचा हात हातात घेऊन चालत राहिलो. अनेक धार्मिक आणि जातीय दंगलीतील कत्तली पाहूनही धर्मनिरपेक्षतेचे गीत गात राहिलो. अजून किती तरी म्हणजे असंख्य गोष्टी आपल्याला स्वाभिमानाने नोंदवता येतील यासाठी वाव आहे. स्वतंत्र भारत, सार्वभौम भारत, धर्मनिरपेक्ष भारत, लोकशाही-समाजवादी भारत आणखी वेगवेगळ्या



वैभवशाली शब्दांत मांडता येणे कुणालाही शक्य आहे. स्वातंत्र्याच्या पंचाहत्तर पानांवर गौरवास्पद घटना आपल्याला पाहायला मिळतील. हा सर्व इतिहास स्वतंत्र भारताने लिहिला आहे. या सर्वांना आपण क्रांतिकारी भारत म्हणू शकतो. स्वातंत्र्य मिळवणे आणि ते इतकी वर्षे सुरक्षित ठेवणे यालाही क्रांती म्हणू शकतो.

बाबासाहेबांनी सांगितलेल्या क्रांती-प्रतिक्रांतीच्या सिद्धांतानुसार भारतात क्रांतीची जशी सुरुवात होत होती तशी त्याच वेळेला प्रतिक्रांतीच्या म्हणजे धर्मवादाचा आधार घेऊन वेद-पुराणे आणि स्मृतीच्या आधारे धर्मराष्ट्र बनवण्याचे प्रयत्नही चालू होते. स्वातंत्र्याच्या चळवळीबरोबरच त्यांचाही उदय झाला होता. यातील अनेक घटक मिळेल त्याठिकाणी जाऊन आपल्या मुठीतील प्रतिक्रांतीची स्वप्ने पकडून होते. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांच्या वाटचालीत तेही आपली स्वप्ने बाळगून होते. स्वातंत्र्य पन्नाशीच्या घरात पोहोचत असताना त्यांच्या स्वप्नांना अंकुर फुटत होते आणि

७५ व्या वर्षात त्यांना फुले आल्याचेही आपण पाहतो आहोत. गीता प्रेसपासून सुरू झालेला हा प्रवास २०२५ मध्ये हिंदू राष्ट्र येईल, अशी घोषणा करण्यापर्यंत पोहोचतो. हिंदू राष्ट्र म्हणजे हिंदूंचे राष्ट्र, असे जेव्हा सांगितले जाते तेव्हा त्याचा अर्थ अल्पसंख्याकांना दुय्यम ठरवण्याचा, दमन करण्याचा प्रयत्न, असाही होऊ शकतो. या सर्वांचा उच्चार आणि उल्लेख एवढ्याचसाठी करायचा, की संविधानाने दिलेले धर्मनिरपेक्षतेचे, समता, बंधुतेचे, समाजवादाचे, न्यायाचे आणि सामाजिक न्यायाचे आश्वासन नेमके कुठे आहे आणि त्याचे काय घडते आहे, हेही शोधण्याचा प्रयत्न करता येतो.

स्वातंत्र्याच्या काळात दरडोई उत्पन्न जसे वाढले तसे दरडोई कर्जही वाढले आहे. उत्पन्न वाढत जाणारा एक मूठभर उच्च मध्यम वर्ग तयार झाला. भांडवलशाहीने पूर्णपणे इथली व्यवस्था आपल्या पंजात घेतल्याच्या काळात श्रीमंत अधिक श्रीमंत आणि गरीब अधिक गरीब होत गेले. कोरोना महामारीच्या काळात ही गोष्ट आपण अधिक स्पष्टपणे पाहिली आहे. श्रीमंतांना विमानाद्वारे इंजेक्शन आणि गरीब कोणता तरी काढा पिऊन किंवा कोणत्या तरी अंधश्रद्धेला बळी ठरत जगण्याची लढाई लढत होते. एकीकडे मृतांवर सुरक्षितपणे अंत्यसंस्काराची सोय, तर दुसरीकडे गंगेच्या पात्रात तरंगणारी, रेल्वेच्या रुळावर दिसणारी बेवारस मढी, असे चित्रही आपण स्वातंत्र्याला पंचाहत्तरीच्या सुरू असलेल्या कळांच्या काळात आपण पाहिले आहे. एकीकडे दारिद्र्याची रेषा शेअर बाजार उसळावा तशी उसळत आहे, तर दुसरीकडे देशातील ऐंशी टक्के लोकांकडे जेवढी संपत्ती आहे तेवढी देशातील पाच-सहा धनिकांच्या मुठीत आहे. तेच 'कर लो दुनिया मुठ्ठी में' म्हणतात किंवा 'व्हाट ॲन आयडिया' तरी म्हणतात. समाजवादाचे, समतेचे आश्वासन देणाऱ्या देशातील हे चित्र आहे आणि समाजवाद संविधानामध्ये एक शोभेचा शब्द म्हणून घर करून बसलेला आपण पाहतोही आहोत. रोजीरोटीसाठी प्रचंड स्थलांतर सुरू आहे आणि त्यातून भूमिपुत्र विरुद्ध बाहेरचा असे वाद, भाषिक वाद रोज आपल्या पाचवीला पुजले जात आहेत. देशात आणि देशाबाहेरील, असे प्रचंड प्रमाणात स्थलांतर वाढत आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाऱ्यांना चढत्या क्रमाने वेतन, तर बाहेरच्या म्हणजे मूठभरांच्या विकासाच्या वर्तुळाबाहेर राहिलेल्यांना उतरत्या क्रमांकाने वेतन किंवा कंत्राटी वेतन, असेही स्वातंत्र्यात घडते आहे. किमान वेतन, समान कामासाठी समान वेतन, नोकरीतील सुरक्षितता या साऱ्या गोष्टी बघता-बघता उडून गेल्या आणि बिनकॉलरचा, अदृश्य कामगार असा जन्माला आला हेही मी-मी म्हणणाऱ्यांना कळले नाही. जगण्याच्या प्रत्येक अंगाला विषमतेने घोरपडीसारखा विळखा घातला आहे आणि संविधानातील उद्दिष्टे बाहेर पडणार नाहीत, अशी व्यवस्था तयार होते आहे. मूठभर लोकांच्या वाट्याला पोते भरून विकास, तर पोतेभर माणसाच्या वाट्याला मूठभर विकास, असे हे प्रकरण आहे.

देश विकास करतो की नाही, हे कसे ठरवायचे आहे. तो देश विकास करतो का ज्याला विषमतेने घेरले आहे, मूलतत्त्ववाद आणि धर्मवादाने घेरले आहे, आत्महत्यांनी घेरले आहे, रोजीरोटीच्या प्रश्नांनी घेरले आहे, जो शिवथाळी किंवा अम्मा थाळीची वाट बघतो आहे, जो दिल्लीतील कोणा कारभाऱ्याच्या नावाने गॅस कधी येईल, मनिऑर्डर कधी येईल आणि कच्च्याबच्च्यांना चड्डी कधी येईल? माणसाला रोजीरोटीबरोबर स्वाभिमानही प्यारा असतो. त्याचे मन, मेंदू आणि मनगटाला काम हवे असते, निर्मितीसाठी प्रेरणा हव्या असतात आणि नेमके तेथेच स्वातंत्र्याने मुके होण्याचे ठरवलेले दिसते. राष्ट्र, स्वातंत्र्य या कल्पना सामान्य माणसाच्या मनात जन्माला येतात. राष्ट्र त्यांचे असते. राष्ट्राचे आणि तिथे जन्माला येणाऱ्या संपत्तीचे मालक तेच असतात. आपल्याकडे उलटे घडताना दिसते आहे. आजमितीला देशाच्या मालकीचे काय आहे, असा प्रश्न कोणी तरी विचारावा. उत्तर काय मिळेल. उत्तर हेच असेल, की आपल्या मालकीचे काही नाही. समुद्रातील गॅस, जहाज, रेल्वे, विमान, रस्ते, शस्त्रे, शिक्षण, आरोग्य, नोकऱ्या हे सारेच्या सारे खासगी क्षेत्राच्या मालकीचे झाले आहे. स्वाभाविक जो मालक तोच संपत्तीचाही धनी होणार, तोच आपल्या हातातील धनशक्तीवर देश चालवणार, तोच साऱ्या गोष्टींचे कंत्राट घेणार हे स्वाभाविक होते. हे सारे घडत असताना कल्याणकारी राष्ट्र, सामाजिक न्याय, समता, जगण्याचा आणि तेही सन्मानाने जगण्याचा हक्क आदी गोष्टी कोठे तरी अंग चोरून बसतात किंवा या सर्वांना स्पेसलेस केले जाते, हे आपण पाहतो आहोत. खासगीकरणाच्या प्रक्रियेत विकासाचे केंद्रीकरण होते आहे आणि भाकरी विरुद्ध पिज्झा, लोक विरुद्ध बहुराष्ट्रीय, असे युद्धही सुरू होते आहे. अर्थात, या सर्व आपल्याला दिसणाऱ्या गोष्टी सर्वसामान्यांना दिसणार नाहीत. यासाठी एक पद्धतशीर व्यूहनीती आखली गेली आहे. माणसाच्या आयुष्यातील प्राधान्यक्रम बदलले आहेत. आत्मसन्मानाचे जीवन लाभावे हा प्राधान्यक्रम की अजान, भोंगा, देवाची घरे किंवा त्यांचे जीर्णोद्धार ही प्राधान्यक्रमे, असा पेच तयार केला गेला आहे. हा प्रेचप्रसंग दिवसेंदिवस तीव्र होत सारे राजकारण सिद्धांताऐवजी श्रद्धेभोवती एकवटले जात आहे किंवा यासाठीचे प्रयत्न होत आहेत. आता तर हे स्वातंत्र्य विरोधी पक्षापासून मुक्त करण्याचा प्रयत्न होतो आहे. न्यायालयांत चक्रावून टाकणारे निकाल लागत आहेत. चौकाचौकांत जाणीवपूर्वक संस्कृतीसंघर्ष किंवा धर्मसंघर्ष पेटवला जातोय. रोजीरोटीसाठी बाहेर पडणारा माणूस या संघर्षात अडकतो. ज्या स्वतंत्र देशात विरोधी पक्षच राहणार नसतील किंवा जे आहेत त्यांना सत्ताधाऱ्या दरबारात मान झुकवण्यासाठी कोणते तरी आमिष दाखवले जाणार असेल किंवा कोणत्या तरी एजन्सीला त्यांच्या मागे लावले जात असेल, तर कशालाच काही अर्थ राहत नाही. एक अराजकसदृश किंवा एकाधिकारशाहीसदृश परिस्थिती निर्माण होण्याला वेळ लागणार नाही. आपल्याला स्वतंत्र भारत मिळाला. आपण स्वतंत्र भारतात राहतो आहोत ही आनंददायीच गोष्ट आहे; पण हे स्वातंत्र्य अर्थपूर्ण, परिणामकारक आणि लोककल्याणकारी किंवा कल्याणकारी राष्ट्राकडे वळवायचे असेल, तर देशाचे, स्वातंत्र्याचे मालक असलेल्या सामान्य माणसानेच जागल्याची भूमिका घ्यायला हवी. त्याच्या मालकीचे जे-जे आहे आणि संविधानाने दिले आहे त्याचे कोणी अपहरण करते आहे का, हे पाहायला हवे आणि लोकशाही ते मनुशाही हा उलटा प्रवास परवडणार नाही, हेही समजून घ्यायला हवे. स्वातंत्र्याचे वय मोजणे जेवढे आनंददायी तेवढेच हे स्वातंत्र्य आशयपूर्ण, मूल्यपूर्ण असणेही आवश्यकच आहे.

●●●



75 आजादी का अमृत महोत्सव



# भारत प्रकाशाकडून अंधाराकडे

**आज भारतामध्ये हिंदुत्ववाद ज्या वेगाने पसरतोय, हिंदू महासभा, विश्व हिंदू परिषद ज्या गोष्टी करताहेत, आज भारतातला मुस्लीम पाठीमागे राहिलेला आहे, तो अस्वस्थ आहे, तो भयभीत आहे, तो भारताच्या लोकसंख्येच्या प्रमाणात २० कोटी आहे, याचे काय करायचे? मी एक मानतो, की माणूस भारतीय असो किंवा पृथ्वीच्या पाठीवरच्या कुठल्याही देशाचा असो, तो माणूस एखाद्या निसर्गचित्राचे चित्र नसतो, तर माणूस प्रतिक्रिया देत असतो आणि त्याला प्रतिक्रिया देण्याची संधी मिळाली, तर तो पेटून उभा राहू शकतो. प्रत्येकाला संधी हवी असते.**




**डॉ. रावसाहेब कसबे**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला ब्रिटिश साम्राज्यशाहीपासून स्वातंत्र्य मिळाले; परंतु हे स्वातंत्र्य अतिशय वेदनादायी होते. याचे कारण १९४६ च्या शेवटापासून हिंदू-मुस्लीम दंगलींनी सुरुवात केली होती. भारताची फाळणी झाल्यानंतर हे स्वातंत्र्य आपल्याला मिळाले. त्यामुळे आपणास भारत आणि पाकिस्तान ही दोन राष्ट्रे मिळाली. या काळात जी हिंसा भारतीय उपखंडाने पाहिली, ती इतिहासात क्वचितच पाहिली होती. कारण त्या काळात धार्मिक उन्माद दोन्ही बाजूंकडून इतक्या जोरात केला गेला, की त्यात अनेक निरपराध लोकांचे बळी गेले.

### गांधीजी स्वातंत्र्यावर खुश नव्हते

दिल्लीसारख्या ठिकाणी पाकिस्तानातून आलेल्या ज्या हिंदूंच्या फलटणी होत्या, त्या सगळ्या अतिशय द्वेषात होत्या आणि त्यांनी दिल्लीत उच्छाद मांडला होता. त्यामुळेच भारतात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जो १९२५ साली स्थापन झालेला होता, त्याला आपल्या वाढीच्या दृष्टीने एक पृष्ठभूमी मिळाली. संघ आणि हिंदू महासभा या संघटनांनी दिल्लीत ज्या दंगली होत होत्या त्या दंगलींच्या जागी जाऊन हिंदूंना दंगलीसाठी अधिक उत्तेजित केले. त्याची परिणीती दिल्लीसारख्या ठिकाणी आरएसएसची मुळे पसरण्यास, घट्ट होण्यास मदत झाली. त्या काळातील गोळवलकरांची भाषणे पाहिली, तर


आपल्या अंगावर शहारा येतो. त्यांनी त्यावेळी दिल्लीत जाहीर केले होते, की जगात एकही मुस्लीम जिवंत राहणार नाही, अशी व्यवस्था आम्ही निर्माण करू. गांधीजींनी या दंगलीच्या वेळी उपोषण धरले. हे उपोषण धरताना गांधीजी प्रचंड अस्वस्थ होते. त्यांच्यासमोर भारताचे भवितव्य अतिशय विद्रूप दिसत होते. या दंगलीच्या काळात भारताला जे स्वातंत्र्य



मिळाले ते गांधींच्या प्रयत्नांनी जरी मिळाले असले, तरी गांधी मात्र या स्वातंत्र्यावर खुश नव्हते. कारण त्यांना देशाची फाळणी व्हावी, असे वाटत नव्हते; परंतु एकीकडून मुस्लीम लीगचे नेते मोहम्मद अली जीना होते आणि दुसरीकडून भारतामध्ये हिंदुराष्ट्रवादाचा सिद्धांत मांडणारे सावरकर प्रतिनिधी होते आणि हे दोघेही ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या काळात हिंदू-मुस्लीम यांच्यात एक दरी निर्माण करण्याचे काम करत होते आणि ही दरी बुजवण्याचे सामर्थ्य ना काँग्रेसकडे होते ना गांधीजींकडे होते. स्वातंत्र्य मिळाले तो दिवस अनेक लेखकांनी लिहून ठेवला आहे. पहिली गोष्ट अशी, की स्वातंत्र्याची घोषणा झाली आणि १४ ऑगस्टला पाकिस्तानची निर्मिती झाली.

**...त्यावेळी नेहरू ढसढसा रडू लागले**

१४ ऑगस्टच्या रात्री पंडित जवाहरलाल नेहरू हे आकाशवाणीवरून राष्ट्राला संबोधित करणार होते आणि स्वातंत्र्याचा भविष्यकाळ कसा असेल? यासंबंधीचे चिंतन देशासमोर मांडणार होते. १४ ऑक्टोबरच्या सायंकाळी ८.३० वाजता नेहरू आणि इंदिरा गांधी जेवणासाठी डायनिंग टेबलवर बसले होते. तेवढ्यात लाहोरवरून एक फोन आला आणि नेहरू तो फोन घेण्यासाठी गेले. त्या फोनवर असे त्यांना सांगण्यात आले, की पाकिस्तानात हिंदूंच्या प्रचंड कत्तली होत आहेत, लाहोरमध्ये हिंदूंना पाणी मिळत नाही. स्त्रियांवर बलात्कार होत आहेत. हिंदू पाण्याअभावी तडफडून मरू लागलेले आहेत. हे जेव्हा नेहरूंनी फोनवर ऐकले त्यावेळी नेहरू ढसढसा रडू लागले. त्यांना काय करावे हे समजत नव्हते. त्यांनी राष्ट्राला उद्देशून करण्याच्या भाषणाची तयारी करायला सुरुवात केली होती, त्यापूर्वी ही फोनची घटना घडली. तेव्हा पंडित नेहरूंनी आपले तोंड झाकून इंदिरा गांधींसमोर आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली; परंतु इंदिरा गांधींनी त्यांना सावरले आणि त्यानंतर नेहरूंनी आपले भाषण तयार केले. हे भाषण जे तयार केले, ते स्वातंत्र्य दिनाच्या पहिल्याच मिनिटाला आकाशवाणीवरून प्रसारित झाले; परंतु त्यावेळी दुसरी गोष्ट अशी होती, की महात्मा गांधी त्यावेळी बंगालमध्ये होते आणि बंगालच्या एका खेड्यामध्ये ते एका मुस्लीमबहुल परिसरात एका हिंदूच्या घरात झोपलेले होते. ज्यावेळी सकाळी ते उठले त्यावेळी ते अतिशय अस्वस्थ होते. म्हणजे एकीकडे नेहरूंची ही स्थिती होती,



तर दुसरीकडे गांधीजींची ती स्थिती होती.

**हा देश समाजवादी, समाजरचनेच्या मार्गाने जाईल**

गांधीजी दिवसभर मौनात होते आणि त्यांच्यासमोर देशी, विदेशी पत्रकारांचा गराडा होता. त्यावेळी गांधी त्या झोपडीमध्ये अंधारात पडून राहिले होते किंवा हे स्वातंत्र्य जे मिळाले हे एका अर्थाने खरे स्वातंत्र्य नव्हतेच. ते फक्त ब्रिटिश साम्राज्यशाही इथून जाणे आणि भारताच्या हातामध्ये किंवा भारताची सर्व शक्तिमान असलेली जी लॉबी होती भांडवलदारांची तिच्या हाती ट्रान्स्फर होणे, म्हणजे ब्रिटिश भांडवलदारांच्या हातातून भारतीय भांडवलदारांच्या हातात सत्ता जाणे, ही गोष्ट निश्चित झाली आणि या देशातील सगळ्या भांडवलदारांनी अगदी सुरुवातीपासून म्हणजे काँग्रेसच्या स्थापनेपासून हा देश एक हिंदुराष्ट्र व्हावा, अशी त्यांची मूळ कल्पना होती. त्यासाठी त्यांनी गीता प्रेस नावाची एक अतिशय मोठी चळवळ सुरू केलेली होती. तिचे नेतृत्व हे भारतातील सगळे राजस्थानी आणि गुजराती लोक करत होते. या चळवळीने जी नियतकालिके काढली आणि जो प्रचार केला, त्या प्रचारामुळे हिंदूंचे मनोबल हे साधारणतः हिंदुत्ववादाकडे झुकू लागले. त्यावेळी भारतातील सगळे जे संस्थानिक होते, त्या संस्थानिकांनासुद्धा भारतात सामील होण्याची इच्छा नव्हती. त्याचप्रमाणे त्यांच्या ज्या संस्था होत्या, त्या प्रामुख्याने भांडवलदारांच्या संस्था होत्या. त्या हिंदू महासभेला काँग्रेसइतकीच आर्थिक मदत करत होत्या. कारण सर्व संस्थाने आणि भांडवलदार हे हिंदुत्ववादी होते आणि त्यामुळे हा देश हिंदुराष्ट्र होईल, या भावानेने झपाटून जाऊन त्या हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांना मदत करत होत्या; परंतु गांधीजींना ज्यावेळी असे वाटले, की या देशामध्ये भांडवलशाहीचे राज्य येता कामा नये; परंतु या देशाच्या ऑडोलॉजीकली म्हणजे सर्वसामान्यपणे ज्या विचारप्रणालीवर भारत स्वावलंबी राहणार होता. भारताच्या स्वातंत्र्यानंतर तिची सुरुवात पंडित जवाहराल नेहरू ज्यावेळी राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष झाले, त्यावेळी त्यांनी जाहीर करून ठेवली होती. हा देश समाजवादी, समाजरचनेच्या मार्गाने जाईल, असे नेहरूंनी आश्वासन दिले होते. गांधीजींनी त्या काळामध्ये काँग्रेसपासून १९३४ साली निवृत्ती घेतलेली होती. ते काँग्रेसचे सदस्य राहिलेले नव्हते; परंतु तरीही गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्याची राष्ट्रीय चळवळ चालू होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ही चळवळ शेवटपर्यंत राहिली. म्हणजे १९२८ साली जवाहरलाल नेहरूंनी ते समाजवादी आहेत, असे जाहीर केले.

**मला मोकळा श्वास हवा म्हणून मी काँग्रेसच्या बाहेर आहे**

१९३७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दलित फेडरेशनची एक अतिशय मोठी सभा अहमदाबादला झालेली होती.

त्यावेळी आपटे नावाच्या एका गृहस्थाने त्यांची मुलाखत घेतली आणि डॉ. आंबेडकरांना असे विचारले, की तुम्ही राजकीयदृष्ट्या नेमके कोणत्या विचार प्रणालीचे आहात? त्यावेळी आंबेडकरांनी असे सांगितले होते, की मी स्वत:ला समाजवादी समजतो. मग त्याने प्रतिप्रश्न असा केला, की जर तुम्ही समाजवादी आहात, तर तुम्ही काँग्रेसमधल्या समाजवादी गटामध्ये सामील का होत नाही? त्यावेळी डॉ. बाबासाहेबांनी असे उत्तर दिले होते, की 'काँग्रेसमध्ये समाजवादी आहेत ही गोष्ट खरी; परंतु हे काँग्रेसमध्ये गुदमरून गेलेले आहेत. त्यांना श्वास घेता येत नाही आणि मला गुदमरायचं नाही. मला मोकळा श्वास हवा म्हणून मी काँग्रेसच्या बाहेर आहे.' म्हणजे याचा अर्थ १९२८ साली जवाहरलाल नेहरू समाजवादी झाले. १९३७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपण समाजवादी आहोत, असे जाहीर केले आणि १९४६ साली गांधीजींनी त्यांच्या 'हरिजन'मध्ये दोन लेख लिहिले आणि त्यांनी सांगितले, की मी साम्यवादी आहे. म्हणजे स्वतःला कम्युनिस्ट समजतो, म्हणजे माझा साम्यवादही समाजवादासारखा आहे आणि समाजवाद हा समतेवर आधारित आहे आणि समतेला ईश्वराचा नेहमीच पाठिंबा असतो आणि १९४६ साली गांधींनी स्वतः आपण समाजवादी आहोत, असे जाहीर केले आहे.


**डॉ. आंबेडकर, नेहरू यांनी जवळ यावे**

भारतात त्याकाळी तीन समाजवादी लोक होते. जयप्रकाश नारायण, डॉ. राम मनोहर लोहिया, नरेंद्र देव; परंतु ते काँग्रेसपासून दूर झालेले होते, तर दुसऱ्या बाजूला जवाहरलाल नेहरू, डॉ. आंबेडकर आणि महात्मा गांधी या तिघांनी आपण समाजवादी असल्याचे जाहीर केले होते. ज्याक्षणी महात्मा गांधींनी आपण समाजवादी असल्याचे जाहीर केले, त्या क्षणी भारतीय भांडवलदार एक व्यूहरचना करत होते आणि ती व्यूहरचना अशी होती, की गांधी आणि नेहरू यांचे संबंध तोडणे. गांधी, नेहरूंचे संबंध तोडले, तर या देशात समाजवादाला आपण पायबंद घालू शकू; परंतु ही जी तिसरी शक्ती होती डॉ. आंबेडकरांची ती संपूर्ण देशामध्ये होती; परंतु ती विखुरलेली होती. म्हणून गांधींना असे वाटत होते, की आंबेडकर, नेहरू यांनी जवळ यावे. कारण दोघेही समाजवादी आहेत आणि या देशाची घटना जिला आपण संविधान म्हणतो, ती डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली तयार व्हावी, म्हणून गांधींनी वल्लभभाई पटेल आणि डॉ. राजेंद्र प्रसाद यांना बोलावून घेतले आणि डॉ. आंबेडकरांना ताबडतोब संविधान सभेत आणा म्हणून सांगितले. डॉ. आंबेडकर हे ज्या लोकसभा मतदारसंघातून निवडून आले होते, तो मतदारसंघ पाकिस्तानात गेला आहे आणि बाबासाहेब कॉन्स्टिट्यूशन असेंब्लीच्या बाहेर पडले आहेत. गांधींच्या आदेशाप्रमाणे राजेंद्र प्रसाद आणि सरदार वल्लभभाई पटेल यांनी त्या काळचे जे मुंबई प्रांताचे पंतप्रधान होते बाळासाहेब खेर यांच्याशी फोनवर चर्चा केली, पत्र लिहिले आणि त्यांना सांगितले, की कुठल्याही परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना बॅरिस्टर जयकर यांच्या जागी बिनविरोध निवडून पाठवा. यासाठी वेळ घालवू नका. येणाऱ्या कॉन्स्टिट्यूशनच्या असेंब्लीत आम्हाला डॉ. आंबेडकर पाहिजेत. बाळासाहेब खेरांना लिहिलेली ही दोन्ही पत्रे प्रसिद्ध झाली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'रायटिंग ॲण्ड स्पिचेच'च्या १४ व्या खंडात संविधानासंबंधी जो भाग आहे, तो वसंत मून यांनी संपादित केला आहे. त्या ग्रंथात डॉ. राजेंद्र प्रसाद यांचे या विषयाचे पत्र प्रकाशित झाले आहे.

**देशाला सार्वभौम, प्रजासत्ताक, गणराज्य करण्याचे आश्वासन**

राज्यघटनेच्या निर्मितीसंबंधाने विचार सुरू केला त्यावेळी जवाहरलाल नेहरू यांनी संविधानाची जी प्रस्तावना आहे, तो ड्राफ्ट केला होता. त्याला व्यवस्थितपणे शब्दबद्ध करण्याचे काम मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले होते. त्यांनी स्पष्ट केले होते, की भारत हा सार्वभौम, प्रजासत्ताक, गणराज्य असेल. हे तीन शब्द सुरुवातीला होते. इंदिरा गांधींनी ४२ व्या घटनादुरुस्तीवेळी धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी हे दोन शब्द त्यात





समाविष्ट केले. जे भारतीय राज्यघटनेची चौकट निश्चित करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला सार्वभौम, प्रजासत्ताक, गणराज्य करण्याचे आश्वासन संविधानाच्या सरनाम्यातून देशाला दिले होते. ही राज्यघटना कोणाच्याही नावाने निश्चित केलेली नव्हती, तर या राज्यघटनेची सुरुवात 'आम्ही भारताचे लोक' असे ठरवितो, की आम्ही भारतात सार्वभौम, प्रजासत्ताक आणि गणराज्य निर्माण करू. या देशातल्या प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य देऊ. विचार, उच्चार, श्रद्धा आणि समजूत देऊ. या देशातल्या लोकांना आम्ही आर्थिक, सामाजिक न्याय देऊ. या देशातल्या लोकांना आम्ही समता देऊ आणि या देशातल्या लोकांना समजूत देऊ आणि भारत एकात्म कसा राहील, हे प्रयत्न करू आणि ही राज्यघटना आम्ही स्वतःच निर्माण करत आहोत, आम्ही स्वतःला अर्पण करत आहोत. आम्ही स्वीकारीत आहोत. अशी प्रस्तावना आतापर्यंतच्या जगातील कुठल्याही राज्यघटनेत नाही.

**गोडसेने गांधींचा खून करण्यापूर्वी पाच वेळा प्रयत्न केले होते**

हा सरनामा ऐतिहासिक सरनामा आहे आणि अर्नेस्ट बार्कर नावाचा एक अतिशय मोठा इतिहासकार तज्ज्ञ होऊन गेला, त्याने 'प्रिन्सिपल ऑफ सोशल ॲण्ड पॉलिटिकल थिअरी' नावाचा एक ग्रंथ लिहिला आणि या ग्रंथाच्या पहिल्याच पानावर या भारतीय राज्यघटनेचा सरनामा प्रसिद्ध केला आणि सांगितले, की माझ्या राजकीय तत्त्वज्ञानाचा आशय या भारताच्या राज्यघटनेच्या

सरनाम्यात आलेला आहे. म्हणजे हा सरनामा जितका मोठा होता, तितकाच महानही होता, तितका दूरदृष्टीचा होता. पुढे जेव्हा काँग्रेसच्या हातात सत्ता गेली तेव्हा भारतीय भांडवलदार जे गांधी आणि नेहरू यांच्यामध्ये दुफळी निर्माण करण्याचा प्रयत्न करत होते ते अस्वस्थ झाले. गांधींनी आम्ही साम्यवादी आहोत, असे सांगून टाकले होते. तेव्हापासून गांधींच्या विरोधात सगळे भांडवलदार, सर्व संस्थानिक उभे राहिले. नथुराम गोडसेने गांधींचा खून करण्यापूर्वी पाच वेळा प्रयत्न केले होते; परंतु त्याला यश मिळाले नव्हते. कारण त्याच्याकडे साधने नव्हती. म्हणून नथुराम गोडसेला धरून एकतर गांधींना नेहरूपासून तोडले पाहिजे किंवा गांधींचा खून केला पाहिजे, हे त्यादृष्टीने निश्चित केले. गांधींनी हे जाहीर केल्यापासून त्यांच्या उपोषणाच्या काळात जी काही गडबड होत होती आणि दिल्लीमध्ये ते ज्या बिर्लांच्या हाउसमध्ये राहत होते तिथून ते जेव्हा प्रार्थनेसाठी येत असत. त्यावेळी पहिला बॉम्बस्फोट करण्यात आला; परंतु त्यात हे लोक अपयशी झाले. नथुराम गोडसेला कोणत्या संस्थानिकाने पिस्तुल दिले, त्याला बॉम्ब बनविण्याचे सर्व मंत्र शिकवले, बॉम्बचा पुरवठा केला. त्याच काळामध्ये आपण असे बघतो, की पुणे व अहमदनगर येथे अनेक बॉम्बस्फोट फितूरवाद्यांनी केले आणि शेवटी नथूराम गोडसे गांधींची हत्या करण्यात यशस्वी झाला. त्यामुळे गांधींचा खून ही केवळ हिंदुत्ववाद्यांनी केलेली गोष्ट नाही, तर ती रॅडिकल हिंदू, आक्रमक हिंदू आणि भारतातील भांडवलदार यांच्या सहमतीने झालेले कृत्य होते.

**कल्याणकारी राज्यांची स्थापना करून देशामध्ये केली आर्थिक सुधारणा**

हे इतिहासाला फारसे ज्ञात नाही. हे हळूहळू ज्ञात होत जाईल. माझा 'गांधी पराभूत राजकारणी, विजयी महात्मा' हा जो ग्रंथ आहे, त्यामध्ये हा सगळा तपशील आहे. गांधी आणि बाबासाहेब आंबेडकर यांचे जे संबंध होते, त्यासंबंधी मी अतिशय विस्ताराने त्यात लिहिलेले आहे. असो, भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि नेहरूंनी नियोजित अर्थव्यवस्था म्हणजेच 'प्लॅनेड इकॉनॉमी' स्वीकारली. कारण १९२८ साली नेहरू जेव्हा रशियाचा दौरा करून आले, त्यावेळी त्यांच्या मनावर साम्यवादाचा बराचसा प्रभाव होता आणि रशियाने जी प्रगती केली, ती नियोजित अर्थव्यवस्थेमुळे झाली आहे, असा त्यांचा समज होता. म्हणून तेव्हापासून जवाहरलाल नेहरू नियोजित अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करत होते. भारतात जेव्हा नियोजित अर्थव्यवस्थेची सुरुवात झाली त्या वेळेस भांडवलदारांवर अनेक बंधने आली. नेहरूंनी औद्योगिक क्षेत्रामध्ये प्रगती व्हावी, शेतीमध्येही प्रगती व्हावी यादृष्टीने प्रयत्न केलेले होते; परंतु नेहरूंना अडचणीत आणण्यासाठी खूप गोष्टी या देशामध्ये घडल्या; परंतु नेहरू हे हिंदुस्थानच्या जनतेच्या हृदयावर कोरले गेलेले नाव होते आणि म्हणून नेहरूंनी १९६४ सालापर्यंत भारताचे भवितव्य उज्ज्वल करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी कल्याणकारी राज्यांची स्थापना करून देशामध्ये आर्थिक सुधारणा केली. देशातल्या सामान्य माणसाला शिक्षणाचा हक्क दिला, त्यामुळे अस्पृश्य जाती आणि जमातींमधून एक नवा वर्ग तयार झाला. त्यामुळे भारतामध्ये अतिशय महत्त्वाची क्रांती झाली. खरे म्हणजे, भारतीय स्वातंत्र्याची राज्यघटना हीच एक क्रांतिकारी राज्यघटना होती. एका अर्थाने ती क्रांती होती; परंतु बाबासाहेब आंबेडकरांचे एक वचन आपण कधीही विसरता कामा नये. इतिहासाबद्दल ते म्हणतात, जगाचा इतिहास आपल्याला असे सांगतो, की कोणत्याही राजकीय क्रांतीच्या मुळाशी एक सामाजिक आणि धार्मिक क्रांती असते.

**भांडवलदारांनी केला हिंदुत्ववादी राजकारणाचा पुरस्कार**

याच सामाजिक आणि धार्मिक क्रांतीच्या पायावर राजकीय क्रांती उभी करता येते; परंतु आपल्या देशामध्ये जी राजकीय क्रांती झाली ती सामाजिक आणि धार्मिक राज्यक्रांतीच्या पायावर झालीच नाही. जोपर्यंत नेहरू होते तोपर्यंत नेहरूंच्या प्रभावामुळे आणि पुढे इंदिरा गांधींच्या प्रभावामुळे हे सगळे प्रतिक्रांतिकारक अस्वस्थ होते, त्यांना कोणताही मार्ग सुचत नव्हता. गांधींच्या हत्येनंतरसुद्धा या देशातील राजकारण त्यांच्या हातात जाणे शक्य नव्हते आणि भारतामध्ये सामाजिक किंवा धार्मिक, सांस्कृतिक क्रांती न झाल्यामुळे ही जी प्रतिक्रांती आहे, या प्रतिक्रांतीला खतपाणी घालणाऱ्या अनेक घटना आणि गोष्टी, अनेक संस्था त्या काळात उभ्या राहिल्या आणि त्याचा परिणाम असा झाला, की सर्वसामान्य हिंदू माणसाच्या मनावर हिंदुत्वाचा पगडा कसा वाढेल, यादृष्टीने प्रयत्न झाला. म्हणून या स्वातंत्र्याकडे मी जेव्हा पाहतो त्या वेळेस मला असे वाटते, की या देशात राज्यघटना प्रस्थापित करून बाबासाहेब आंबेडकरांनी जी एक राजकीय क्रांती केलेली आहे, तिच्या पायासाठी जी सामाजिक आणि धार्मिक क्रांती व्हायला पाहिजे होती ती झालेली नव्हती. तिचा पाया म्हणून कमकुवत झालेला होता. त्यामुळे या देशातील सगळे मूलतत्त्ववादी हिंदू आहेत, त्यांनी याचा फायदा घेऊन या देशाच्या राज्यघटनेला हा पायाच कसा मिळणार नाही, याची तजवीज केली. त्यासाठी आपल्या देशातल्या भांडवलदारांनी आणि विशेषतः गुजरातमधील जे भांडवलदार परदेशात गेलेले आहेत त्यांनी तिथे त्यांच्या मोठमोठ्या लॉब्या एकत्र करून त्यांना मदत केली आणि हिंदुत्ववादी राजकारणाचा पुरस्कार केला. ज्या वेळेस राज्यघटनेच्या क्रांतीबरोबर या क्रांतीला आधार देणारी जी सामाजिक आणि धार्मिक क्रांतीची कोनशिला होती ती पूर्ण झालेली नव्हती. म्हणून ही क्रांती अपूर्ण होती आणि तिचा फायदा घेतला. या हिंदुत्ववादी विचारांच्या लोकांनी प्रतिक्रांतिकारक तत्त्व अधिक जोमाने पुढे नेण्याचा प्रयत्न केला.

**भाजपची लोकसभेतील संख्या सर्वाधिक**

दुसरी महत्त्वाची गोष्ट घडली ती अशी, १९९० साली जागतिकीकरण आले, जागतिकीकरणाने काही प्रश्न निर्माण केले. जागतिकीकरणात कुठलेही राष्ट्र एका अर्थाने स्वायत्त, सार्वभौम राहिलेले नाही. प्रत्येक देशाच्या सार्वभौमत्वावर जागतिकीकरणात मर्यादा घातल्या, त्यामुळे भारतही त्या अर्थाने सार्वभौम राहिला नाही. कारण त्याची संपूर्ण अर्थनीती ही जागतिक अर्थनीतीच्या सुसंवादी राहिली नाही. भारताला आर्थिकदृष्ट्या काही महत्त्वाचे निर्णय घेता येत नाहीत आणि ते घेतले तरी त्याला 'वर्ल्ड बँक' आणि आंतरराष्ट्रीय व्यापारगट हा आक्षेप घेतो. त्याचा परिणाम भारतीय अर्थनीतीवर होतो. दुसरी एक गोष्ट घडली, आपल्या देशामध्ये १९९० साली जागतिकीकरण आले आणि ९० सालीच राममंदिराची

चळवळ सुरू झाली. म्हणजे आपल्याकडे हिंदुत्ववादी राजकारण आणि जागतिकीकरण हे हातात हात घालून उभे राहिले. आडवाणींनी त्या वेळेस रामरथयात्रा काढली. त्या वेळेस हिंदू-मुस्लीम दंगे मोठ्या प्रमाणात झाले. त्याच काळात आपण असे पाहतो, की भारतीय जनता पक्षाला त्यावेळी एक मूल सापडले आणि त्यांची संख्या (पार्लमेंटमध्ये) २ वरून हळूहळू ती विस्तारत गेली. आज आपण असे पाहतो, की भारतीय जनता पक्षाची लोकसभेतील संख्या ही सर्वाधिक आहे. दोनतृतीयांश बहुमताच्या वर आलेली आहे.

**भारतामध्ये गरीब, श्रीमंतांच्या दरीत वाढ**

भारतामध्ये जागतिकीकरणाचे फायदे झालेली गोष्ट खरी आहे; परंतु जागतिकीकरणाचे तोटेही भरपूर झालेले आहेत. जागतिकीकरणासंदर्भात आपल्या देशातील डाव्या पक्षांची भूमिकाही संशयास्पद ठरली. जागतिकीकरण ही एक जागतिक व्यवस्था, परिस्थिती आहे. तिच्याविरुद्ध हे डावे पक्ष दोन दशके (जवळजवळ २० वर्षे) संघर्ष करत राहिले; परंतु तिच्याविरोधात संघर्ष करण्याएवढी ताकद जगातल्या कुठल्याही डाव्या संघटनेमध्ये नव्हती आणि ते त्यांना स्वीकारावे लागणार आहे. खरे म्हणजे, या सगळ्या लोकांनी असे करणे आवश्यक होते, की जागतिकीकरणाचा स्वीकार करून या जागतिकीकरणाच्या व्यवस्थेमध्ये जनतेचा हस्तक्षेप कसा वाढेल, यादृष्टीने प्रयत्न करायला हवे होते; परंतु त्यांची संपूर्ण शक्ती जागतिकीकरणाच्या विरोधात वाया गेली. जागतिकीकरण स्थिर झाले. देशातल्या सर्व कामगार संघटना संपल्या, कामगार संघटना (युनियन) नावाची कुठलीही गोष्ट राहिली नाही, मुक्त अर्थव्यवस्था राहिली नाही. माणसाला कुठेही भांडवल गुंतवणूक करण्याची सोय उपलब्ध झाली. जगात जिथे भांडवलाचा संशय होता, ज्यांचे प्रश्न संपलेले होते, त्याने भारतामध्ये भांडवल गुंतवणूक केली. प्रचंड नफा कमावला आणि आज आपण असे पाहतो, की आजची आर्थिक नीतीही पूर्णपणे सरकारच्या अधिकारक्षेत्राच्या बाहेर आहे. जी मुक्त अर्थव्यवस्था आहे, म्हणजे सरकार तिच्यामध्ये कोणताही हस्तक्षेप करू शकत नाही, अशी अर्थव्यवस्था आज आपण स्वीकारलेली आहे. त्याचा परिणाम असा झालेला आहे, की भारतामध्ये गरीब आणि श्रीमंत यांची दरी वाढत आहे.

**...म्हणजे त्यांना निरुपयोगी बनवणे, युजलेस बनवणे होय**

भारतामध्ये यंत्रयुगाने काही समस्या निर्माण केल्यात. भारतातले उत्पादन वाढते ही गोष्ट खरी; पण जसे उत्पादन वाढते तशी बेकारीही वाढत आहे. म्हणजे यंत्राच्या साहाय्याने उत्पादन वाढवणे आणि दुसरीकडे मजुरांना, श्रमिकांना त्यांच्या हातातले काम काढून घेणे म्हणजे त्यांना निरुपयोगी बनवणे, युजलेस बनवणे होय. अशा निरुपयोगी झालेल्या लोकांची संख्या भारतामध्ये आज ८० कोटी आहे. याचा अर्थ असा आहे. सरकार त्या ८० कोटी लोकांना फुकट धान्य देतेय आणि लोक रांगेत उभे राहून ते धान्य खरेदी करतात. त्यांची क्रयशक्ती संपलेली आहे. याचा अर्थ असा, की आज भारतामध्ये सरळसरळ ८० कोटी लोक हे उपयोगशून्य झालेले आहेत. त्यांच्याकडे कोणतीही उपयुक्तता राहिलेली नाही. कोविडच्या काळामध्ये आपण बघितले, की कोट्यवधी लोक स्थलांतर करत होते. कोणी पायी, कोणी सायकलवर स्थलांतर करत होते. एक मुलगी तर आपल्या आजारी बापाला सायकलवर बिहारपर्यंत घेऊन गेली होती. अनेक स्त्रिया रेल्वे स्टेशनवर मृत्युमुखी पडलेल्या होत्या आणि त्यांची मुले आपल्या आईच्या शवाशी खेळत होती. या ज्या सगळ्या गोष्टी आहेत याचा अर्थ असा होतो, की भारतामध्ये आज




अशा लोकांची संख्या आहे जे आत्मभान विसरून गेलेले आहेत. जे जगाकडे फक्त पाहतात; पण त्यांच्या बघण्यामध्ये कोणतीही दृष्टी नाही. जे फक्त एकसारखे पाहतायत एवढ्या चिंतेने, की आजचा दिवस कसा जाईल. या देशातले ८० कोटी लोक आज अशा अवस्थेत आहेत, की यातून मार्ग कसा काढायचा?

**८० कोटी लोकांनी कोणाकडे बघावे?**

भारताची जी लोकशाही आहे. ही लोकशाही म्हणजे निवडणुका जिंकण्याचे तंत्र आहे. निवडणुका कशा जिंकायच्या याचे तंत्र तिला समजते. ते इलेक्शन जिंकू शकतात. भारतातला भाजप पक्ष, आज त्याच्याकडे जेवढे पैसे आहेत, जेवढी रक्कम आहे, तेवढी जगातल्या कुठल्याही राजकीय पक्षाकडे नाही. ती प्रचंड भांडवलदारीकडून वसूल केलेली आहे. काँग्रेसचे नेतृत्व भांबावलेले आहे. डावे जवळजवळ निष्प्रभ झालेले आहेत. अशा अवस्थेत या ८० कोटी लोकांनी कोणाकडे बघावे? कसं बघावे? त्यांचे प्रश्न कसे सुटतील? तेव्हा या निरुपयोगी झालेल्या लोकांना आपल्याला कसे उपयोगात आणता येईल? हा जसा त्यांचा प्रश्न आहे. डाव्या, समाजवादी, काँग्रेसचा जसा प्रयत्न आहे, ही समस्या भांडवलदारांच्या समोरपण उभी आहे. या निष्प्रभ, निरुपयोगी झालेल्या लोकांचे करायचे काय? कारण

त्यांचा भांडवलशाहीला कोणताही फायदा नाही. भांडवलशाहीचे हे उपभोक्ते आहेत. तो मध्यमवर्ग जवळजवळ ५० कोटींचा आहे. या मध्यमवर्गाची मते मिळाली आणि त्यांची क्रयशक्ती वाढत राहिली, तर या देशांमध्ये भांडवलशाही व्यवस्थितपणे चालेल; परंतु उरलेल्या ८० कोटी लोकांचे करायचे काय? हा भांडवलशाहीसमोरील प्रश्न आहे. म्हणून एक तर तुमच्या कोविडसारखा विषाणू आणून त्यांना मारून टाकले पाहिजे किंवा भारतामध्ये एकेकाळी गुलामगिरी होती, ती इथे परत सुरू करून पुन्हा गुलाम केले पाहिजे किंवा हिटलरने जसे ज्यूंना मारून टाकले, तसे यांच्यासाठी गॅस चेंबर तयार करून मारावे लागेल. त्याच्यातून त्यांची उपद्रव क्षमताही संपेल. त्यातून भांडवलशाही अधिक समृद्ध होईल. त्यातून मध्यमवर्गाची भरभराट होत जाईल आणि त्यांच्यातून हा जो वर आलेला माणूस आहे, त्यालाही मुक्ती मिळेल, असा प्रतिगाम्यांचा प्रयत्न राहणार आहे. प्रतिगाम्यांच्या स्वप्नातील भारत जगाचा एक अतिशय मोठा विश्वगुरू होणार आहे; परंतु हा ८० कोटी लोकांच्या सरणावरती पाय ठेवून विश्वगुरू होणार आहे. असा विश्वगुरू होण्याचे स्वप्न भारताचे भांडवलदार आणि भारतातील मध्यमवर्गीय ग्राहक पाहतो आहे. मला स्वतःला असे वाटते, की आज आपल्या देशासमोर जो प्रश्न आहे, तो मोठा प्रश्न हा आहे.

**प्रत्येकाला संधी हवी असते**

भांडवलशाहीने निर्माण केलेले सर्व जे प्रश्न आहेत, ते हे आहेत. आज भारतामध्ये हिंदुत्ववाद ज्या वेगाने पसरतोय, हिंदू महासभा, विश्व हिंदू परिषद ज्या गोष्टी करताहेत, आज भारतातला मुस्लीम पाठीमागे राहिलेला आहे, तो अस्वस्थ आहे, तो भयभीत आहे, तो भारताच्या लोकसंख्येच्या प्रमाणात २० कोटी आहे, याचे काय करायचे? मी एक मानतो, की माणूस भारतीय असो किंवा पृथ्वीच्या पाठीवरच्या कुठल्याही देशाचा असो, तो माणूस एखाद्या निसर्गचित्राचे चित्र नसतो, तर माणूस प्रतिक्रिया देत असतो आणि त्याला प्रतिक्रिया देण्याची संधी मिळाली, तर तो पेटून उभा राहू शकतो. प्रत्येकाला संधी हवी असते.

**अराजकतेचे पहिले बळी ठरतात स्त्रिया व गरीब!**

ज्यावेळी इस्लामबद्दल भाजपच्या प्रवक्त्या बोलल्या, त्यावर मुसलमानांनी प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत आणि आपण हे विसरता कामा नये. आज भारतातील प्रत्येक धर्म, प्रत्येक धर्मपंथ आपल्या सुरक्षेसाठी संघटित होतोय आणि तो आपल्या सुरक्षिततेचे सर्व मार्ग चोखाळणार आहे. ते हिंसात्मक असतील, अहिंसात्मक असतील, प्रेमळ असतील, ते खोलही असतील, हे आज कोणी सांगू शकत नाही. म्हणून आज असे वाटते, की पूर्णपणे अराजक आहे. कोणीही बुलडोझर चालवते आणि कोणाचेही घर पाडते, कोणीही उठते आणि रस्त्यावरची स्त्री उचलून तिच्यावर बलात्कार करते, कोणीही उठते आणि मुलीवर बलात्कार करते, भारतामध्ये कोणीही उठते आणि अस्पृश्यांना नंगे करून चाबकाने मारते, कोणीही उठते आणि अस्पृश्य स्त्रियांची बलात्कार करून नग्न धिंड काढते. सरकारच्या वतीने कोणीही काहीही बोलत नाही. या बलात्कार झालेल्या मुलींवर घासलेट ओतून पेटविले जाते, तरीही कोणी फारसे बोलत नाही. तरीही भारतीय जनता पक्ष निवडणूक जिंकू शकतो. कारण त्याला निवडणुका जिंकण्याचे तंत्र माहीत आहे. म्हणून हे अराजक आहे. जेव्हा एखाद्या देशात अराजक येते त्यावेळी त्याचे बळी सर्वांत पहिल्या स्त्रिया पडतात आणि त्यानंतर गरीब.

**...तर भारत संपूर्ण जगाचा विश्वगुरू बनेल**

जागतिक भांडवलशाही हे प्रयोग करते आहे, असे मला वाटते. तो जो प्रयोग आहे तो अतिशय विलक्षण आहे. कारण जगामध्ये सर्व देशांत भांडवलशाहीला अंतर्विरोध आहे. अमेरिकेतसुद्धा दारिद्र्य आणि बेकारी वाढतेय. युरोपातल्या अनेक देशांमध्ये तीच स्थिती आहे. भांडवलशाही तिच्या अंतर्विरोधात सापडली आहे. लोकशाहीच्या मार्गाने जर सत्ता मिळविता येत नसेल, तर भांडवलशाही ही 'फॅसिस्ट' होऊ शकते आणि तिचे उदाहरण जर्मनी आणि इटलीने आपल्याला देऊन ठेवलेले आहे. आज भारतामध्ये जो प्रयोग सुरू झालेला आहे, त्याकडे कोणाचे लक्ष जात नाही. अराजकतेतसुद्धा भांडवलशाही कशी सुरक्षित ठेवता येईल? याचा एक प्रयोग भारतामध्ये चालू आहे. जर भारतामध्ये हा प्रयोग यशस्वी झाला, म्हणजे अराजक तसेच राहू द्यायचे आणि भांडवलशाहीच्या हातामध्ये संपूर्ण सत्ता केंद्रित ठेवायची. अराजकतेला हुलकावणी द्यायची. थोडे इकडे, तिकडे करायचे. ज्याची वाफ गरम करायची, थोडीशी वाफ त्याच्यातच सोडून द्यायची. वॉशसोडा सुटा करायचा म्हणजे पुन्हा ते शांत होतात. हे अराजक असेच चालू द्यायचे आणि भांडवलशाही सुरक्षित ठेवायची. हे भारताचे एक मॉडेल जगासमोर आहे आणि संपूर्ण जग यादृष्टीने भारताकडे बघते आहे. भांडवलशाही देश यादृष्टीने आपल्याकडे बघतात. समजा, देशात अराजक आले तरीसुद्धा भांडवलशाही कशी सुरक्षित राहू शकते, हे जर भारताने जगाला दाखवून दिले, तर भारत संपूर्ण जगाचा विश्वगुरू बनेल. तो या अर्थानेही अराजकातेतसुद्धा भांडवलशाही कशी सुरक्षित ठेवता येते, याचा यशस्वी प्रयोग भारतात होऊ शकतो आणि मग आपण विश्वगुरू होऊ शकतो.

**'येलो फेयरिंग'चे परिणाम आज श्रीलंका भोगतोय**



विश्वगुरू होण्याचा अर्थ हा आहे, की अराजकतेतसुद्धा भांडवलशाहीच्या हातात सरकार कसे राहील, ते कसे सुरक्षित राहील, ते यात यशस्वी कसे होतील, हा त्या विश्वगुरूचा अर्थ आहे. तेव्हा यादृष्टीने भारत विश्वगुरू होईल; परंतु जसे मी आता सांगितलेय, की माणूस हा प्रतिक्रिया देणारा प्राणी आहे आणि तंत्रज्ञानाने ही गोष्ट केलेली आहे. छोटी-छोटी मुलेसुद्धा आता झोपडपट्ट्यांमध्ये हातबॉम्ब बनवू शकतात. सहजासहती बनवू शकतात. त्यामुळे



उद्याची मला याची चिंता आहे, की हा ८० कोटी निरुपयोगी लोकांचा समुदाय आहे. तो उठेल, त्याला आत्मभान येईल, तो मरायला तयार होईल, तो आपल्या सरणावर जायला तयार होईल (स्वखुशीने), तो विद्रोह करेल आणि या विद्रोहाचे स्वरूप काय आहे? भारताची आजची जी अर्थव्यवस्था आहे. तिच्यात सुधारणा होणे नाही. तुम्ही कितीही म्हणत असलात, आम्ही श्रीलंकेच्या मार्गाने जाणार नाही, तरीही तुम्ही श्रीलंकेचा मार्ग अर्धा पार केलेला आहे. कारण श्रीलंकेलासुद्धा बौद्धराष्ट्र करायचे होते आणि ऐतखाऊ सगळे. तिथले जे भिक्खू आहेत, ज्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या काठमांडूच्या भाषणामध्ये 'येलो फेयरिंग' असा शब्द वापरला होता. म्हणजे हा 'पिवळा धोका' आहे. हा पिवळा धोका श्रीलंकेत कसा झाला आणि त्यांनी तिथल्या हिंदू, मुसलमान, पारशी आणि ख्रिश्चन लोकांविरुद्ध कसे कट केले, श्रीलंका बौद्धराष्ट्र करायचा कसा प्रयत्न केला, त्याचे परिणाम आज श्रीलंका भोगतोय.

**बुद्धाची बौद्ध होण्याची संकल्पना लोकांना समजलेली नाही**

भारतातसुद्धा श्रीलंकेच्या राजकारण्यांसारखेच चाललेले आहे. भारतातले सगळे हे बैरागी आहेत, भिक्खू आहेत, हिंदू महासभेच्या साधू, साध्वी आहेत, ते आणि श्रीलंकेतील भिक्खू यांच्यात काहीही फरक नाही. या आयते खाणाऱ्या लोकांच्या टोळ्या आहेत. बौद्ध धर्मामध्ये बौद्धराष्ट्राची संकल्पना नाही. बौद्ध राष्ट्र कोणतेच होऊ शकत नाही. बुद्धाची बौद्ध होण्याची संकल्पना ही फार वेगळी आहे. ती या लोकांना समजलेली नाही. आज हिंदुत्वाच्या नावावर जे राजकारण होतेय, तसेच राजकारण बौद्ध भिक्खूंनी श्रीलंकेत केले. आपण श्रीलंकेच्या मार्गाने निघालो आहोत. नावे वेगवेगळी आहेत, हे हिंदू पुरोहित आहेत, हे हिंदू साधू आहेत, हे हिंदू माणसे आहेत आणि तिकडे बौद्ध भिक्खू आहेत. यांच्यामध्ये काहीही फरक नाही आहे. त्यामुळे आपण अर्धा अधिक रस्ता श्रीलंकेच्या मार्गाने गेलेलो आहोत. एक गोष्ट खरी आहे, की आज श्रीलंकेमध्ये उपासमारी होतेय, जी माणसे उपाशीपोटी आहेत, तशी माणसे उपाशीपोटी भारतात राहणार नाहीत. कारण या देशातला शेतकरी जागरूक आहे. तो उत्पादनक्षम आहे. तो अन्नधान्याची निर्मिती करण्यात अग्रेसर आहे आणि जोपर्यंत तो यादृष्टीने भक्कम आहे, संघटित होतो आहे, ही खूप चांगली गोष्ट आहे. या देशातील संघटीत होऊन अर्थव्यवस्थेमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी एक वर्षापेक्षा अधिक काळ शेतकरी, अर्थव्यवस्थेत जनतेचा हस्तक्षेप मागतोय, शेतकऱ्यांना न्याय मागतोय. हे भारतीय शासनाला नाही, तर जागतिकीकरणाला आव्हान आहे. ही गोष्ट आपण विसरता कामा नये.

तेव्हा आज जी आवश्यकता आहे. मला असे वाटते, की देशामधल्या या ज्या विखुरलेल्या शक्ती आहेत, ज्या भांडवलशाहीच्या विरुद्ध आहेत, ज्या हिंदुराष्ट्राच्या विरुद्ध आहेत, त्या एकत्रित करणे, त्यांच्यातल्या तरुणांना प्रशिक्षित करणे आणि आरएसएसच्या ज्या प्रमाणात शाखा आहेत, त्याचचप्रमाणे लोकशाहीवाद्यांनी आपल्या विचारांच्या शाखा संपूर्ण देशामध्ये पसरवणे आणि त्यांना लोकशाही, समाजवादीय प्रशिक्षण देणे, धर्मनिरपेक्षतेचे प्रशिक्षण देणे, त्याला धर्माची चिकित्सा कशी करायची हे शिकवणे, धर्माची चिकित्सा करणे म्हणजे धर्माच्या विरुद्ध बोलणे नव्हे. देवाची चिकित्सा करणे म्हणजे देवाच्या विरुद्ध बोलणे नव्हे. देवाची आणि धर्माची निर्मिती ही ऐतिहासिक पातळीवर कशी होत गेली, ते जनतेला कुठपर्यंत उपयोगी पडले, त्यांनी नंतर संपूर्ण जगात रक्ताचे पाट कसे वाहवले, त्याचे स्पष्टीकरण करणे.

कार्ल मार्क्सचे एक छान वाक्य आहे, की ''ज्यावेळी धर्म समीक्षा होईल आणि ज्यावेळी विश्वाच्या मुळाशी माणूस हाच सर्वश्रेष्ठ प्राणी आहे, हे सिद्ध होईल त्याक्षणी धर्मचिकित्सा संपेल, ईश्वराचा शोधही संपेल.'' कारण ईश्वर आणि धर्म यांच्यापेक्षा माणूस श्रेष्ठ आहे. तेव्हा या माणसाच्या श्रेष्ठत्वासाठी, माणसाचे माणूसपण टिकवण्यासाठी ज्या-ज्या काही क्रांतिकारी चळवळी संपूर्ण देशात आणि जगात चालू आहेत, त्याला आपण पाठिंबा देणे, त्यांच्यात सहभागी होणे, त्यांना मदत करणे (आपापल्या कुवतीप्रमाणे), आपल्या कुवतीपेक्षा अधिक सहकार्याची गरज नाही; परंतु प्रत्येक माणसाकडे क्षमता आहे, कुवत आहे, तो तिचा उपयोग करू शकतो आणि त्यांनी तर तिचा उपयोग केला नाही, तर तो घोर अपराध ठरेल. यादृष्टीने असा अपराध कोणी करू नये. आपल्याकडे मर्यादित का होईना असलेल्या ताकदीचा उपयोग करायला भारतीय जनतेला भाग पाडणे, एवढीच गोष्ट आपण करू शकतो. यापेक्षा अधिक काहीही करू शकत नाही! ●●●

**(लेखक ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत आहेत.)**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दृष्टी, दूरदृष्टी आणि इशारे!

**आपला देश अनेक टप्प्यांतून वाटचाल करत गेला आहे, ज्यात डॉ. आंबेडकरांची दूरदृष्टी होती आणि त्यांनी पुरेपूर, समयोचित आणि निःसंदिग्ध असे काही इशारे दिले होते. आज त्यांच्या विचारांना एक नवीन परिमाण आणि महत्त्व प्राप्त झाले आहे. तसेच, ते सखोल अभ्यासाची आवश्यकता असल्याची हाक देत आहे.**



शेषराव चव्हाण

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मते आणि निरीक्षणे अतिशय प्रभावीपणे त्यांची आकलनशक्ती, दृष्टी, दूरदृष्टी व स्पष्टपणाची स्पष्ट साक्ष देतात. त्यांची दूरदृष्टी, त्यांचा पूर्ण प्रामाणिकपणा, सखोलता आणि दृढ निश्चयाचे धैर्य आणि त्यांच्या कार्याप्रती असलेल्या संपूर्ण निष्ठेची प्रशंसा केली पाहिजे. आपला देश अनेक टप्प्यांतून वाटचाल करत गेला आहे, ज्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दूरदृष्टी होती आणि त्यांनी पुरेपूर, समयोचित आणि निःसंदिग्ध असे काही इशारे दिले होते. आज त्यांच्या विचारांना एक नवीन परिमाण आणि महत्त्व प्राप्त झाले आहे. तसेच, ते सखोल अभ्यासाची आवश्यकता असल्याची हाक देत आहे. त्यांचे शब्द शहाणपणाचे आहेत. आपल्या राज्यकर्त्यांनी आणि निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी देशहितासाठी त्यांची पुनरावृत्ती करावी. अन्यथा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे : कोणताही भुकेलेला माणूस एखाद्या टीकाकाराबद्दल सहानुभूती बाळगणार नाही. तो त्याला सांगेल, ''माझ्या प्रिय मित्रा, मी सत्तेत, अधिकारात असलो तरी, माझ्याकडे प्रकरणे व्यवस्थित करण्याचे सर्व कायदेशीर अधिकार असले तरी, तु माझ्याकडून चमत्कार घडण्याची अपेक्षा करू नये. कारण मला वारशाने एक भूतकाळ मिळाला आहे, जो अतिशय निंदनीय आहे.'' जर सरकार ठराविक वेळेत निकाल देत नसेल, लोक हताश होण्याआधी, लोकांत सरकार नसल्याची भावना तयार होण्याआधी, जर आपण संसदेत आपल्या जबाबदाऱ्या ओळखून वाजवी वेळेत लोकांचे कल्याण आणि हित पाहण्याचं काम आपल्या खांद्यावर घेतले नाही, तर या संसदेला जनता अतिशय तिरस्कृत भावनेने पाहिल, याबद्दल माझ्या मनात किंचितही शंका नाही.



लोकप्रतिनिधी कायद्यावरील चर्चेदरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले : शिक्षण ही संसद सदस्यत्वाची एकमेव पात्रता असू शकत नाही. जर मी बुद्धाचे शब्द वापरले, तर माणसाला दोन गोष्टींची आवश्यकता असते. एक ज्ञान आणि दुसरे शील. शीलशिवाय ज्ञान फार घातक आहे; शील सोबत असणे आवश्यक आहे, ज्याचा अर्थ चारित्र्य, नैतिक धैर्य, कोणत्याही प्रकारच्या प्रलोभनापासून



स्वतंत्र राहण्याची क्षमता, एखाद्याच्या आदर्शांशी प्रामाणिक असणे.

**राजकारण्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली खबरदारी लक्षात ठेवावी**

राजकीय पक्ष त्यांच्या स्वतःच्या राजकीय हेतूने या प्रकरणाकडे लक्ष देत नसतील, तर कालांतराने लोक स्वतःच याकडे लक्ष देतील. जे लोक या सभागृहात त्यांचे कार्य योग्यरित्या पार पाडू शकत नाहीत, त्यांना लोक परत निवडून देणार नाहीत. लोकांना परिणाम हवे आहेत, त्यांचे कल्याण व्हावे, अशी त्यांची इच्छा आहे आणि म्हणून या सदनात चांगली माणसे पाठवणे हे एकमेव साधन आहे, ज्याद्वारे ते हा हेतू साध्य करू शकतात.

काळ बदलला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सावध करत म्हणतात, आपल्यासह लोक नवीन विचारधारेने प्रवृत्त होत आहेत. ज्या संविधानात आपण लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांद्वारे चालणारे सरकार हे तत्त्व ठसवण्याचा प्रयत्न केला आहे, ते संविधान टिकवायचे असेल, तर आपल्या मार्गावर असलेल्या दुष्कृत्यांना ओळखण्यात उशीर न करण्याचा आपण संकल्प करूया.

आपल्याला लोकशाही टिकवायची असेल, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर सल्ला देतात, ''आपली सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्याच्या घटनात्मक पद्धतींना आपण घट्ट धरून राहणे, ही पहिली गोष्ट आहे. याचा अर्थ आपण क्रांतीची रक्तरंजित पद्धत सोडली पाहिजे. याचा अर्थ सविनय कायदेभंग, असहकार आणि सत्याग्रह या पद्धतींचा त्याग केला पाहिजे. आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी असंवैधानिक पद्धतींचे मोठ्या प्रमाणात समर्थन होते; परंतु जेथे घटनात्मक पद्धती खुल्या आहेत, तेथे या असंवैधानिक पद्धतींचे समर्थन होऊ शकत नाही. या पद्धती अराजकतेच्या व्याकरणाशिवाय दुसरे काहीच नाहीत आणि त्या लवकर सोडून दिल्या तर आपल्यासाठी चांगले.''

जॉन स्टुअर्ट मिलने लोकशाही राखण्यात स्वारस्य असलेल्या सर्वांना दिलेली सावधगिरी बाळगणे ही दुसरी गोष्ट म्हणजे, एखाद्या महामानवाच्या पाया पडू नये किंवा त्याच्यावर विश्वास ठेवू नये. देशासाठी आयुष्यभर सेवा देणाऱ्या महापुरुषांप्रती कृतज्ञता बाळगण्यात गैर काहीच नाही; पण कृतज्ञतेला मर्यादा असतात. आयरिश देशभक्त डॅनियल ओ कॉनेल यांनी म्हटल्याप्रमाणे, कोणताही पुरुष त्याच्या सन्मानाच्या किंमतीवर कृतज्ञ होऊ शकत नाही, कोणतीही स्त्री तिच्या पवित्रतेच्या किंमतीवर कृतज्ञ होऊ शकत नाही आणि कोणतेही राष्ट्र त्याच्या स्वातंत्र्याच्या किंमतीवर कृतज्ञ होऊ शकत नाही. इतर कोणत्याही देशापेक्षा भारताच्या बाबतीत सावधगिरी बाळगणे अधिक आवश्यक आहे. कारण भारतामध्ये भक्ती किंवा राजकारणात जगातील इतर कोणत्याही देशाच्या राजकारणात खेळल्या जाणाऱ्या भूमिकेच्या तुलनेत अतुलनीय अशी भूमिका बजावतो. धर्मातील भक्ती हा आत्म्याच्या मोक्षाचा मार्ग असू शकतो; पण राजकारणात भक्ती किंवा नायक-पूजा हा अधोगतीचा आणि शेवटी हुकूमशाहीकडे जाण्याचा निश्चित मार्ग आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या सुवर्णमहोत्सवी वाढदिवसानिमित्त म्हटले होते: पंधरा वर्षांपासून तुम्ही माझा जन्मदिवस साजरा करत आहात. मी त्यांना कधीच हजेरी लावली नाही. माझा



त्याला नेहमीच विरोध राहिला आहे. तुम्ही माझा सुवर्णमहोत्सवी वाढदिवस साजरा केला, तो आता पुरे. यापुढे कोणतेही उत्सव होऊ देऊ नका.

कार्लाइलने इतिहासातील महापुरुषांचे वर्णन बँकेच्या चलनी नोटा म्हणून केला. या चालनाप्रमाणे ते सोन्याचे प्रतिनिधित्व करतात. त्या बनावट नोटा नाहीत, हे आपण पाहिले पाहिजे. महापुरुषांच्या उपासनेत आपण अधिक सावध असले पाहिजे. कारण या देशात आपण कदाचित अशा टप्प्यावर पोहोचलो आहोत, की 'पाकीटमारांपासून सावध रहा' या सूचना फलकांच्या बरोबरीने 'महापुरुषांपासून सावध रहा' असे सूचना फलक लावले पाहिजेत.

**संविधानावर**

२५ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेत बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, की संविधानाचे कार्य संपूर्णपणे राज्यघटनेच्या स्वरूपावर अवलंबून नाही. राज्यघटना केवळ विधिमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका यांसारख्या राज्यांचे अवयव देऊ शकते. राज्याच्या या अवयवांचे कार्य लोकहित आणि राजकीय पक्षांची इच्छा या घटकांवर अवलंबून असते. लोकांच्या इच्छा आणि त्यांची धोरणे पार पाडण्यासाठी या अवयवांचे ते साधन म्हणून उपयोग करतील. भारतातील लोक आणि त्यांचे पक्ष कसे वागतील, हे कोण सांगू शकेल? ते त्यांचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या घटनात्मक पद्धतींचा आधार घेतील, की क्रांतिकारक पद्धतींना प्राधान्य देतील?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे मानतात, की सामाजिक आणि आर्थिक लोकशाही हे राजकीय लोकशाहीचे उती आणि तंतू आहेत. ते ताकीद देतात, की वर्गभेद आणि लिंगभेद यांच्यातील असमानता जो हिंदू समाजाचा आत्मा आहे, त्याला अस्पर्शित ठेवणे आणि आर्थिक समस्यांशी संबंधित कायदे करत राहणे, म्हणजे आपल्या राज्यघटनेचा उपहास करणे आणि शेणावर महाल बांधणे होय.

संविधान स्विकारण्यापूर्वी संविधान सभेतील शेवटच्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, की आम्ही किती दिवस हे विरोधाभासाचे जीवन जगणार? सामाजिक आणि आर्थिक जीवनातील समानता आपण किती दिवस नाकारत राहणार? जर आपण दीर्घकाळ ती नाकारत राहिलो, तर आपण आपली लोकशाही धोक्यात घालू. हा विरोधाभास आपण लवकरात लवकर दूर केला पाहिजे, अन्यथा ज्यांना विषमतेने ग्रासले आहे, ते अत्यंत कष्टाने उभारलेल्या राजकीय लोकशाहीच्या संरचनेला उडवून लावतील.

**राष्ट्राची संकल्पना**

राष्ट्र या संकल्पनेकडे लक्ष वेधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले: माझे असे मत आहे, की आपण राष्ट्र आहोत, असे मानून आपण एक मोठा भ्रम जपत आहोत. हजारो जातींमध्ये विभागलेले लोक राष्ट्र कसे असू शकतात? या शब्दाच्या सामाजिक आणि मानसिक अर्थाने आपण अजून एक राष्ट्र नाही, हे जितक्या लवकर लक्षात येईल, तितके आपल्यासाठी चांगले. तेव्हाच आपण राष्ट्र बनण्याची खरी गरज ओळखू आणि ध्येय साध्य करण्याच्या मार्गांचा आणि साधनांचा गांभीर्याने विचार करू. या ध्येयाची पूर्तता करणे खूप कठीण होणार आहे- युनायटेड स्टेट्सपेक्षा ते अधिक कठीण आहे. युनायटेड स्टेट्समध्ये जातीय समस्या नाही. भारतात जाती आहेत. या जाती प्रथमतः देशद्रोही आहेत. कारण त्या समाजजीवनात विभक्तता आणतात. त्या जाती-जातींमध्ये वैमनस्य आणि मत्सर निर्माण करतात. पण प्रत्यक्षात राष्ट्र बनायचे असेल, तर या सर्व अडचणींवर मात केली पाहिजे. जेव्हा राष्ट्र असेल, तेव्हाच बंधुता ही वस्तुस्थिती असू शकते. बंधुत्वाशिवाय, समानता आणि स्वातंत्र्य रंगाच्या कोटांपेक्षा जास्त नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आयुष्यभर जातिव्यवस्थेविरुद्ध लढले. भारतीय जातिव्यवस्थेचा कहर जाणून घेण्यासाठी त्यांचे 'जातीचे उच्चाटन' हे पुस्तक वाचावे लागेल. जातीपातीच्या आरक्षणासाठी सुरू केलेली आंदोलने आणि त्याला नमते सरकार यामुळे मला अशी भीती वाटते, की २१ व्या शतकात जातिव्यवस्था पुन्हा उफाळून येईल की काय?

**(लेखक ज्येष्ठ विचारवंत आहेत.)**

**मूळ लेख इंग्रजीत आहे.**

**भाषांतर प्रा.डॉ. संदीप इंगळे यांनी केलेला असून ते इंग्रजी साहित्याचे अभ्यासक आहेत. (गडहिंग्लज, कोल्हापूर.)**

# स्वातंत्र्याची पंचाहत्तरी आणि संविधानभारत!


**१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले म्हणजे श्रमणसंस्कृतीपासून चालत आलेल्या गणतंत्राला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्याची चळवळ मनुतत्त्ववादाच्या प्रस्थापनेकडे नेण्याचे प्रयत्न झाले; पण भारतीय गणतंत्राशी नाते सांगणाऱ्या आणि त्याच्याशी आधुनिक मूल्यसंकल्पना जोडून घेणाऱ्या नेत्यांच्या भूमिकेला हे स्वातंत्र्य मिळाले होते. त्यामुळेच या १५ ऑगस्टच्या स्वातंत्र्याचे नाते पुरातन काळापासूनच चालत आलेल्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीशी आहे.**



**यशवंत मनोहर**

भारताला स्वातंत्र्य मिळून पंचाहत्तर वर्षे झाली. या स्वातंत्र्यासाठी देशात दीर्घकाळ एक चळवळ सुरू होती. ही चळवळ करणाऱ्यांपैकी अनेकांना मृत्यू पत्करावा लागला. याचा अर्थ अनेकांना हे स्वातंत्र्य आपल्या प्राणापेक्षा जास्त मोलाचे वाटत होते, असा आहे. या चळवळीला जवाहरलाल नेहरूंसारखे सेक्युलर आणि पूर्ण आधुनिक वृत्तीचे नेतृत्व प्राप्त झाले. स्वातंत्र्य चळवळीला ही प्रधान बौद्धिक दिशा होती.

हे खरे असले, तरी वेगवेगळ्या मनोवृत्तींच्या समूहांना स्वातंत्र्याचा वेगवेगळा अर्थ अभिप्रेत होता. त्यातल्या एका समूहाची स्वातंत्र्याची कल्पना अशी होती, की इंग्रज या देशातून तातडीने जावेत आणि परत पेशवाईची प्रस्थापना व्हावी. पेशवाईला मनुची समाजरचना अभिप्रेत होती आणि ती चार वर्णांवरच आधारलेली होती. ही ईश्वरनिर्मित समाजरचना होती आणि ब्राह्मण या वर्णाला सुपर मानणारी, ब्राह्मणकेंद्री आणि इतरांवर दास्य लादणारीच ही व्यवस्था होती. इंग्रजांपासून देश स्वतंत्र व्हावा, याचा अर्थ चातुर्वर्ण्याची मनुची समाजरचना पुन्हा प्रस्थापित व्हावी एवढाच होता. ही खरे म्हणजे देशाच्या स्वातंत्र्याची कल्पनाच नव्हती. इंग्रज येण्यापूर्वी इथे कमी-अधिक दहा टक्के मालकांचा वर्ग होता आणि नव्वद टक्के लोकांचा गुलामांचा वर्ग होता. इंग्रजी राजवटीने सार्वत्रिक शिक्षण सुरू केले, कायद्याची समानता सुरू केली आणि आधुनिक मूल्यांचे शिक्षण सुरू केले. यामुळे पेशवाईतील दहा टक्के मालकांचे नव्वद टक्के दास स्वतंत्र व्हायला लागले होते आणि या नव्वद टक्के दासांचे मालक इंग्रजांचे गुलाम झाले होते. म्हणजे इथे इंग्रजांमुळे दोन चळवळी सुरू झाल्या होत्या. एक चळवळ नव्वद टक्के लोकांची पेशवाईपासून किंवा मनुपासून मिळवायच्या स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली आणि पेशवाईच्या वारसदारांची आपले प्रभुत्व वा आपली सत्ता पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी ही एक चळवळ सुरू झाली होती. म्हणजे इंग्रजी सत्तेमुळे एतद्देशीय दासांचे मालक गुलाम झाले होते आणि एतद्देशीय दास स्वतंत्र होण्याची प्रक्रियाही सुरू झाली होती.




**एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर दोन स्वातंत्र्य चळवळी सुरू झाल्या**

या काळात पूर्वापार गुलामांच्या स्वातंत्र्याच्या चळवळीचे सरसेनापती जोतीराव फुले हे होते, तर पेशवाईतील मालकांच्या स्वातंत्र्याच्या चळवळीचे नेते चिपळूणकर आणि टिळक होते. तेल्यातांबोळ्यांबद्दल टिळक काय म्हणाले होते, ते आपल्याला माहीत आहेच. याचा अर्थ दोन वेगवेगळ्या अर्थांच्या स्वातंत्र्य चळवळी एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर सुरू झाल्या, असेच म्हटले पाहिजे. एका स्वातंत्र्य चळवळीचे नाव ‘आधी सामाजिक’ असे होते, तर दुसऱ्या स्वातंत्र्य चळवळीचे नाव ‘आधी राजकीय’ असे होते. ‘आधी सामाजिक’ स्वातंत्र्य चळवळीला राजकीय स्वातंत्र्य

हवेच होते; पण 'आधी राजकीय' स्वातंत्र्य चळवळीला 'सामाजिक स्वातंत्र्याची चळवळ' नष्ट करून मनुची चातुर्वर्ण्याची समाजव्यवस्था आणायची होती.

१८५७ मध्ये इंग्रजी राजवटीविरुद्ध एतद्देशीय संस्थानिकांनी वा राजेरजवाड्यांनी बंड केले. ते देशाच्या स्वातंत्र्यासाठी नव्हते. ते त्यांच्या सत्ता किंवा राज्ये पूर्ववत ठेवण्यासाठी होते. ते येथील लोकांच्या स्वातंत्र्यासाठी बंड नव्हते, तर येथील नव्वद टक्के लोकांच्या स्वातंत्र्याविरुद्ध बंड होते. ही पूर्वदिव्याच्या प्रस्थापनेचीच चळवळ होती. पुढे या दोन चळवळी मागे पडत गेल्या आणि फुल्यांना अभिप्रेत स्वातंत्र्य चळवळ म्हणजे सामाजिक स्वातंत्र्यासाठी राजकीय स्वातंत्र्य ही संयुक्त चळवळ रूप घेत गेली. स्वातंत्र्य चळवळीतील आधुनिक मूल्यांचा पुरस्कार करणाऱ्या गटाला प्राधान्य मिळाले. या गटाच्या हातात सत्ता गेली. त्यामुळे सेक्युलर आणि समाजवादी संविधान भारताला मिळाले.

**सर्वांनी भारतीय पलीकडे काही नको, हीच भूमिका घ्यावी**

स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी पंडित नेहरू 'आपण सारे नवसृजनाची, नवजीवनाची नवी वाट बघत आहोत.' असे म्हणाले. हे नव्या भारताचेच स्वप्न होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९३८ सालीच म्हणाले होते, की ''मी कोणत्याही प्रकारचा प्रांतभेद मानीत नाही. इतकेच नव्हे, तर महाराष्ट्रीय म्हणून घेण्यास भूषण मानीत नाही. तसेच, भाषा, प्रांतभेद, संस्कृती वगैरे भेदभाव मी कधीच पाळू इच्छित नाही. प्रथम हिंदी, नंतर हिंदू किंवा मुसलमान हेही तत्त्व मला मान्य नाही. सर्वांनी प्रथम भारतीय, शेवटी भारतीय, भारतीय पलीकडे काही नको, हीच भूमिका घ्यावी.'' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची हीच इंडियासंबंधीची आयडिया होती. अशीच जवाहरलाल नेहरूंचीही नवभारताची आयडिया होती. स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतरचा भारत कसा असावा, याचे चिंतन हे प्रज्ञावंत नेते करीत होते. आयडिया ऑफ इंडिया म्हणजे सेक्युलर समाजवादी भारतीयत्व! 'आम्ही भारताचे लोक'मध्ये हीच भारतीयता आहे. ती धर्म, जात, संस्कृती, प्रांत यांच्या अतीत अशी भारतीयत्वाची मांडणी करते. भारतीय संविधानात हीच 'आयडिया ऑफ इंडिया' आहे.



'भारतीय' हा केवळ एक शब्द नाही. ती एक मूल्यसंकल्पना आहे. मेहरगड, मेलुहा, सिंधू या मार्गाने चालत आलेली श्रमणसंस्कृती भारतात आहे. ती इहवादी आणि सममूल्यवादी संस्कृतीच आहे. ती गणांची लोकशाहीवादी संस्कृती आहे. गणतंत्र हा शब्द तिथून आलेला आहे. या संस्कृतीत अनेक स्त्रीगण होते. त्यांच्या प्रमुख स्त्रियाच होत्या. इथे राजेशाही नाही, लोकतंत्र आहे. ही मुळात अरीय किंवा आर्य म्हणजे श्रेष्ठ संस्कृती होती. इ.स. पूर्व ३००० मध्ये आलेल्या पर्शियन वैदिकांनी ही गणतंत्रव्यवस्था नष्ट करून पुढे वेदांमधून एकाच वर्णाचे वर्चस्व प्रस्थापित करणारी वर्णव्यवस्था उभी केली. ही एकवर्णाधिकारशाहीच होती. गणतंत्राचा आणि एकवर्णाधिकारशाहीचा संघर्ष तेव्हापासून सुरू झाला आणि आजवर तो सुरूच आहे. गणतंत्राच्या स्वातंत्र्याची ही चळवळ इ.स. पूर्व ३००० पासून सुरू आहे.

**इहवादी आणि सर्वहितमय सममूल्यांची व्यवस्था म्हणजे भारतीयता**

गणतंत्र म्हणजे लोकशाही ही विदेशी संकल्पना नव्हे. चातुर्वर्ण्य आणि त्यातील एका वर्णाला सुपरवर्ण ठरवणे ही गैरभारतीय संकल्पना आहे. या गैरभारतीयत्वाने कोंडलेली ही लोकशाही बुद्धाच्या, अशोकाच्या काळात स्वतंत्र झाली. पुष्यमित्र शुंगाने मनुस्मृतीमधील चातुर्वर्ण्य अधिकच क्रूर रूपात प्रस्थापित करून ही लोकशाही मोडीत काढली. यादवकाळात ही लोकशाही परत गाडली गेली. शिवाजीराजांनी तिला परत जिवंत करण्याची एक व्यवस्था उभी केली. परत पेशवाईत ही लोकशाही गावकुसाबाहेर फेकली गेली. गळ्यात गाडगे आणि कमरेला फांदी बांधलेल्या अस्पृश्यांप्रमाणे लोकशाही अवमानित केली गेली. जोतीराव फुले, शाहू राजे यासारख्या काही समानुष प्रज्ञांनी लोकशाहीच्या स्वातंत्र्याची चळवळ उभारली. ही इहवादी आणि सर्वहितमय सममूल्यांची व्यवस्था म्हणजे भारतीयता! आपले संविधान याच भारतीयतेचा बुलंद आवाज झाले आहे.

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले म्हणजे श्रमणसंस्कृतीपासून चालत आलेल्या गणतंत्राला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्याची चळवळ मनूतत्त्ववादाच्या प्रस्थापनेकडे नेण्याचे प्रयत्न झाले; पण भारतीय गणतंत्राशी नाते सांगणाऱ्या आणि त्याच्याशी आधुनिक मूल्यसंकल्पना जोडून घेणाऱ्या नेत्यांच्या भूमिकेला हे स्वातंत्र्य मिळाले होते. त्यामुळेच या १५ ऑगस्टच्या स्वातंत्र्याचे नाते पुरातन काळापासूनच चालत आलेल्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीशी आहे.

**शोषणसत्ताकांना निर्मूल करणारा गाभ्याचा मुद्दा**

मुळात गणतंत्रवादी नेत्यांनी मिळवलेले हे स्वातंत्र्य स्वातंत्र्यच नव्हे, ती भीक आहे, असे काही लोक मानतात. याचे एकमेव कारण या स्वातंत्र्यात पेशवाईच्या पुनःस्थापनेला कुठेच जागा नव्हती, हे आहे. म्हणून या स्वातंत्र्याला स्वातंत्र्य न म्हणणाऱ्यांची एक चातुर्वर्णी परंपरा आजवरही इथे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या इहवादी आणि सममूल्यवादी अजिंक्य तत्त्वज्ञानाचा आवाज या संविधानात आहे. हे संविधान मान्य न करणारे मूलतत्त्ववादी वा पेशवाईतत्त्ववादी लोक संविधाननिर्मितीच्या काळातही होते. त्यांचा सर्वांत मोठा आरोप संविधानावर हा होता, की चातुर्वर्ण्य, सामाजिक, आर्थिक आणि स्त्री-पुरुषविषमता, देव-दैव, अंधश्रद्धा या सर्व गोष्टी संविधानाने पार निकालातच काढल्या आहेत; पण हाच तर सर्वच शोषणसत्ताकांना निर्मूल करणारा गाभ्याचा मुद्दा आहे.

**भारतीय संविधानाने अस्पृश्यता नष्टच केली**

संविधानाने मूलभूत अधिकारांशी विसंगत असलेले आधीचे सर्व कायदे रद्द ठरविले. मूलभूत अधिकारांची पायमल्ली करणारा कोणताही कायदा यापुढे करता येणार नाही. (अ.१३) म्हणजे भूतकाळातील अमानुषता नष्ट केली आणि पुढल्या काळात तशी अमानुषता निर्माण होणार नाही, याचीही तरतूद करून ठेवली. पूर्वी चारही वर्णांच्या लोकांना वेगवेगळे कायदे होते, वेगवेगळा न्याय

होता. एकाच गुन्ह्याच्या चार वर्णांतील लोकांसाठी वेगवेगळ्या शिक्षा होत्या. आता संविधानाने कायद्यापुढे सर्वांची समानता प्रस्थापित केली. (अ.१४) पूर्वी धर्म, वंश, जात, लिंग वा जन्मस्थान अशा कारणांवरून भेदभाव केला जाई. संविधानाने या प्रकारे सर्व भेदभाव करण्यावर बंदी घातली. (अ.१५) सार्वजनिक जलस्थळे सर्वांसाठी खुली केली. पूर्वी मनुस्मृतीनुसार काही वर्णांतील लोकांना विशेष संधी असे; पण संविधानाने सर्वांना समान संधी दिली. (अ.१६) पूर्वी अस्पृश्यता ईश्वरी मानली जाई आणि अस्पृश्यतेचे पालन पुण्यप्रद मानले जाई; पण भारतीय संविधानाने अस्पृश्यता नष्टच केली आणि तिचे पालन हा शिक्षापात्र गुन्हा ठरवला. (अ.१७) पूर्वी वरच्या वर्णांनाच भाषणाचे आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य होते. संविधानाने हे स्वातंत्र्य समप्रमाणात सर्वांनाच दिले. पूर्वी विषमतेला सभ्यता मानले जायचे, आता परस्परसन्मान ही नवी सभ्यता संविधानाने निर्माण केली. पूर्वी वर्णरचनेला, विषमतेच्या उतरंडीला सद्विवेक मानले जायचे, आता संविधानाने हा सद्विवेक केवढा असद्विवेक होता, ते सांगितले आणि सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता आणि आरोग्य जपणाऱ्या सर्वोपकारक माणुसकीला सद्विवेक म्हणून प्रस्थापित केले. समाजाच्या ऐहिक उन्नयनासाठी शासनाला कायदे करण्याचे अधिकार दिले. धर्मस्वातंत्र्य दिले; पण त्याची व्यक्तीचे मन वा घर ही मर्यादा आखून दिली. शासन करणाऱ्यांना धर्मातीतता अपरिहार्य ठरविली. (अ.२५) सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय सर्वव्यापी असलेली समाजव्यवस्था निर्मिण्याचा अधिकार दिला आणि जनसामान्यांच्या हिताला सर्वाधिक उपकारक होईल, या रीतीने भौतिक साधनसामग्रीचे आणि संधीचे वाटप सांगितले. समाजवादाची पायाभरणी केली. (अ.३९) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जनजाती यांचे प्राधान्याने शैक्षणिक आणि आर्थिक हितसंवर्धन करण्याची आणि त्यांचे सामाजिक अन्याय तसेच सर्व प्रकारचे शोषण यापासून संरक्षण करण्याची जबाबदारी संविधानाने शासनावर टाकलेली आहे. (अ.४६) भारताच्या सार्वभौमतेचे आणि ऐक्याचे संवर्धन करणे, धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन अखिल भारतीय लोकांमध्ये एकोपा व बंधुभाव वाढवणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या सर्व प्रथांचा त्याग करणे, भारताच्या संमिश्र संस्कृतीचे मोल जपणे, पर्यावरणाचे संवर्धन करणे, भारतीय लोकांमध्ये विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद, चिकित्साबुद्धी आणि पुनर्रचनाशीलता या गोष्टी वाढीला लावणे (अ.५१) आणि विज्ञाननिष्ठ मानवतावाद या पायाभूत मूल्यांवर अधिष्ठित स्वातंत्र्यमय, समतामय, बंधुतामय आणि एकन्यायी समाज वास्तू निर्माण करणे आणि याच वैश्विक मूल्यांवर आधारलेला समान नागरी कायदा निर्माण करणे (अ.४४), अशी जबाबदारी संविधान शासनकर्त्यांवर सोपवते आणि या संविधानाचे पालन करणेही अनिवार्य करते.

१९४७ साली मिळालेल्या स्वातंत्र्याने संविधानात स्वतःची मूल्यसंहिता अशी शिल्पित केली. ही मूल्यसंहिता भारतीयच आहे. गैरभारतीयांची समाजसंहिता चातुर्वर्ण्याची, एका वर्णाच्या सुपरत्वाची आणि इतरांच्या मानसिक पारतंत्र्याची मांडणी करीत होती. हे शिरोवर्णाचे स्वातंत्र्य होते आणि इतरांचे पारतंत्र्य होते. भारतीय समाजरचनेची संहिता मात्र सर्वहितमय होती. या भारतीयत्वाला गैरभारतीयत्वाने आजवर विरोधच केला. १९४७ चे स्वातंत्र्यही गैरभारतीय समूहाच्या शोषणव्यूहाला मिळाले नव्हते. ते मिळाले असते, तर पेशवाईची पुनःस्थापना त्यांना तेव्हाच सहज करता आली असती; पण मेहरगडपासून चालत आलेल्या भारतीय धारणेच्या पाइकांमुळे ते शक्य झाले नाही आणि संविधानाने तर देशातील एकूणच गैरभारतीय विषमतासत्ताकाला आणि शोषणसत्ताकाला कणभरही कुठे वाव ठेवला नव्हता. या वैदिक विषमतासत्ताकाचा संपूर्ण अंतच भारतीय संविधानाने केला होता. त्याचे वर्चस्व, त्याची एकाधिकारशाही वा त्याचे विशेषाधिकार संविधानाने रद्दबातल केले होते.

आजवरही देशातील गैरभारतीय लोक, देशाने भारत हे नाव गौरवाने घेतले असले, तरी त्याला भारत होऊ देत नाहीत. येथील लोकांनी जाती, धर्म, वर्ण आणि पोटजातींमध्येच राहावे. त्यांनी एक हृदय, एकचित्त भारतीय होऊ नये, यासाठी आधीप्रमाणेच ते स्वातंत्र्योत्तर काळातही योजना राबवत आहेत.

**भारतीय आणि अभारतीय**
**मूल्यपरंपरांचा स्वातंत्र्याचा अर्थ परस्परविरोधी**

प्राचीन भारतीय गणतंत्र परंपरेला मिळालेले स्वातंत्र्य मनुसत्ताकाच्या परिवाराला स्वातंत्र्यच वाटत नाही. ते त्यांना त्यांचे पारतंत्र्यच वाटते. म्हणून ते २०१४ मध्ये त्यांना स्वातंत्र्य मिळाले, असे सांगतात. स्वातंत्र्य चळवळीतील गणतंत्रवाद्यांना १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले ते आता पंचाहत्तर वर्षांचे झाले आहे आणि पेशवाईच्या वारसदारांना २०१४ साली मिळालेले स्वातंत्र्य आठ वर्षांचे झाले आहे. संविधानवाले आपले स्वातंत्र्य गमवायला तयार नाहीत आणि संविधानाने ज्यांचे वर्चस्वाचे आणि एकाधिकाराचे हक्क काढून घेतले ते २०१४ साली त्यांना मिळालेले स्वातंत्र्य धर्मराष्ट्रात रूपांतरित करू पाहत आहेत. या दोन्ही गोष्टी प्राधान्याने हे सत्य सांगतात, की भारतीय आणि अभारतीय या मूल्यपरंपरांचा स्वातंत्र्याचा अर्थ असा परस्परविरोधी आहे.

स्वातंत्र्याचा अर्थ स्वातंत्र्याच्या चळवळीने निश्चित केला होता. स्वातंत्र्याच्या चळवळीत प्रबोधनाची आणि संकल्पना आता संविधान निर्माण आधुनिक मूल्यांची सरशी झाली होती. भूतकाळातील सर्व शोषणसत्ताकांना नकार देणाऱ्या आणि नवा इहवादी आणि समन्यायवादी भारत जन्माला घालू इच्छिणाऱ्या नेतृत्वाने या स्वातंत्र्याला सर्वसमावेशक अर्थ दिला होता आणि तो अर्थ भारतीय संविधानाने भारताचे ध्येय म्हणून मांडला होता. स्वातंत्र्य, भारत आणि संविधान या तिन्ही संकल्पना आता एकार्थीच झाल्या होत्या. स्वातंत्र्य भारताला मिळाले होते आणि भारताने आपले सकल स्वातंत्र्याचे संविधान निर्माण केले होते. स्वातंत्र्य, भारत आणि संविधान या त्रिसरणाचा अर्थ माणसाला जीवनाचा एकमेव महानायक करणे हाच होता. स्वातंत्र्य इथल्या कोणा धर्माला मिळाले नव्हते. कोणा वर्णाला वा कोणा जातीला मिळाले नव्हते. हे स्वातंत्र्य कोणत्याही दैवी शक्तीला, अंधश्रद्धांना, धार्मिक ग्रंथाला वा कोणा एखाद्या सुपरवर्णाला, असत्याला, द्वेषाला, क्रौर्याला वा अमानुषतेला मिळाले नव्हते. हे स्वातंत्र्य भारतीयांना भारताचे, भारतातील सर्व

लोकांचे सर्वांगीण स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यासाठी मिळाले होते. हे स्वातंत्र्य मनाचे स्वातंत्र्य निर्माण करण्यासाठी आणि आपल्यात सर्वमानवसमभावी कुंपणातीत भारतीयत्व निर्माण करण्यासाठी मिळाले होते. जगभरच्या लोकांच्या जीवनातील ही अनेक स्वातंत्र्ये परतंत्रच आहेत आणि स्वतंत्र असल्याच्या भ्रमात लोक पारतंत्र्यच एन्जॉय करीत आहेत. म्हणून संविधानात संविधाननिर्मात्याने हाच स्वातंत्र्याचा सिद्धांत मांडलेला आहे. स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या तीन संकल्पनांवर विश्वनैतिकतेची वास्तू उभी आहे. जो माणूस मनाचे सर्वांगीण स्वातंत्र्य प्राप्त करू शकत नाही, त्याला विश्वबंधुतेशी नाते जोडता येणार नाही आणि न्याय या मूल्याचा अंतरिक्षाएवढा अर्थही कळणार नाही. भारतीय संविधानात हा सिद्धांतच सूर्यासारखा प्रकाशतो आहे. हा स्वतंत्र, बंधुतामय आणि न्यायनिष्ठ माणूस निर्मिण्याचाच सिद्धांत आहे. या सिद्धांतालाच भारतीय विधान म्हटले जाते.

**इहवादी भारतीयत्व अमान्य करणारे लोक आजही भारतात आहेत**

या सिद्धांताची अनिवार्य इच्छा ही आहे, की देशातले शूद्र, अतिशूद्र, स्त्रिया, आदिवासी, भटके-विमुक्त, मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, जैन, बौद्ध हे सर्वच भारतीय ठरावेत. स्वतःला त्यांनीच गर्वाने भारतीय म्हणावे. आपल्या जुन्या सीमांचे विसर्जन करून स्वतःचे केवळ आणि केवळ भारतीय म्हणून सर्जन करावे. अशी कळकळ या सिद्धांतात आहे; पण हे वर्णातीत, जात्यतीत, धर्मातीत, असे इहवादी भारतीयत्व अमान्य करणारे लोक आजही भारतात आहेत.

**स्वातंत्र्य ७५ वर्षांचे होऊनही भारत संविधानभारत का होऊ शकत नाही?**

इथे शूद्र, अतिशूद्र, वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण, आदिवासी, भटके-विमुक्त, बौद्ध, शीख, जैन आहेत. हे सर्व कोणत्या तर्काने हिंदू होऊ शकतात? मग हिंदू नावाचे राष्ट्र कोणासाठी? असे प्रश्न आहेत. जोतीराव फुले म्हणतात, त्याप्रमाणे 'मोघम नाव हिंदूचे आणि फायदा घेणारे एकटे ब्राह्मण.' मुसलमान, बौद्ध यांच्याविरुद्ध भांडणे पेटवण्यासाठी आणि चातुर्वर्ण्य वा जाती मजबूत करण्यासाठी हिंदू ही निराशय कल्पना वापरली जाते. ब्राह्मणवर्चस्व असलेली समाजरचना निर्माण करण्यासाठी बाकीच्यांमध्ये भोळसटपणा निर्माण करावा लागतो, तो वाढवावा लागतो आणि तो संपणार नाही, याची सतत व्यवस्थाही करावी लागते. संविधानाने या वर्चस्वाची मुळेच नष्ट केली आहेत. कोणाच्याही वर्चस्वाचे सर्व मार्गच संविधानाने रद्द केले आहेत. संविधानाला विरोध कोणाचा आणि का, या प्रश्नाचे उत्तर इथे मिळते आणि स्वातंत्र्य पंचाहत्तर वर्षांचे होऊनही भारत संविधानभारत का होऊ शकत नाही, याही प्रश्नाचे उत्तर इथेच मिळते. धर्मांचा उन्माद, जातींचे पावित्र्य आणि वर्णांची भक्ती निर्माण करणारे लोक भारतीय कसे होऊ शकतात? भारतीयतेला विरोध करण्यासाठी धर्म, जाती, वंश, मूलतत्त्ववाद या सर्व उतरंडींचा पुरस्कार करावाच लागतो. संविधान अडचणीचे कोणासाठी आणि भल्याचे कोणाच्या याचा विचार नव्वद टक्के लोकांनी केला तरी 'भारतीयत्व' प्रस्थापित होण्याचा मार्ग मोकळा होतो.

संविधानाला अभिप्रेत भारतीय माणूस, या माणसाचा भारतीय हा स्वभाव आणि या स्वभावाचा भारतीय समाज निर्माण होणार नाही, याचीच कमी-अधिक काळजी मागल्या काळात आणि त्याची पूर्ण काळजी २०१४ पासून घ्यायला प्रारंभ झाला आहे. सर्वहितमय भारतीयत्व ज्यांना नको आहे, त्यांनी भारतातले संविधानराजकारण संपवले आणि वर्चस्वकारण सुरू केले.

**गोरगरिबांच्या जीवन-मरणाच्या प्रश्नांचा विचारच होत नाही**

आजचे ज्वलंत प्रश्न या वर्चस्वकारणाला प्रश्नच वाटत नाहीत. कोट्यवधी तरुण-तरुणींना रोजगार नाही. महागाईच्या ज्वाला गगनाला भिडलेल्या. गरिबी लोकांच्या जिवावर उठलेली. हजारो कोटींचे कर्ज



बुडवणारे मल्ल्या-मोदी, शेतकऱ्यांचे मृत्यू, शिक्षणाचे खाजगीकरण, स्तरहीन राजकारण, भ्रष्टाचाराचा वणवा, आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री यांच्यावर होणारा हजारो कोटींचा अनावश्यक खर्च, लोक उपाशी आणि लोकप्रतिनिधी चार-पाच वर्षांमध्ये हजारो कोटींचे धनी होतात. अदानी, अंबानी आणि मंदिराजवळ हजारो कोटी आणि बेरोजगार तरुण अभावाच्या आगीत जळणारे, कोणी बोलू नये, लिहू नये, उणिवा काढू नये. विरोध करायचा नाही. असे झाले, तर तुरुंगात डांबले जाईल. देशद्रोही ठरवले जाईल. विरोधी पक्ष नको, विरोधी शिक्षण नको, विरोधी इतिहास नको, विरोधी माणूस नको. विरोधाचे कोणत्याही पातळीवरचे अस्तित्वच नष्ट करण्याचा कार्यक्रम सुरू आहे. स्त्रियांवर होणारे अत्याचार, शैक्षणिक वास्तूंची वाताहत आणि मंदिरासाठी, यात्रांसाठी, कुंभमेळ्यांसाठी कोट्यवधींचा खर्च, हे सर्व करताना गोरगरिबांच्या जीवन-मरणाच्या प्रश्नांचा विचारच होत नाही. उपाशी, अभावग्रस्त लोकांना धर्माची अफू चारली जाते. स्वतःच्याच निकडीच्या प्रश्नांकडे पूर्ण दुर्लक्ष करण्याची क्षमता त्यांच्यात नियोजनबद्ध पद्धतीने वाढविली जाते.

**हा देश परत पुष्यमित्र शुंगाच्या काळात फेकला जाईल**

संविधान (अ.५१) म्हणते त्याप्रमाणे जात, धर्म, वर्ग, पंथ, भाषा, वंश यांच्या अतीत जाऊन लोकांमध्ये बंधुभाव आणि भारतीयता या गोष्टी वाढीस लावायला हव्यात. भारताची लोकशाही जगातली सर्वांत मोठी लोकशाही मानली जाते. भारताची लोकसंख्या ४४० कोटी आहे. १२१ भाषा आणि २७० बोली इथे आहेत. ४६१ जमाती

आणि अनेक धर्म इथे आहेत. हा सर्व वैविध्यपूर्ण भारत एकसंध ठेवणे सोपे नाही; पण संविधानाने तो एकसंध ठेवला आहे. तरी पण भारतीय होणे टाळणारांना आणि एकपक्षी, एकधर्मी वा एकाधिकारी राष्ट्र निर्माण करू इच्छिणाऱ्यांना या देशाची व्यामिश्रता त्रासदायक वाटते. हे लोक या एकसंध देशाला फक्त तोडण्याचे दुःस्वप्न पाहत आहेत. एकधर्मी राष्ट्र निर्माण झाले, तर मुस्लीम, बौद्ध, ख्रिश्चन, आदिवासी, भटके-विमुक्त, चाळीस टक्के स्त्रिया राहणे पसंत करणार नाहीत. त्यांचे एक वेगळे किंवा त्यांची अनेक वेगळी राष्ट्रे निर्माण व्हायला लागतील आणि हा सुंदर, एकसंध आणि सलोखामय देश परत पुष्यमित्र शुंगाच्या काळात फेकला जाईल. मनुस्मृती प्रत्यक्षात आणण्यासाठी त्याला बावीस शतके मागे जावे लागेल. हा प्रवास त्याला आजच्या अख्ख्या जगाच्या विरोधातच जाऊन करावा लागेल. हे ओबीसी, आदिवासी, स्त्रिया, दलित, मुस्लीम, बौद्ध यातील बौद्धिक कणा नसलेल्या लोकांची साथ मिळाल्याशिवाय त्यांना शक्य नाही. हे झाले तरच गुलामांची नवी गुलामी आणि वर्चस्ववाद्यांचे नवे वर्चस्व प्रस्थापित होऊ शकेल, हे त्यांचे सूत्र आहे.

लेखारंभी लिहिल्याप्रमाणे स्वातंत्र्य, भारत आणि संविधान या तिन्ही संकल्पनांचा अर्थ एकच आहे. स्वातंत्र्याला असा सेक्युलर आणि समाजवादी चेहरा देण्यात त्यावेळच्या नेतृत्वाला यश मिळाले होते. १९७६ साली संविधानाच्या उद्देशिकेत सेक्युलर आणि समाजवाद या संकल्पना घातल्या गेल्या. हे खरे असले, तरी १९५० साली डॉ. मुल्कराज आनंद यांनी घेतलेल्या मुलाखतीत डॉ. बाबासाहेबांनी हे स्पष्टपणे सांगितले आहे, की "In our Constitution we have put forward the ideal of a secular, socialist democracy" (Vol.17, Part 1, p. 379) म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पंडित नेहरू यांनी स्वातंत्र्याच्या एका हातात संविधान दिले आणि दुसऱ्या हातात भारताचा ध्वज दिला. हे स्वातंत्र्य देशातील प्रत्येकच माणसांपर्यंत पोहोचावे आणि स्वतःला भारतीय म्हणवणाऱ्यांचा भारत निर्माण व्हावा, ही नवी सर्वहितमय, समन्यायी नीती संविधानाने लोकांच्या मनात प्रकाशस्तंभाप्रमाणे उभी केली. असे स्वातंत्र्य प्रत्येकापर्यंत पोहोचवणे, हे सर्वांगीण स्वातंत्र्य सर्वांच्या मनात तळपत ठेवणे, संविधानातील भारतीय माणूस निर्माण करणे, म्हणजे संविधानभारत निर्माण करणे होय. इहवादी, विज्ञाननिष्ठ आणि सममूल्यतावादी भारत निर्माण करणे होय. मागल्या पंचाहत्तर वर्षांमध्ये असा संविधानभारत निर्माण झाला नाही. का निर्माण झाला नाही? आणि हा संविधानभारत कसा निर्माण होईल, या प्रश्नांची काहीशी संक्षेपाने चर्चा करावयाची आहे.

**भारताचे भारतपण समृद्ध करणारीच संकल्पना**

एक पक्ष एक राष्ट्र, एक धर्म एक राष्ट्र, एक वर्ण एक राष्ट्र, अशा सर्वच गोष्टी लोकशाहीच्या विरोधातच असतात. भारतीय संविधानाचा पायाभूत सिद्धांतच सर्वाधिकार हा आहे. सर्वाधिकारशाही म्हणजे लोकशाही! एकाधिकारशाहीला हुकूमशाही म्हटले जाते. ती लोकशाही नसते. सर्वांच्या सहमतीचे तत्त्व हेच किंवा सर्वसलोख्याचे तत्त्व हेच लोकशाहीचे तत्त्व आहे. धर्मदृष्ट्या इथे संमिश्रता आहे. भाषिक संमिश्रता आहे. भौगोलिक संमिश्रता इथे आहे. आहार आणि पेहरावांची संमिश्रता इथे आहे. ही विविधताच पूर्वी विषमता मानली जात असे; पण भारतीय संविधानाने या विविधतेला भारतीय या सलोख्याच्या सूत्रात एकत्र बांधलेले आहे. ही भारतीयता म्हणजे सर्वांना ऐक्याचे सूत्र देणारी संस्कृती आहे. भारतातील वैविध्यपूर्ण भौतिक जीवनाला एकमय करणारे भारतीयत्व हे संस्कृतीसूत्र आहे. भारतीयता ही सर्वसमभावी नैतिकताच आहे. विविधतेतील एकता असेच या भारतीय संकल्पनेचे स्वरूप आहे. आपल्या स्वातंत्र्याला आपल्या प्रज्ञावंत नेत्यांनी याच भारतीयत्वाचा आशय दिला आहे. ही त्यांची 'आयडिया ऑफ इंडिया' होती. भारतीय संविधानात भारतीयत्वाची हीच संकल्पना आहे. भारताचे भारतपण समृद्ध करणारीच ही संकल्पना आहे.

१९४७ साली मिळालेल्या स्वातंत्र्याला पंचाहत्तर वर्षे झाली आहेत. या स्वातंत्र्याला आपल्या नेत्यांनी भारतीयत्वाच्या निर्मितीशी जोडले, स्वातंत्र्याची समूर्तता या भारतीयत्वाच्या समूर्ततेत त्यांनी बघितली. राजकीय स्वातंत्र्य १९४७ साली मिळाले; पण लगेच या स्वातंत्र्याचे रूपांतर सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्यात होण्याची प्रक्रिया या नेतृत्वाला आणि भारतीय संविधानाला अभिप्रेत होती. १९४७ साली मिळालेले स्वातंत्र्य पुढे संविधानाच्या डोक्याने चालण्याची प्रक्रिया अभिप्रेत होती. जातिविहीन, धर्मनिरपेक्ष, विज्ञाननिष्ठ, समाजवादी भारत जन्माला घालण्याच्या, सर्व भेदांच्या अतीत जाऊन भारतात बंधुभाव आणि भगिनीभाव निर्माण करण्याच्या या प्रक्रियेचे नाव पुढल्या काळात 'स्वातंत्र्य' हेच ठरावे, असे संविधानाला अभिप्रेत होते. आम्ही केवळ आणि केवळ भारतीय लोक आहोत, असे म्हणणाऱ्यांचा आणि तसे जगणाऱ्यांचा भारत या स्वातंत्र्यापोटी जन्माला यायला हवा होता; पण हे घडले नाही, असे अत्यंत खेदाने म्हणावे लागते.

आर्थिक विषमता, जातींचे अहंकार, धर्मांचे आंधळे अहंकार, स्त्रियांवरील, आदिवासी, बौद्ध, मुस्लीम, भटके-विमुक्त यांच्यावरील अत्याचार अतोनातच वाढले. सत्य पराकोटीचे अनाथ झाले. सद्भाव मोडीत निघाला. असहिष्णुता वाढली. क्रौर्य वाढले. सांस्कृतिक, राजकीय दहशत वाढली. विचारस्वातंत्र्य, अभिव्यक्तीस्वातंत्र्य अगतिक झाले. असुरक्षितता मोकाट झाली. विरोधी पक्ष, विरोधी विचार, विरोधी भूमिका या सर्व गोष्टी लोकशाहीच्या नितळपणासाठी आवश्यकच असतात; पण या सर्वच गोष्टी नष्ट करण्याची मोहीम राबविली जात आहे. सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीचे, 'भारतीयत्वाचे' किंवा 'आयडिया ऑफ इंडिया'चे स्वप्न लोकांना कळणार नाही, याची मोठी तरतूद केली जात आहे. सर्वांच्या समान हिताचा, समान सन्मानाचा आणि समान न्यायाचा संविधानातील मूल्यकोश अडगळीत टाकण्यात लोकांना यश यायला लागले आहे. ज्यांच्यासाठी उजेड आहे, तेच उजेडाकडे पाठ फिरवीत आहेत.

स्वातंत्र्याचा प्रारंभ आणि स्वातंत्र्याची पंचाहत्तरी यात मूल्यदृष्ट्या, विरोधसंबंध निर्माण करण्यात जातीयवादी वा धर्मांधशक्ती यशस्वी ठरत आहेत. यावेळी १९४७ साली मिळालेल्या स्वातंत्र्यापासून आणि या स्वातंत्र्याने स्वतःच्या प्रस्थापनेसाठी निर्माण केलेल्या संविधानापासून पुन्हा नव्याने भारत निर्माणाची प्रक्रिया सुरू होण्याची गरज आहे, असे मला वाटते. •••

**(लेखक मराठी कवी, लेखक आणि साहित्य समीक्षक आहेत.)**

# स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तर वर्षानंतर दलित कुठे आहेत?

**‘वर्तमानकाळात जगण्यासाठी भूतकाळाला घडविले जाऊ शकते’**
**– डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

**अनुसूचित जाती दारिद्र्य, अस्पृश्यता आणि जातीय भेदभाव यापासून मुक्त झाल्या आहेत का? मानवी विकास मानकांच्या अनुषंगाने अनुसूचित जातींना उच्च जातींच्या बरोबरीने आणले गेले आहे काय? याचे उत्तर निश्चितपणे नकारात्मक आहे. अनुसूचित जातींच्या जीवनामध्ये सुधारणा झाली असली, तरी ते आत्यंतिक दारिद्र्य, उपासमार, भूक, भेदभाव आणि अत्याचार यांचे बळी आहेत. या यातनांपासून त्यांची सुटका झालेली नाहीये.**



**डॉ. सुखदेव थोरात**

२५ मे १९४९ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांनी अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती यांना राजकीय आरक्षण देण्यासाठीचा मुद्दा संविधान सभेमध्ये मांडला, तेव्हा काही सभासदांनी त्या आरक्षणास विरोध केला आणि इतर काही जणांनी ते केवळ दहा वर्षांसाठी असावे, असे मत मांडले. त्यांनी असा युक्तिवाद केला, की संविधानाने अस्पृश्यतेचे उच्चाटन केल्यामुळे जातीय विषमता नष्ट होईल आणि अनुसूचित जातींना येत्या दहा वर्षांमध्ये उच्च जातींच्या बरोबर आणण्यात येईल. गेल्या पंच्याहत्तर वर्षांमध्ये या राजकीय आरक्षणाला मुदतवाढ देण्यात आली आहे. राजकीय आरक्षणाला वेळोवेळी जी मुदतवाढ देण्यात आली आहे, ते हे दर्शविते, की अनुसूचित जातीच्या जीवनमानात काही सुधारणा दिसत असली, तरी उच्च जाती आणि अनुसूचित जाती यांच्यामधील अंतर आजही कायम आहे. दहा वर्षांची मर्यादा असावी, असा प्रस्ताव ठेवणारे सदस्य लघु दृष्टीचे होते, हे यावरून सिद्ध होते.



**भूतकाळातील असमानता आजही टिकून आहेत**

दलितांची पिळवणूक वा त्यांचे दमन हे अनेक शतकांचे आहे आणि दहा वर्षांच्या अत्यंत अल्प कालावधीमध्ये हे दमन दूर होणार नाही, याची जाणीव संविधानसभेच्या या सदस्यांना झाली नाही. यासंदर्भामध्ये स्वातंत्र्याची पंच्याहत्तर वर्षे पूर्ण होण्याच्या याप्रसंगी हे प्रश्न विचारणे प्रासंगिक आहे. हे प्रश्न पुढीलप्रमाणे आहेत : अनुसूचित जाती दारिद्र्य, अस्पृश्यता आणि जातीय भेदभाव यापासून मुक्त झाल्या आहेत का? मानवी विकास मानकांच्या अनुषंगाने अनुसूचित जातींना उच्च जातींच्या बरोबरीने आणले गेले आहे काय? याचे उत्तर निश्चितपणे नकारात्मक आहे. अनुसूचित जातींच्या जीवनामध्ये सुधारणा झाली असली, तरी ते आत्यंतिक दारिद्र्य, उपासमार, भूक, भेदभाव आणि अत्याचार यांचे बळी आहेत. या यातनांपासून त्यांची सुटका झालेली नाहीये. आंबेडकरांनी असे भाकीत केले होते, की ‘वर्तमानकाळात जगण्यासाठी भूतकाळाला घडविले जाऊ शकते.’ खरोखर स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरदेखील भूतकाळातील असमानता आजही टिकून आहेत. या लेखाच्या उर्वरित भागात मी अस्पृश्यता विरोधी कायदा असतानादेखील व आरक्षण धोरणे असतानादेखील अनुसूचित जाती आत्यंतिक दारिद्र्य आणि जातीय विषमता यांचा

सामना करत आहेत, याचा पुरावा देणार आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाने वापरलेल्या मानवी विकासाच्या प्रमाण मानकांना विचारात घेऊन आपण अनुसूचित जातीचे कल्याण वा त्यांच्या चांगल्या आरोग्य व आनंदी असण्याची स्थिती मोजणार आहोत. त्यामध्ये दरडोई उत्पन्न, दारिद्र्य, कुपोषण, शिक्षण, निवारा, पिण्याचे पाणी, वीज, जीवनेच्छा, आयुर्मान, अस्पृश्यता व अत्याचार यांचा त्यांनी केलेला अनुभव यांचा समावेश आहे.

**दारिद्र्य आणि कुपोषण**

अगदी अलीकडील ताज्या म्हणजे सन २०१२ च्या जातनिहाय आकडेवारीनुसार उच्च जातीचे दरडोई मासिक उत्पन्न हे २,४१३ रुपये एवढे होते, तर ओबीसींचे दरडोई मासिक उत्पन्न हे १,५३१ रुपये एवढे होते आणि अनुसूचित जातीच्या कुटुंबामधील हेच उत्पन्न १,२९४ रुपये एवढे होते. अशा प्रकारे अनुसूचित जातीचे दरडोई उत्पन्न हे उच्च जातींपेक्षा जवळपास निम्मे होते. हे निम्न उत्पन्न अन्न उपभोग आणि इतर अत्यावश्यक गरजांना कमी करते आणि त्यामुळे अनुसूचित जातीला आत्यंतिक दारिद्र्यामध्ये ढकलले जाते. सन २०१२ मध्ये अनुसूचित जातीचे ३०% लोक गरीब होते. उच्च जातीमध्ये ९% लोक, तर ओबीसीमधील २०% लोक गरीब होते. आत्यंतिक दारिद्र्यामुळे अन्न उपभोग कमी होतो, तसेच भयानक कुपोषण होते व आरोग्यावर वाईट परिणाम होतो. सन २०१५-१६ ची आकडेवारी हे दाखविते, की उच्च जातींच्या तुलनेत अनुसूचित जातीचे लोक मोठ्या प्रमाणावर आत्यंतिक कुपोषण आणि रक्तक्षय याचे बळी ठरले. अनुसूचित जातीच्या ३९% बालकांचे वजन प्रमाणापेक्षा कमी होते. ओबीसीमधील ३६% बालकांचे वजन प्रमाणापेक्षा कमी होते व उच्च जातीमधील २६% बालकांचे वजन प्रमाणापेक्षा कमी होते.

त्याचप्रमाणे अनुसूचित जातीमधील ६१% बालके रक्तक्षयग्रस्त होते. ओबीसीमधील ५९% बालके रक्तक्षयग्रस्त होते व उच्च जातीमधील ५५% बालके रक्तक्षयग्रत्त होते.

त्याचप्रमाणे सन २०१५-१६ मध्ये अनुसूचित जातीमधील ५६% स्त्रिया रक्तक्षयग्रस्त होत्या, तर ओबीसीमधील ५२% स्त्रिया रक्तक्षयग्रस्त होत्या आणि उच्च जातीमधील ५०% स्त्रिया रक्तक्षयग्रस्त होत्या. अनुसूचित जातीमधील २५% स्त्रियांचे वजन कमी होते. ओबीसीमधील १७% स्त्रियांचे वजन कमी होते व उच्च जातीमधील २२.६% स्त्रियांचे वजन कमी होते.

**शिक्षण, निवारा आणि पिण्याचे पाणी**

आपण आरोग्याच्या बाबतीत पाहिले. अगदी त्याचप्रमाणे शैक्षणिक उपलब्धी, निवारा, पाणी व इतर सामाजिक गरजा यांच्याबाबत अनुसूचित जाती व उच्च जातीमध्ये अशाच प्रकारची असमानता आपल्याला दिसून येते.

सन २०१४-१५ मध्ये अनुसूचित जातीमधील मुला-मुलींचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेमधील हजेरी पटावरील प्रमाण हे ७३% होते. उच्च जातीमधील मुला-मुलींचे हेच प्रमाण ९७% होते व ओबीसीमधील हे प्रमाण ८०% होते. त्याचप्रमाणे सन २०१८-१९ मध्ये अनुसूचित जातीची उच्च शिक्षणामधील प्रवेशाची टक्केवारी ही २१% एवढी होती. उच्च जातीमधील उच्च शिक्षणाची प्रवेशाची टक्केवारी ४३% व ओबीसीमधील विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणातील ही टक्केवारी २९% एवढी होती. उच्च जातीच्या तुलनेत अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणातील प्रवेशाचे प्रमाण निम्मेच



होते. निवारा, वीज, घरामध्ये पिण्याचे पाणी अशा नागरी सुविधांची उपलब्धता यांच्या अनुषंगाने अनुसूचित जातीची स्थिती वाईट आहे. सन २०१८-१९ मध्ये अनुसूचित जातीमधील १८% लोक तकलादू निवाऱ्यांमध्ये राहत होते. ओबीसीमधील ११% लोक व उच्च जातीमधील ६.७% लोक अशाच तकलादू निवाऱ्यांमध्ये राहत होते. अनुसूचित जातीमधील फार मोठ्या प्रमाणावरील लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहतात. अनुसूचित जातीचे १३% लोक, ओबीसीमधील ६% लोक व उच्च जातीमधील ४.६% लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहतात. त्याचप्रमाणे अनुसूचित जातीमधील ७१% कुटुंबांकडे स्वतःचे शौचालय नव्हते. अशा प्रकारे मानवी विकासाच्या सगळ्या मानकांचा विचार करता अनुसूचित जमातीचे लोक भारतीय समाजाच्या तळपातळीवर आहेत. या सर्वांचा मानवी जगण्यावर परिणाम होतो. मानवी विकासाची ही सर्व मानके आहेत व अनुसूचित जातीच्या लोकांना या मानकांची उपलब्धता फार कमी आहे. सन २०१८ मध्ये अनुसूचित जातीमधील लोकांचे सरासरी आयुर्मान ५५ वर्षे होते. ओबीसीमधील लोकांचे आयुर्मान ५७ वर्षे होते व उच्च जातीमधील लोकांचे आयुर्मान ६० वर्षे होते.

अशा प्रकारे आपण जी कोणती मानके घेऊ आपणाला आंतरजातीय असमानता आजही कायम असलेली दिसून येते व अनुसूचित जातीमधील लोक चांगल्या जीवनमानाच्या अगदी तळपातळीवर असलेले दिसून येतात.

**अस्पृश्यता आणि अत्याचार**

भारतीय राज्यघटनेने अस्पृश्यतेवर बंदी आणली. तसा त्यामध्ये

कायदा करण्यात आला असला तरीही अस्पृश्यता आजही कायम आहे. गेल्या पंच्याहत्तर वर्षांमधील अस्पृश्यतेचा वावर आणि जातीय भेदभाव वा विषमता हे भारताचे सर्वांत मोठे अपशय आहे. सन २००१ ते २०१६ या कालावधील शासनाकडे अस्पृश्यतेच्या २,५७,९६१ एवढ्या प्रकरणांची नोंद झाली होती. अनुसूचित जातीमधील लोकांनी या केसेस नोंदविल्या होत्या. नागरी हक्क कायदा १९५५ व अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ नुसार या केसेस नोंदविल्या गेल्या होत्या. अशा केसेस नोंद होण्याचे वार्षिक सरासरी प्रमाण १६,१२३ एवढे होते.

प्राथमिक अभ्यासाने जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांतील विषमतेच्या स्वरूपाला उघड केले. अखिल भारतीय स्तरावर एक समग्र अभ्यास करण्यात आला. यामध्ये अकरा राज्यांतील पाचशे खेड्यांचा अंतर्भाव करण्यात आला होता. हा अभ्यास इ.स. २००० मध्ये करण्यात आला होता. याशिवाय इतरही अभ्यास करण्यात आले होते. ग्रामीण भागामध्ये आणि नागरी भागामधील नागरी, राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक/धार्मिक वर्तुळांमध्ये मोठ्या प्रमाणावर एखाद्या स्वरूपात किंवा दुसऱ्या स्वरूपामध्ये भेदभावाचा व्यवहार आजही चालूच आहे. १९५५ चा नागरी अधिकार कायदा अनुसूचित जाती/अनुसूचित जमातींना पूर्ण व समान नागरिकत्वाची हमी देण्याचा प्रयत्न करतो.

अभ्यास असे दर्शवितो, की भेदभावाचा व्यवहार हा फार मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक धर्मनिरपेक्ष वर्तुळामध्ये जसे की, स्थानिक सरकारांनी व्यवस्थापन केलेल्या समान सुविधा उदा. पाणी, स्मशानभूमी/दफनभूमी आणि राज्य संस्थांच्या सुविधा उदा. शाळा, आसनव्यवस्था, मध्यान्ह भोजन, पोलीस स्टेशन, सार्वजनिक वाहतूक, प्राथमिक आरोग्य केंद्र, सिनेमा गृह, दलित विवाह मिरवणूक, खेड्यातील सार्वजनिक जमीन आणि स्रोत, तसेच उपाहारगृहामध्ये जाऊन नाश्ता वा भोजन करणे आणि चहाचे दुकान इत्यादी अनुभवास येतो.



राजकीय अधिकार हे नागरिकत्व दर्जाशी फार जवळचे आहेत. त्याचे नाते फार सेंद्रिय स्वरूपाचे आहे. अभ्यास असे निरीक्षण नोंदवतो, की कायदेशीर संरक्षण असतानादेखील दलितांना खेड्यांमध्ये मतदान केंद्रावर त्यांचा मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी प्रवेश करू दिला जात नाही आणि जर त्यांना परवानगी दिलीच, तर त्यांना भेदभावास सामोरे जावे लागते. उदाहरणार्थ, मतदान केंद्रावर त्यांच्यासाठी वेगळी रांग असते. एखाद्या विशिष्ट पक्षाला किंवा व्यक्तीला मतदान करण्यासाठी त्यांच्यावर दबाव टाकला जातो वा तशी सक्ती केली जाते आणि निवडून आलेल्या दलित प्रतिनिधीला खेड्यातील पंचायत कार्यालयात वेगळे बसविले जाते. त्यांना वेगळ्या कपामध्ये चहा दिला जातो आणि त्यांना त्यांचे कप स्वतः धुवावे लागतात. दलितांना खेड्यातील समाजात असलेल्या सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनामध्येदेखील अपवर्जन आणि भेदभावाचा सामना करावा लागतो. त्यांना सामुदायिक अशा सांस्कृतिक व धार्मिक जीवनामध्ये उदा. खेड्यातील सार्वजनिक सांस्कृतिक व धार्मिक सोहळ्यांमध्ये आणि सण वा उत्सवांमध्ये एक तर प्रवेश नसतो किंवा भेदभावजन्य प्रवेश दिला जातो. त्यांना देवस्थानाच्या ठिकाणी आणि मंदिरामध्ये प्रवेश करताना निर्बंधांचा सामना करावा लागतो.

सामाजिक वर्तुळात भेदभाव अधिक निर्बंध घालणारे आहेत. अशुद्ध आणि प्रदूषित म्हणून वागविल्या जात असल्यामुळे त्यांना शारीरिक आणि सामाजिक वर्गीकरणात आणि विलगीकरणास तोंड द्यावे लागते. त्यांचे सामाजिक संबंध किमान पातळीवर येतात आणि त्यांचे उच्च जातीमधील लोकांसोबतच्या आंतरक्रियादेखील किमान होऊन जातात. सध्याच्या काळात खेड्यांमध्ये एक वैश्विक विभक्तीकरणाची पद्धती दिसून येते. त्यास निवास विभक्तीकरण म्हटले जाते. त्यामुळे सामाजिक अंतर आणि विलगीकरणास अधिक मजबूत केले जाते. त्याचा परिणाम असा झाला आहे, की नियमाप्रमाणे दलितांची वस्ती किंवा खेडेगाव वेगळ्या ठिकाणी वसविले जाते. ते गावाच्या परिघावर म्हणजे गावकुसाबाहेर वसविले जाते. उच्च जातींच्या घरांना भेटी देणे, आंतरजातीय जेवणावळी, आंतरजातीय विवाह समारंभ हे सर्व फारच निर्बंधित पद्धतीने पाळले जाते.

भेदभाव करणाऱ्या वर्तणुकीला आर्थिक वर्तुळदेखील अपवाद नाहीये. न्हावी, शिंपी, कुंभार, सुमार, अशा सर्व व्यवसाय करणाऱ्यांकडून दलित समाजाला अन्यायकारक व भेदभाव करणारी वागणूक मिळते.

मजूर म्हणून आणि सेवा देत असताना व व्यवसाय करत असताना

दलितांना भेदभावाला सामोरे जावे लागते. किराणा सामानाचे दुकान, उपाहारगृह, भोजनालय व वाहतूक सेवा यांच्यामध्ये गुंतलेल्या अनुसूचित जातीमधील व्यक्तींना भेदभावाच्या वागणुकीचा सामना करावा लागतो.

परिणामी, त्यांच्या दुकानातील सामान विक्रीवर वाईट परिणाम झालेला आहे, तसेच उच्च जातीचे लोक त्यांच्या वाहतूक सेवांचा फार कमी उपयोग करताना दिसतात. परिणामी, त्यांच्या उत्पदनावर व नफ्यावर नकारात्मक परिणाम झालेला दिसून येतो. शेतकरी दलितांना शेतीसाठी लागणाऱ्या साधनांची जुळवाजुळव करताना व उत्पादित मालाची विक्री करताना भेदभाव करणाऱ्या वागणुकीचा सामना करावा लागतो. व्यक्तीच्या अधिकारावर निर्बंध हा भेदभाव वा अन्यायकारक वागणुकीचा सर्वांत किळसवाणा प्रकार होय. अर्थात, अशी प्रकरणे संख्येने कमी आहेत. काही-काही प्रकरणांमध्ये तर दलितांना नवीन कपडे परिधान करणे, गॉगल वापरणे, चप्पल परिधान करणे किंवा छत्र्या वापरणे आणि सायकल चालविणे यास परवानगी दिली जात नाही. अशा प्रकारे प्रत्येक दलिताला एक व्यक्ती म्हणून असण्याचा अधिकार नाकारला जातोय.

**दलितांना आजही भेदभावाचा सामना का करावा लागतोय?**

वरील पुरावा हे दाखवितो, की जाती आणि अस्पृश्यतेला कायद्याने बंदी आणली व त्यांचा ऱ्हास झाला असला, तरी जीवनाच्या विविध वर्तुळांत दलितांच्या जीवनात त्यांची काही अत्यंत वाईट वैशिष्ट्ये टिकून राहिलेली दिसतात. त्यामुळे दलितांच्या माणूस म्हणून जगण्याच्या मूलभूत हक्कावर गदा आलेली आहे. जाती व्यवस्था आणि अस्पृश्यता कायम राहण्याची काही कारणे आहेत. अनुसूचित जातीमध्ये असलेल्या आत्यंतिक गरिबीची आणि उपासमारीचीदेखील काही कारणे आहेत. जातीची विचारधारा कायम टिकून आहे. जातीची विचारधारा सामाजिक-आर्थिक असमानता आणि जातीय भेदभावाचा मूळ स्रोत आहे. जातीची विचारधारा उच्च जातीच्या आर्थिक आणि सामाजिक हितसंबंधांना जपत असल्यामुळे ती व्यवस्था बदलविण्यासाठी उच्च जातींना कोणतेच लाभ वा फायदे दिसत नाहीत. घटनेमध्ये नमूद केलेल्या कायद्यामधील समानता, कायद्याचे समान संरक्षण, सर्वांना समान संधी, दर्जाची समानता, स्वातंत्र्य, बंधुता इत्यादी गोष्टींसाठी अनुरूप बदल घडविण्यासाठी उच्च जातींना कोणतीच प्रेरणा वा फायदा नाहीये. ही जातीय व्यवस्था 'विचार प्रक्रियांमध्ये दृष्टिकोनांमध्ये, वर्तणुकीमध्ये, श्रद्धांमध्ये' टिकून राहिलेली दिसते आणि अगदी कायदा व धोरण सुधारणा यांची अंमलबजावणी झाल्यानंतरदेखील दलित व निम्न जातींचे दमन केले जात आहे व त्यास मजबूत केले जात आहे. म्हणूनच कायदा आणि प्रत्यक्षातील व्यवहार यांच्यामधील विरोधाभास वाढत जातो आहे.

प्रत्यक्ष व्यवहारात उच्च जाती विशेष अधिकार आणि कायदे यांचा अखंडितपणे लाभ घेत आहेत आणि अस्पृश्यांना समान अधिकार देण्यास नकार देत आहेत. अशा प्रकारे उच्च जातींकडून जातीमध्ये सुधारणा करण्याला जो विरोध केला जातो आहे, तेच जातीय भेदभावाला अखंडितपणे चालू ठेवण्याचे मूळ कारण आहे.

दुसरे कारण म्हणजे कायदा, आरक्षण आणि इतर धोरणे गंभीर अशा मर्यादांमुळे अडखळताना पाहायला मिळतात. नागरी अधिकार कायद्याचे संरक्षण हे प्रत्यक्ष व्यवहारात अशा पद्धतीने वापरले जाते, की अनेक फटी सोडल्या जातात आणि त्यामुळे उच्च जातीमधील व्यक्तींना गंभीर परिणाम भोगावे लागत नाहीत. आरोपीला संरक्षण देण्यासाठी संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा एकत्र येते. आरोपीला गुन्हेगार म्हणून सिद्ध करण्याचे अत्यल्प प्रमाण आणि आरोपीला निर्दोष म्हणून सोडून देण्याचे उच्च प्रमाण अशा आकडेवारीत आपल्याला याचे प्रतिबिंब पाहायला मिळते. आर्थिक वर्तुळात दलितांना जमीन वाटपाची अशीच कथा आपणास पाहायला मिळते. अनुसूचित जातींच्या बाबतीत जमीन वाटपाचे धोरण हे संपूर्ण अपयशी असे प्रकरण आहे. उदाहरणार्थ, धोरणे असूनदेखील दलितांकडे फारच कमी प्रमाणात संपत्तीची मालकी आहे.

सन २०१३ मध्ये देशाच्या एकूण संपत्तीपैकी ४५% संपत्ती उच्च जातींकडे होती. त्यांच्या लोकसंख्येतील एकूण हिस्सेदारीपेक्षा त्यांच्याकडे दुप्पट प्रमाणात संपत्तीचा ताबा होता. म्हणजेच एकूण लोकसंख्येमध्ये उच्च जातींची लोकसंख्या २१% होती आणि



त्यांच्याकडे असणारी संपत्ती मात्र ४५%, असे हे प्रमाण होते. ओबीसींकडे ३१% संपत्तीचा ताबा होता. त्यांची लोकसंख्येतील हिस्सेदारी ३६% होती. ओबीसींचे लोकसंख्येमधील हिस्सेदारीचे प्रमाण व त्यांच्याकडे असणारी संपत्ती यांच्यात फार तफावत दिसून येत नाही. अनुसूचित जातीकडे देशाच्या एकूण संपत्तीपैकी केवळ ७% संपत्ती होती. त्यांचा देशातील एकूण लोकसंख्येमधील वाटा १८.६% एवढा होता. ही तफावत मोठी असल्याचे दिसून येते. अखिल भारतीय स्तरावर प्रत्येक कुटुंबाकडे असणाऱ्या संपत्तीचे सरासरी मूल्य १५ लाख रुपये एवढे आहे. उच्च जाती कुटुंबाकडे २९ लाख रुपये, तर ओबीसी कुटुंबाकडे १३ लाख रुपये आणि अनुसूचित जाती कुटुंबाकडे केवळ ६ लाख रुपये एवढी संपत्ती असल्याचे दिसून येते. उच्च जातीच्या तुलनेत अनुसूचित जातीकडे जवळपास पाचपट कमी संपत्ती होती आणि ओबीसीच्या तुलनेत दुपटीपेक्षाही कमी संपत्ती असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागामधील अनुसूचित जातीचे १५% लोक हे शेतकरी आहेत. ओबीसीमधील २७% लोक हे

शेतकरी आहेत आणि उच्चतर जातींमधील २३% लोक हे शेतकरी आहेत.

जमिनीच्या अल्प मालकीमुळे अनुसूचित जातीमधील ४४% कुटुंबे ही मजुरी करणारी कुटुंबे होती. ओबीसीमध्ये २६% कुटुंबे मजुरी करणारी कुटुंबे होती आणि उच्च जातीमध्ये केवळ ११% कुटुंब मजुरी करणारी कुटुंबे होती. याचा परिणाम समान नागरी आणि राजकीय अधिकार यांचा लाभ घेताना होतो. अनुसूचित जातीच्या लोकांना त्यांच्या खेड्यामधील जगण्यासाठी उच्च जातीच्या लोकांवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे ते भेदभाव आणि अपमान यांना सहन करत आहेत. जमिनीचे असमान वाटप दलितांना नागरी व राजकीय अधिकार समान पद्धतीने मिळविण्यापासून रोखते. समान राजकीय अधिकारांसाठी धोरणांमध्ये तशाच मर्यादा आहेत. आर्थिक अपरिहार्यतेमुळे गरीब अस्पृश्यांना मतदान करणे आणि निवडणूक लढविणे अशा राजकीय अधिकारापर्यंत पोहोचणे खूपदा शक्य होत नाही. जे अस्पृश्य अल्पसंख्य आहेत आणि जगण्यासाठी उच्च जातींवर अवलंबून असतात ते मुक्तपणे व निर्भयपणे त्यांचे राजकीय अधिकार वापरण्यामध्ये अपयशी ठरलेले आहेत.

उच्च जातीचे लोक स्वतःच्या विशेषाधिकारांना व पारंपरिक राजकीय अधिकारांना कमी लेखणार नाहीत, अशा धोरणांना पसंती देतात. उदाहरणार्थ, विधिमंडळामध्ये अनुसूचित जातीसाठी आरक्षणासाठीचे धोरण अशा पद्धतीने तयार केले जाते, की ते अनुसूचित जातीला कार्यकारी मंडळामध्ये व धोरण तयार करण्यामध्ये खरे प्रतिनिधित्व व अवकाश देत नाही. म्हणूनच राजकीय आरक्षण स्वीकारण्याच्या वेळी अनुसूचित जातीची आम्हाला स्वतंत्र मतदारसंघ किंवा पात्र संयुक्त मतदारसंघ देण्यात यावा, ही मागणी नाकारण्यात आली. कारण त्यामुळे त्यांना खऱ्या प्रतिनिधित्वाचे प्रतिनिधित्व मिळण्याची खात्री दिली असती. त्याऐवजी वर्तमान संयुक्त मतदारसंघ स्वीकारण्यात आला, जो त्यांना नावापुरते प्रतिनिधित्व देतो, तो त्यांना परिणामकारक व खरे प्रतिनिधित्व देत नाही. राजकीय अधिकारांसाठी धोरणे महत्त्वाची आहेत. मतदानाचा अधिकार, निवडणूक लढविणे आणि प्रतिनिधित्व करणे, असे अधिकार मिळण्यासाठी धोरणे आखणे महत्त्वाचे आहे; परंतु उच्च जातीचे हितसंबंध विचारात घेऊन ही धोरणे आखली जातात.

सामाजिक संबंध आणि एकात्मता यांच्या संबंधाने परिस्थिती खूपच वाईट आहे. कारण हे सगळे खासगी कार्यक्षेत्रात येते आणि येथे राज्य फार काही करू शकत नाही. अस्पृश्य आणि उच्च जातींमध्ये विशेषतः खेड्यांमध्ये शारीरिक विभक्तीकरण आणि सामाजिक विलगीकरण आजही पाळले जाते. कुटुंबामध्ये मुलांचे सामाजिकीकरण जाती व अस्पृश्यता या गोष्टीला पूरक ठरेल, अशा पद्धतीने केले जाते. मुला-मुलींमध्ये समता आणि बंधुभाव यांच्या बाजूने संवेदशील बनविण्यासाठी कुटुंबामध्ये किंवा शाळांमध्ये अध्यापनातून फार तोकडे प्रयत्न केले जातात. बालकांना समता व बंधुभाव यांच्याबाबत संवेदनशील बनविण्यासाठी कृतींचा अभाव दिसतो.

रोजगारामधील आरक्षणाच्या बाबतीत बोलायचे, तर ज्या खासगी क्षेत्राने देशातील ८०% च्या वर रोजगाराचे क्षेत्र व्यापले आहे. त्या खासगी क्षेत्रात आरक्षण वगळण्यात आले आहे. खासगी क्षेत्रावर आरक्षण बंधनकारक करण्यात आलेले नाहीये. हे समजून घेतलेच पाहिजे, की सार्वजनिक क्षेत्रापेक्षा खासगी क्षेत्रात रोजगार व मजुरीमधील भेदभाव हा खूपच जास्त आहे.

अशा प्रकारे राज्य आणि उच्च जातीकडून जातीची विचारधारा बदलविण्यामध्ये प्रयत्नांचा अभाव आणि त्यातून लोकांचे मत बदलविण्यामध्ये येणारे अपयश यामुळे अगदी आजही दलितांप्रती भेदभाव करणारी वर्तणूक कायम असलेली दिसून येते. धोरणांची मर्यादा हेसुद्धा तेवढेच महत्त्वाचे कारण आहे. कायदेशीर व सकारात्मक कृतीची मर्यादा यामुळे अन्यायी व दमनकारी आर्थिक, राजकीय आणि सामाजिक संरचनेमध्ये बदल घडवून दलितांप्रती भेदभाव करणारी वर्तणूक नष्ट करण्यात अपयश आलेले आहे.

**काय करावे लागेल?**

जात व्यवस्था प्रचंड ताठर आहे. ती अनेक शतकांपासून



जिवंत आहे; परंतु योग्य प्रयत्न सातत्याने केले गेले पाहिजेत. दोन आघाड्यांवर गंभीर आणि प्रामाणिक प्रयत्न गरजेचे आहेत. भारतीय राज्यघटनेमध्ये व कायद्यांमध्ये अस्पृश्यांना जे नागरी व राजकीय अधिकार दिले आहेत, त्यांना समर्थन देणारी वर्तणुकीची मानके उच्च जाती नागरी समाजाने विकसित करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचं, तर जात आधारित वर्तणुकीची मानके बदलविण्यासाठी उच्च जातींकडून जातविरोधी चळवळीची आपणाला आवश्यकता आहे. कारण उच्च जातीच्या वर्तणुकीची मानकं हीच तर दलितांच्या नागरी अधिकारांचे उल्लंघन करणारा मुख्य स्रोत आहे. दुसरे म्हणजे दलितांनी मालमत्तेच्या मालकीमध्ये सुधारणा करावी, जेणेकरून त्यांना नागरी आणि राजकीय अधिकार निर्भयपणे व मुक्तपणे वापरण्यास सक्षम करेल. तिसरं म्हणजे रोजगार व राजकीय प्रतिनिधित्वामध्ये आरक्षण धोरण बदलण्याची गरज आहे. सध्याची संयुक्त मतदारसंघपद्धती बदलून त्याऐवजी पात्र संयुक्त मतदारसंघपद्धती आणावी आणि विधिमंडळात व कार्यकारी मंडळात दलितांच्या परिणामकारक व खऱ्या प्रतिनिधित्वासाठी इतर मार्गांचा वापर करावा, तसेच खासगी क्षेत्रातदेखील आरक्षणाची गरज आहे. कारण वर्तमान सरकारने खासगीकरणाच्या दिशेने वेगवान हालचाली केल्या आहेत.

**(लेखक अर्थशास्त्रज्ञ व विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष आहेत.)**

**मूळ लेख इंग्रजीत आहे.**

**भाषांतर प्रा.राजक्रांती वलसे जालना.यांनी केले असून ते चळवळीतील ज्येष्ठ अभ्यासक आहेत.**


75 आजादी का अमृत महोत्सव

# भारताच्या स्वातंत्र्याचे भवितव्य

**भारताच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत आहे. त्या निमित्ताने भारतीय स्वातंत्र्य चळवळींचा इतिहास, त्यातून निर्माण झालेली स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, धर्मातितता आणि सामाजिक, आर्थिक न्याय आदी मूल्ये यांचा जागर होण्याची शक्यता आहे. सरकार त्यांचा राजकीय महोत्सव साजरा करील; परंतु या मूल्यांचा सरकारला विसर पडलेला असेल. ही मूल्ये मोठ्या लोकसंघर्षातून पुढे आलेली आहेत; परंतु स्वातंत्र्य चळवळीप्रमाणेच ही मूल्ये कालबाह्य ठरवली जातील की काय, अशी भीती वाटते आहे.**



**बी.जी. वाघ**

समाजात असा एक वर्ग आहे, की ज्याला स्वातंत्र्य २०१४ साली मिळाले, असे वाटते. नवा इतिहास लिहिणे चालू आहे. या पार्श्वभूमीवर 'स्वातंत्र्य' या संकल्पनेवर गंभीर चिंतन होण्याची आवश्यकता आहे. अर्थात, राजकीय स्वातंत्र्य मिळाले ते टिकले आणि इतक्या वर्षांत ते सक्षम झाले आहे, याचा जनतेने निश्चितच आनंद साजरा केला पाहिजे. या काळात एका आदिवासी स्त्रीला राष्ट्रपतीपद मिळाले याचा काहींना आनंद होईल. जसा दलित राष्ट्रपती करून दलितांचे प्रश्न सोडवता येत नाहीत आणि त्याचा फक्त सत्ताधारी पक्षाला राजकीय फायदा होतो, तसेच हे आहे. ही एक प्रकारची राजकीय किंवा सामाजिक दांभिकता आहे. व्याख्या न बदलता ती बदलल्यासारखी दाखवणे म्हणजे सामाजिक न्याय नव्हे. परिवर्तन, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक हेच या दांभिकतेला किंवा प्रतीकवादाला खरे उत्तर ठरेल. आपल्या स्वातंत्र्य चळवळीचा प्रारंभ १८५७ च्या लष्करी बंडापासून सुरू होतो, असे समजले जाते; परंतु त्यावेळी देश ही संकल्पनाच अस्तित्वात नव्हती. त्यामुळे ते स्वातंत्र्यासाठी लढत होते, असे म्हणता येत नाही.



**ब्रिटिशांनी केल्या धार्मिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय सुधारणा**

ब्रिटिश लष्करातील विषमता, येथील राजेरजवाड्यांचा झालेला छळ किंवा अपमान आणि काडतुसासारखी काही धार्मिक कारणे यातून ते बंड झाले होते. भारतात कुठल्याही संघर्षाचा संबंध धर्माशीच असतो. पुढे तो स्वातंत्र्य चळवळीतही राहिला. भारतात ज्या काही धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि पुढे राजकीय सुधारणा झाल्या, त्या ब्रिटिशांनी केल्या आहेत. उदाहरणार्थ. भारतात स्त्री-शूद्रांसाठी शिक्षण बंदी होती, ती ब्रिटिशांनी उठवली. त्याचे अत्यंत मूलगामी आणि दूरगामी परिणाम झाले. मेकॉलेच्या शिक्षण पद्धतीमुळेच. काँग्रेसची स्थापना होऊ शकली. प्रस्थापित वर्ग अजूनही मेकॉलेला दोष देतो. मेकॉलेच्या शिक्षण पद्धतीमुळे जगातील आधुनिक ज्ञान, विज्ञान भारतात आले. भारतातील सामाजिक, धार्मिक, राजकीय दुरवस्थेची तीव्रतर जाण येथील शिक्षित वर्गात निर्माण झाली. त्यातून समाजसुधारक आणि राजकीय चळवळींसाठी नवे नेतृत्व निर्माण झाले. एका अर्थाने भारतीय राष्ट्रवादाची जननी ही मेकॉलेची शिक्षण पद्धतीच आहे. मेकॉलेने खुद्द म्हटले होते, की इंग्रजी शिक्षणाने जागृत झालेला हा नवतरुण वर्ग पुढे इंग्रजी संस्थांची (पार्लमेंट) आणि स्वातंत्र्याची मागणी करील आणि तो दिवस ब्रिटिशांसाठी अभिमानास्पदच असेल. काँग्रेसच्या स्थापनेतही 'ह्यूम'सारख्या ब्रिटिशांचा हात होता. तसे त्याने पत्रच काढून तत्कालीन तरुणांना राष्ट्रकार्यार्थ आवाहन केले होते. काँग्रेसमध्ये धर्मालाच राष्ट्र मानणारा एक वर्ग त्यावेळी होता. इंग्रजांनी सर्व काही करावे; परंतु आमच्या धर्मात लक्ष घालू नये, हीच त्यांची मागणी होती. त्यालाच ते राष्ट्रवाद म्हणत. तथाकथित जहाल राष्ट्रवादी सामाजिक व शैक्षणिक सुधारणांना विरोध करताना दिसतात. पुढे काँग्रेसमध्ये दोन गट पडले, ते जहाल आणि मवाळ; परंतु या सर्वांना हवे होते ते 'डोमिनियन स्टेटस'च.

### आंगलाई व ब्राह्मणाई हिंदी जनतेच्या अंगाला लागलेल्या दोन जळवा

संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी लाहोर काँग्रेसमध्ये (१९२९) झाली. अध्यक्ष होते पंडित जवाहरलाल नेहरू. देश स्वतंत्र करण्यासाठी किती प्रदीर्घ काळ लढा द्यावा लागला, ते आपल्या लक्षात येते. त्याच वेळी २६ जानेवारी हा स्वातंत्र्य दिन म्हणून जाहीर करण्यात आला. त्या काळाविषयी डॉ. आंबेडकर लिहितात, ''(१/७/२७ बहिष्कृत भारत) आंगलाई व ब्राह्मणाई या हिंदी जनतेच्या अंगाला लागलेल्या दोन जळवा आहेत व त्या एकसारखा हिंदी लोकांच्या रक्ताचा शोष करीत आहेत. आंगलाई सत्तेने लोकांना देहाने गुलाम केले, तर ब्राह्मणाईने जनतेच्या आत्म्याला गुलाम करून ठेवले आहे. आंगलाईने संपत्तीचे शोषण केले, तर ब्राह्मणाईने स्वाभिमानासारख्या आत्मिक संपत्तीचे हरण केले''. ब्रिटिशांनी केलेले शोषण आणि येथील ब्राह्मणी व्यवस्थेने या देशाचे केलेले शोषण यावरील हे मूलभूत चिंतन आहे. देशाचे स्वातंत्र्य म्हणजे या दोन्ही सत्तांचे निर्दालन हे फक्त डॉ. आंबेडकरच सांगू शकत होते. स्वातंत्र्य केवळ राजकीय नको, तर सामाजिक, आर्थिक, धार्मिक, बौद्धिक व नैतिक स्वातंत्र्यही मिळायला हवे. बौद्धिक व नैतिक स्वातंत्र्याशिवाय माणसे मनाने गुलाम होतात. अशी माणसे ना स्वातंत्र्याचे रक्षण करू शकत, ना लोकशाहीचे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समग्र स्वातंत्र्याची मागणी आपल्या राजकीय जीवनाच्या सुरुवातीपासूनच केली आहे. त्यांच्यावर पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा सखोल प्रभाव होता. ते भारताचे व्हाल्टेअर होते. धर्म व संस्कृतीची कठोर चिकित्सा करणारे थॉमस पेन, कार्लाईल, एडमंड बर्क आदींचा त्यांच्यावर प्रभाव होताच. बट्रांड रसेल, जॉन ड्यूनेसारख्या महान विचावंतांशीही त्यांचा घनिष्ठ संवाद होता. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय या तत्त्वांचे ते खंबीर पुरस्कर्ते होते. त्यामुळेच डॉ. आंबेडकर घटना समितीत सूर्यासारखे प्रकाशले. तत्कालीन सारे विचारवंत, राजकारणी त्यांच्या ज्ञानापुढे नम्र झाले. भारतातल्या सर्व प्रश्नांची गाढ समज त्यांना होती. कुठलेही राष्ट्र स्वातंत्र्याशिवाय महान होऊ शकत नाही, तसेच स्त्री आपले चारित्र्य देऊन कृतज्ञ राहू शकत नाही. (No nation can be grateful at the cost of its liberty.)

### अस्पृश्यांना तर मानवी अधिकारही नव्हते

डॅनियल ओ कॉनेलचे उपरोक्त विधान स्वातंत्र्याचे महत्त्व आणि पावित्र्य दोन्ही दर्शविते. स्वातंत्र्याला भौतिक तशीच नैतिक बाजूही आहे. भारतातील कशेडी लोकांचे केवळ स्वातंत्र्यच नाकारले गेलेले नव्हते, तर त्यांची आत्मजाणीवही नष्ट झालेली होती. अस्पृश्यांना तर मानवी अधिकारही नव्हते. त्यामुळे स्वातंत्र्य द्यायचे ते नेमके कोणाला, कोणत्या वर्गाला आणि स्वातंत्र्यानंतर अस्पृश्यांचे स्थान काय राहील, असा प्रश्न ते काँग्रेसला आणि ब्रिटिशांनाही विचारत होते. भारतीय समाज परस्पर विरोधी हितसंबंधांचे, जातिद्वेषाचे, धर्मद्वेषाचे एक जातिवंत उदाहरण होते. हिंदू राष्ट्रवाद विरुद्ध मुस्लीम राष्ट्रवाद याची बीजे तर फार पूर्वीच रुजलेली होती. कवी महंमद इक्बाल, सर सय्यद अहमद यांनी स्वतंत्र मुस्लीम राष्ट्राची मागणी केलेली होती. मुस्लीम लीगच्या स्थापनेमागे ब्रिटिशही होते. हिंदू राष्ट्रवाद ही काही मुस्लीम राष्ट्रवादाची प्रतिक्रिया नव्हती. हिंदू



राष्ट्रवाद मुळातच धार्मिक अस्मितेतून वर्णाश्रमधर्माच्या अभिमानातून सांस्कृतिक श्रेष्ठत्वाच्या भावनेतून निर्माण झाला होता. त्याचे श्रेय लोकमान्य टिळक, सावरकरांकडे जाते. परधर्मीयांना वगळून हिंदूंना एकवटून वर्णाश्रमधर्माच्या तत्त्वानुसार त्यांना राष्ट्राची उभारणी करायची होती. वैदिक संस्कृती हा त्यांचा आदर्श होता. भारतातील हा मूल संघर्ष आज पुन्हा नव्याने लढला जात आहे. दुर्दैवाने या धार्मिक राष्ट्रवादाचे संरक्षणकर्ते येथल्या मूळ मागास जाती आहेत, ज्यांना आर्यांनी शूद्र म्हटले होते. या मागे तथाकथित धार्मिक अस्मितेने आणलेले मानसिक पंगुत्व आहे, जे विवेकाला नाकारते. धर्माच्या साहाय्याने कुठलेच राष्ट्र प्रगती करू शकत नाही. बहुसंख्याकवादाने समाजाची मानसिक फाळणी होते आणि ते राष्ट्र कधीही एकसंध होत नाही. याची जाणीव काँग्रेसच्या पहिल्या फळीतील नेत्यांना जरूरच होती. राष्ट्र समर्थपणे घडवायचे असेल, तर समाजवाद, लोकशाही, उदारमतवाद, निधर्मी प्रशासनव्यवस्था, समता यांना पर्याय हे गांधी-नेहरू-पटेलांना माहिती होते. देशातल्या सर्वांना समान न्याय देणे लोकशाहीतील मूलतत्त्व आहे. गांधी, आंबेडकर, नेहरू यांचे विचार प्रसंगी परस्पर विरोधी वाटत असले, तरी समाजातील सर्वांत दुर्बल व्यक्तीला त्यांच्या विचारात अग्रगण्य स्थान होते. तशीच त्यांची विचारसरणी धर्माधिष्ठित राष्ट्रवादाला, बहुसंख्यांकवादाला विरोध करणारी होती.

### भ्रष्ट व तत्त्वशून्य राजकारण हा भारताला लागलेला गंभीर रोग

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते टिकेल की नाही याबाबतीत जगभरचे राजनितिज्ञ साशंक होते. चर्चिलची ती कुप्रसिद्ध विधाने प्रसिद्धच आहेत. त्यांनी म्हटले होते. ''भारताची सत्ता ब्राह्मण व उच्चवर्णीयांच्या हाती गेली आहे. भारतीय राजकारणी लबाड, लुच्चे, लफंगे आहेत. ते हवा-पाण्यावरही कर लावायला कमी करणार नाहीत. प्रसंगी ते देशही विकतील.'' चर्चिलची वरील विधाने आपल्याला अंतर्मुख करतात. भारताचे स्वातंत्र्य टिकले आणि विकसित झाले आहे; परंतु भारतीय राजकारणी प्रबुद्ध झाले आहेत, असे म्हणता येणार नाही. म. गांधींनी जी सहा पापे (Sins) सांगितली होती, ती प्रत्यक्षात आचरणात भारतीयांनी कुठलीही कसर बाकी ठेवलेली नाही. भ्रष्ट व तत्त्वशून्य राजकारण हा भारताला लागलेला गंभीर रोग आहे. तरीही म. गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, भारतीय राज्यघटना, डॉ. आंबेडकर यांच्या पायाभरणीमुळे आधुनिक प्राथमिक विचारसरणीमुळे


75 आजादी का अमृत महोत्सव


हे राष्ट्र टिकले आहे आणि विकसित झाले आहे, याची नोंद घ्यावीच लागेल. म. गांधी धार्मिक होते; परंतु धर्मवादी नव्हते. राजकारणात धर्म आणण्याला त्यांनी विरोध केला. त्यामुळे धर्मामुळेच आपण राजकारणात यशस्वी होऊ शकतो, असे मानणाऱ्यांनी त्यांचा खून केला.

गांधीजी विद्रोहीच होते. स्वातंत्र्याविषयी ते म्हणाले होते, 'Real freedom will not come by the acquisition of authority by a few but by the acquisition of the capacity of attack to resist authority when abused...'

स्वातंत्र्य म्हणजे सत्ता मिळवणे नव्हे, तर जुलमी राजसत्तेचा प्रतिकार करण्याची जनतेची क्षमता वाढवणे होय. जी शिक्षणाद्वारे वाढवता येईल. लोकांना जाणीव असली पाहिजे, की तेच सत्तेला नियमाप्रमाणे वागण्यास भाग पाडू शकतात व नियंत्रित करू शकतात.

**सत्तेचा केंद्रबिंदू व्यक्तीच असली पाहिजे**

आजची राजकीय परिस्थिती पाहिल्यानंतर गांधीजी किती द्रष्टे होते, ते आपल्या लक्षात येते. आज जनतेचे रूपांतर मेंढरात झाले आहे. ते प्रतिगामी शक्तीचे नुसते वाहकच नाहीत, तर रक्षणकर्तेही आहेत. गांधीजींनी याच सामान्य माणसांना निर्भय बनवले होते व स्वातंत्र्यासाठी रस्त्यावर आणले होते. असे गांधीजी आज नाहीत. त्यांनी असेही म्हटले आहे, की सर्वांना समान स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. प्रत्येक जण स्वतःचा मालक असला पाहिजे. सत्ता पिरॅमिडसारखी नाही, तर सागरासारखी सर्वदूर पसरलेली असली पाहिजे. तिचा केंद्रबिंदू व्यक्तीच असली पाहिजे. ती बाहेरून लादलेली नसावी.



गांधीजी प्रखर देशभक्त होते; परंतु राष्ट्रवादी नव्हते. राष्ट्रवाद हा वंशवादच असतो, असे रवींद्रनाथ टागोरांनी म्हटले आहे. हा एक प्रकारचा 'झेनो फोबिया' आहे. गांधीजी सदसद्विवेकाची सत्ता मानत होते. जर सरकार मानवी सदसद्विवेकाच्या विरोधी जाऊन काही अनैतिक कृत्ये किंवा कायदे करत असेल, तर त्यांना प्रतिकार करण्याचा अधिकार माणसाचा मूलभूत अधिकार आहे. घटनेमध्ये वंशवादाला थोडीही जागा नाही. आर्टिकल (१५) कुठल्याही (वंश, जात, धर्म, लिंग, राज्य) भेदभावाला विरोध करते. बाबासाहेब त्यामुळेच म्हणाले, की मी प्रथम भारतीय आहे आणि अंतिमतः भारतीय आहे. ही भूमिका एप्रिल १९३८ मध्ये जुन्या मुंबई प्रांतातून कर्नाटक प्रांत वगळण्याच्या विधेयकाला विरोध करताना त्यांनी स्पष्टपणे मांडली होती -

'I do not want that our loyalty as Indians should be in the slightest way affected by any competitive loyalty whether that loyalty arises out of our religion, culture or language.'

**समतेशिवाय स्वातंत्र्याला काही अर्थ नाही**

नेहरू, गांधी, आंबेडकरांच्या या भूमिका परस्परांना कशा पोषक होत्या ते आपल्या लक्षात येईल. हिंदू राष्ट्रवाद व बहुसंख्याकवादाचा धोका त्यांनी वेळीच ओळखला होता. अस्पृश्य हे कायम अल्पसंख्य राहतील व उच्चवर्णीय हिंदू सत्तेवर राहतील, तसेच इतरही अल्पसंख्य आपल्या अधिकारांसाठी त्यांच्यावर अवलंबून राहतील. त्यामुळे एक वर्ग बहुसंख्याकांच्या आधिपत्यासाठी राहील आणि त्यामुळे स्वातंत्र्याला अर्थ उरणार नाही, याची त्यांना कल्पना होती. त्यामुळे मूळ राष्ट्रीय प्रवाहात त्यांना आणण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी घटनेत खास तरतुदी केल्या. तथापि, आजही आपल्याला हाथरस, दांतेवाडा, जुबैर मोहंमद प्रकरणात विषमतावादी व्यवस्थेची लक्तरे आपल्याला दिसतात. अशी असंख्य प्रकरणे रोज घडत आहेत. त्यामुळे समतेशिवाय स्वातंत्र्याला काही अर्थ नाही, हे पुन्हा-पुन्हा दिसून येते. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव यांना वेगवेगळे करता येत नाही. सामाजिक न्यायाशिवाय समता प्रस्थापित करता येत नाही. त्यामुळे समाजात बंधुभावही निर्माण होत नाही. गांधीजींची अंत्योदय कल्पना समतेकडे नेणारी आहे; परंतु ती कल्पना निव्वळ भावनिक असून चालणार नाही. तिचे वस्तुस्थितीत रूपांतर करण्यासाठी प्रखर राजकीय इच्छाशक्तीची व कठोर नियमांची गरज लागेल. पंचवार्षिक नियोजनाद्वारे नेहरूंनी तो प्रयोग करून पाहिला; परंतु त्याला अपयश आले. भ्रष्टाचार आणि साधनसामुग्रीची कमतरताही त्याची कारणे होती.

**...तर मूलभूत परिवर्तन होणार तरी कसे?**

लोकशाही मार्गाने सामाजिक परिवर्तन शांततेने होऊ शकेल, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. आपली घटना, कायदे आदर्शवत असले तरी त्यांना राबवणारे लोकच नालायक असतील, तर मूलभूत परिवर्तन होणार तरी कसे? पंडित नेहरू स्वतः फेबियन सोशॅलिस्ट होते. लोकशाही, समाजवाद हे त्यांचे उद्दिष्ट हा ते. समाजवादामुळे गरिबी दूर करता येईल व लोकशाही पद्धतीने खऱ्या स्वातंत्र्याचा आनंद घेता येईल. त्यांनी घटना समितीत मांडलेला उद्दिष्टांचा ठराव स्वयंस्पष्ट आहे. तेथूनच घटनेची उद्देशिका (Preamble) निर्माण झालेली आहे. उद्दिष्टांच्या ठरावात भारताला एका रानटी, जुलमी व्यवस्थेतून मुक्त करून स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय या तत्त्वांवर आधुनिक, वैज्ञानिक वृत्तीचा बलशाली भारत घडविण्याची हमी होती. गांधी, आंबेडकर, नेहरू यांच्या विचारांत आश्चर्यकारक साम्य आहे. व्यक्तीच्या प्रतिष्ठेवर त्यांची नितांत श्रद्धा आहे. प्रत्येक व्यक्तीला जगण्याचा, आनंददायक जगण्याचा, भयमुक्त व भूकमुक्त जगण्याचा अधिकार आहे, यावर त्यांचा विश्वास आहे. राज्याच्या दमनशक्तींविषयी त्यांना नेहमीच चिंता वाटत आली आहे. या शक्तींपासून सामान्य व्यक्तीला कसे सुरक्षित ठेवता येईल, याचा त्यांनी नेहमीच विचार केला आहे. सत्तेचे विकेंद्रीकरण आणि सत्तेवर जनतेचे नियंत्रण याबाबतीत घटनाकारांनी सखोल विचार केला आहे. त्यासाठी घटनात्मक मूल्यांचे कटाक्षाने पालन राज्यकर्त्यांना करणे आवश्यक आहे; परंतु दुर्दैवाने अत्यंत अप्रबुद्ध अशी राजकीय व्यवस्था आपल्याकडे विकसित झाली आहे.

तिला घटनेला, घटनात्मक मूल्यांना पायदळी तुडवण्यात कुठलाही संकोच वाटत नाही. भारतीय राजकीय संस्थांचे गुन्हेगारीकरण होत आहे. त्या भ्रष्ट तर आहेतच. त्यांना धार्मिकतेचा रंग दिल्याने त्या पवित्र होणाऱ्या नाहीत. लोक जात, पंथ, धर्म विसरून निव्वळ विवेकशीलतेने मतदान करतील, तर त्या शुद्ध होतील. घटना समितीत उद्दिष्टांच्या ठरावावर बोलताना डॉ. आंबेडकर म्हणाले होते, की राजकीय, सामाजिकदृष्ट्या आपण कितीही विघटित असलो, तरी एक दिवस असा येईल, की जगातली कुठलाही शक्ती आपल्याला एक होण्यापासून रोखू शकणार नाही. भारतीय जनतेत ती शक्ती निश्चितच आहे. भारतीय जनता सार्वभौम आहे. We the People आम्ही भारताचे लोक यांनी ती घटना लिहिली आहे आणि स्वतःला अर्पण केली. आपली बांधीलकीही जाहीर केली आहे. स्वातंत्र्याचा खरा अर्थ विवेकाचे स्वातंत्र्य असादेखील होतो. सामाजिक, आर्थिक विषमतेने भारताला पोखरून काढले आहे. त्यामुळे हा देशाचा डोलारा कोसळेल की काय, अशी भीती वाटू लागली आहे. सदसद्विवेकाचे स्वातंत्र्य आणि निर्भयता यांच्या साहाय्याने एकजुटीने एकसंध भारत या अनैतिक शक्तींना गांधीवादी पद्धतीने पराभूत करू शकेल. गांधीजींवर थोरो, रस्कीन, टॉलस्टॉय यांचा प्रभाव होता. अनैतिक शक्तींना कसे रोखावे, हे म. गांधींनी भारतीय जनतेला शिकवले आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्त्वे मी बौद्ध धर्मातून घेतली आहेत, असे बाबासाहेबांनी सांगितले आहे. आज मुस्लीम, अल्पसंख्याक, दलितांवर अत्याचार होताना दिसतात. त्यावेळी प्रशासकीय न्यायिक व्यवस्था हतबल झाल्यासारख्या दिसतात. त्यामुळे स्वातंत्र्याचा महोत्सव साजरा करताना आपल्या पायाखाली काय जळते आहे, ते पाहिले पाहिजे.

**धर्माधिष्ठीत राजकीय सत्तेचा प्रवास वेगाने सुरू**

आपला धर्म आपल्याला अधमपणा शिकवत नाही, हे लक्षात ठेवले पाहिजे. डॉ. आंबेडकरांना भारतीय लोकशाही आणि स्वातंत्र्याविषयी गंभीर चिंता होत्या. त्यांचे घटना समितीतील शेवटचे भाषण देशाने पुन्हा-पुन्हा वाचण्याची आवश्यकता आहे. लोकांनी आपल्या मताची किंमत जाणली पाहिजे. सत्तेविषयी नेहमी शंका घेतली पाहिजे. लोकांचे खरे प्रतिनिधी निवडून येत नाहीत, हे भारतीय लोकशाहीचे अपयश आहे. पार्लमेंटचे सदस्य खरोखर जनतेचे प्रतिनिधी आहेत का, असे विचारण्याचे साहस जनतेमध्ये असले पाहिजे. हा प्रश्न अनुसूचित जाती-जमातीच्या लोकप्रतिनिधींबाबत अधिकच महत्त्वाचा आहे. जिथे मतांचा लिलाव होतो तिथे फक्त धनाढ्य लोक व धनाढ्य राजकीय पक्षच निवडून येऊ शकतात. त्यांना समतेचे मोल मुळीच वाटत नाही. धर्म आणि जातीत विभागल्यामुळे लोकांची विवेकशक्ती पंगू झाली आहे. त्यामुळे धर्माधिष्ठित राजकीय सत्तेचा प्रवास वेगाने सुरू आहे. तो जनतेला पारतंत्र्यात लोटल्याशिवाय राहणार नाही. शंभर वर्षांपूर्वी म. गांधी राजद्रोहाचे गुन्हेगार म्हणून कोर्टात उभे होते. बाजूला नेहरू, सरोजिनी नायडू, मदन मोहन मालवीय आणि इतर मातब्बर नेतेही उभे होते. गांधीजींनी आपला गुन्हा कबूल करून कठोर शिक्षेची मागणी केली. त्यावेळी ते म्हणाले, 'Affection (towards government) cannot be manufactured or regulated by law. If one



has no affection for a person or system, one should be free to give the fullest expression to his disaffection, so long as he does not contemplate, promote, or incite to violence.'

हा मूलभूत विवेकही सध्याच्या कायद्याच्या अंमलबजावणीत दिसत नाही. घटनात्मक संस्था व कायद्यांचा गैरवापर आणि न्यायव्यवस्थेची हतबलता यामुळे सामान्य माणसांच्या मूलभूत अधिकारांवर गडांतर आले आहे.

**स्वातंत्र्य आणि धर्म कधीही सहचर असत नाहीत**

स्वातंत्र्य आणि लोकशाही हातात हात घालून चालत असतात. लोकशाही संपली तर स्वातंत्र्य संपलेच. प्रशासनयंत्रणा पूर्वीप्रमाणे भ्रष्ट आहेच; परंतु आता तिचे धार्मिकीकरण, राजकीयीकरण आणि गुन्हेगारीकरण वेगाने होत आहे. समाजाची धर्माधिष्ठित फाळणी होत आहे. स्वातंत्र्य आणि धर्म कधीही सहचर असत नाहीत. स्वातंत्र्य, घटना आणि लोकशाहीला सर्वाधिक धोका धर्माधिष्ठित राजकारणाचा किंवा धार्मिक राष्ट्रवादाचा आहे. देशाच्या विवेकशक्तीने हे समजून घेतले पाहिजे. सांस्कृतिक आणि धार्मिक बहुविविधतेविषयी नेहरूंना अभिमान होता. भारताचे सामर्थ्य या बहुविविधतेत आहे. गांधीजींना सर्व धर्मांत सत्य आढळत होते; परंतु ते अपूर्ण होते. त्यामुळे सर्व धर्मांनी एकत्र आले तरच अंतिम सत्य काय ते कळेल, अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे सहिष्णुता, सुसंवाद, सत्य आणि अहिंसा या मार्गानेच देशात शांतता टिकून राहील व देशाचा विकासही होईल, अशी त्यांना खात्री होती. हिंदू असा वेगळा धर्म नाही. सहिष्णुता हाच हिंदू धर्म असे त्यांना वाटते. स्वातंत्र्य आणि लोकशाही, समता आणि स्वातंत्र्य, बंधुता आणि धर्मनिरपेक्षता या वेगवेगळ्या गोष्टी नाहीत. अमेरिकेतील एका अशा सक्रिय संघटनेने (usaid) नुकताच निष्कर्ष काढला आहे, की भारतात आणि अमेरिकेत अशा काही राजकीय शक्ती आहेत, की त्यांनी देशात धर्म, जात आणि वांशिक कारणावरून समाजात फूट पाडून लोकांना एकमेकांच्या विरोधात उभे केले आहे आणि घटनात्मक संस्था व कायदा यांचा गैरवापर चालवला आहे.

भारताच्या या स्वातंत्र्य महोत्सव काळात देशात लोकशाही व स्वातंत्र्यापुढे काही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. ते कुशलतेने सोडविले तरच भारताची एकात्मता, स्वातंत्र्य व लोकशाही टिकून राहील.

●●●

**(लेखक निवृत्त सनदी अधिकारी आहेत.)**



आजादी का अमृत महोत्सव

# भारतातील स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव :

# भारतीय स्त्रीची प्रगती

**भारतीय स्त्रीच्या स्वातंत्र्योत्तर काळातील पंचाहत्तर वर्षांत केलेल्या प्रगतीचा आढावा घेणे आवश्यक आहे. तथाकथित सवर्ण हिंदू स्त्रियांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात केलेल्या प्रगतीच्या तुलनेत बहुजन, दलित, आदिवासी, भटक्या विमुक्त समाजातील व मुस्लीम समाजातील स्त्रियांची किती प्रगती झाली, याचा तौलनिक दृष्टीने विचार करता यावा, हा या लेखाचा उद्देश आहे.**



**प्रो. विमल थोरात**

भारतीय स्वातंत्र्याची पंचाहत्तरी पूर्ण होत असतानाच भारतीय स्त्रियांच्या आजवरच्या प्रगतीचा आढावा घेणे आवश्यक ठरते. प्रगतिशील भारतात स्त्रियांच्या प्रगतीची तीन टप्प्यांत विभागणी केली, तर वास्तविक चित्र रेखाटले जाऊ शकते. देशाच्या बहुमूल्य स्वातंत्र्याला अबाधित ठेवण्यासाठी आणि स्वतंत्र गणराज्याची घटना लिहून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २६ जानेवारी १९५० ला प्रथम राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांना संसदेत सादर केली. देशाच्या सार्वभौमत्वाचा, समाजवादी लोकशाही उत्सवाचा क्षण भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला गेला.

**भारतीय समाज हा श्रेणीबद्ध विषमतेच्या तत्त्वावर आधारित**

भारतीय समाजात दोन बाबींचा पूर्णतः अभाव आहे. ही वस्तुस्थिती मान्य करूनच आपण सुरुवात केली पाहिजे. त्यापैकी एक समता आहे. सामाजिक क्षेत्रात आपला भारतीय समाज हा श्रेणीबद्ध विषमतेच्या तत्त्वावर आधारित आहे. याचा अर्थ काही लोक वरच्या स्तरावर असतात, तर बाकीचे निकृष्ट अवस्थेत असतात. आर्थिक क्षेत्रात आपल्या समाजात काहींजवळ गडगंज संपत्ती आहे, तर अनेक लोक घृणास्पद दारिद्र्यात जगतात. २६ जानेवारी १९५० ला आपण एका विसंगतीयुक्त जीवनात प्रवेश करणार आहोत. राजकारणात आपल्याकडे समता राहील; परंतु सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता राहील. राजकारणात प्रत्येकाला एक मत आणि प्रत्येक मताचे समान मूल्य या तत्त्वाला आपण मान्यता देणार आहोत. आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मात्र, सामाजिक आणि आर्थिक संरचनेमुळे प्रत्येक माणसाला समान मूल्य हे तत्त्व आपण नाकारीत राहणार आहोत. अशा परस्पर विरोधी जीवनात आपण आणखी किती काळ राहणार आहोत? आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात आपण आणखी किती काळ समता नाकारणार आहोत? आपण जर ती अधिक काळापर्यंत नाकारत राहिलो, तर



आपली राजकीय लोकशाही आपण धोक्यात आणल्याशिवाय राहणार नाही. ही विसंगती शक्य होईल तेवढ्या लवकर आपण दूर केली पाहिजे. अन्यथा ज्यांना विषमतेचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत, ते या सभेने अतिशय परिश्रमाने निर्माण केलेली राजकीय लोकशाहीची संरचना उद्ध्वस्त करतील.

भारतीय समाजाच्या प्रगतीचे मोजमाप स्त्रियांच्या प्रगतीच्या आधारे करावे, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्यापूर्वी केलेले विधान आज भारतात निर्माण झालेल्या बिकट स्थितीत अतिशय प्रासंगिक आहे. भारतीय स्त्रीच्या स्वातंत्र्योत्तर काळातील पंचाहत्तर वर्षांत केलेल्या प्रगतीचा आढावा घेणे आवश्यक आहे. तथाकथित सवर्ण हिंदू स्त्रियांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात केलेल्या प्रगतीच्या तुलनेत बहुजन, दलित, आदिवासी, भटक्या विमुक्त समाजातील व मुस्लीम समाजातील स्त्रियांची किती प्रगती झाली, याचा तौलनिक दृष्टीने विचार करता यावा, हा या लेखाचा उद्देश आहे.

भारतीय समाजाची रचना जातिनिहाय आहे. स्त्रियांचा असा

समतावादी सूत्रांनी बांधलेला एकत्रित असा समूह नाही. स्त्रियांची जाती, वर्ण आणि वर्गात विभागणी झालेली आहे, तो तीन हजार वर्षांचा इतिहास आहे. हजारो वर्षांपासून धार्मिक आणि सनातनी ब्राह्मणवादाच्या कट्टरतावादी रूढी, परंपरांच्या वरवंट्याखाली स्त्रीशूद्र आणि अस्पृश्य दडपले गेले. या सर्वांना शिक्षण, स्वातंत्र्य, समता व संपत्ती अर्जनाचा हक्क नाकारला गेल्याने भारताच्या लोकसंख्येचा ९५% समाज शिक्षणापासून हजारो वर्षे वंचित राहिला. हिंदू धर्माच्या मनुस्मृती या ग्रंथात लिहून ठेवलेल्या विषमतावादी विखारी अन्याय पूर्ण लिखित स्वरूपात केलेल्या कठोर नियमावलीमुळे झालेला परिणाम आजही समाजात प्रकर्षाने दिसून येतोय.



**स्त्रियांच्या प्रगतीची पीछेहाट**

स्वातंत्र्याची पंचाहत्तर वर्षे पूर्ण होत असताना आणि भारतीय संविधानाने दिलेले अधिकार नाकारणारी, संवैधानिक मूल्यांना अपमानित करणारी जाति-वर्ण-स्त्रीदास्य शोषणकारी, अस्पृश्यतेचे पालन करणारी धर्म समर्थित सामाजिक सांस्कृतिक धार्मिक राजनैतिक रूढी वादी ब्राह्मणवादी पुरुष सत्तात्मक व्यवस्थेने स्त्री स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाच्या मूल्यांचा निरादर करीत जातीय अहंकार, श्रेष्ठत्व आणि सामंतवादी प्रवृत्तींना जपले. धर्म आणि पितृसत्तेने स्त्रीशूद्र अस्पृश्यांना गुलामीच्या जोखडात अडकून ठेवूनच 'आधी आबादी' असलेल्या स्त्री-वर्गाला बरोबरीचा नाही, तर सदैव दुय्यम दर्जा दिला. स्त्रीच्या शारीरिक रचनेला पुरुष अहंकार निम्न समजतो. कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत कुटुंबातील स्त्रियांना सहभागी केले जात नाही, संपत्तीमध्ये मुलींना, पत्नीला व आईला वाटा देण्यासाठी कुटुंबातील पुरुषांचा नकार असतो. हिंदू कोड बिलाने दिलेले अधिकार नाकारणारी संस्कृती आजही समाजात वावरताना दिसते. त्यामुळे दलित, आदिवासी, मुस्लीम, भटक्या विमुक्त समाजातील व अदलित स्त्रियांच्या प्रगतीची पीछेहाट झालेली दिसून येते.

लेखाच्या सुरुवातीला लिहिल्याप्रमाणे सर्वप्रथम स्त्रियांच्या विभिन्न सामाजिक वर्गातील शैक्षणिक प्रगतीची उपलब्ध आकडेवारी (डेटा)च्या आधारे विश्लेषण करणे आवश्यक आहे. स्त्रियांचा शैक्षणिक प्रवास ब्रिटिश राजवटीत सुरू होतो; पण राज्य करणाऱ्यांना कर्तव्य म्हणून राजनैतिक दृष्टीने घेतलेल्या निर्णयानुसार होते.

**स्त्रीला बंद असलेली शिक्षणाची दारे त्यांनी खुली केली**

पश्चिम भारतात सर्वप्रथम स्त्री शिक्षणाची दारे खुली करण्याचे क्रांतिकारी कार्य माता सावित्रीबाई फुले आणि म. ज्योतिबा फुलेंनी केले. फुले दाम्पत्याने सन १८४८ मध्ये पुण्यातील भिडे वाड्यात मुलींकरिता पहिली शाळा सुरू केली. म. ज्योतिबांनी घरीच सावित्रीबाईंना शिक्षित केले आणि पूर्ण तयारीनिशी सावित्रीबाईंनी माँटेसरी स्कूलमध्ये शिक्षक प्रशिक्षण घेऊन एक प्रशिक्षित शिक्षक म्हणून त्यांची मैत्रीण फातिमा शेख यांच्याबरोबर मुलींना शिक्षण देण्यास सुरुवात केली. पुण्यातील सनातनी ब्राह्मण त्यांना शाळेत जाताना वाटेत अनेक शिव्या घालत, त्यांच्यावर शेण-चिखल फेकत असत आणि 'धर्म बुडाला, धर्म बुडाला' म्हणत रस्त्यावर येऊन वाट अडवीत असत. स्त्रियांना शिक्षित करण्याच्या ध्येयापुढे आणि निर्धारामुळे माई सावित्रीबाईंनी मनस्वी ताण आणि छळ सहन करूनही स्त्री शिक्षणाची क्रांती घडवून आणली. भारताच्या पहिल्या शिक्षिका होऊन स्त्रीला बंद असलेली शिक्षणाची दारे त्यांनी खुली केली. या नंतर कोलकात्याला ब्रिटिश सरकारने लंडन बंगाली गर्ल्स स्कूल उघडले आणि दक्षिणेत तिरुनेरवेली येथे मुलींसाठी पहिले बोर्डिंग स्कूल सुरू केले. कोलकाता निवासी समाज सुधारक रामगोपाल घोष, राजा दक्षिण रंजन मुखर्जी आणि पंडित मदनमोहन तरकालंकर यांनी कोलकाता येथे १८४९ ला 'धर्मानिरपेक्ष नेटिव फिमेल स्कूल'ची स्थापना केली. स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या घटनेने भारतीय स्त्रीला दिलेले समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या मूलभूत मूल्याधिष्ठित हक्कांमुळे शिक्षण, स्वास्थ्य, रोजगार, तसेच भारतीय विकास योजनेंतर्गत सम लाभार्थी होण्याची हक्कदार आहे. भारतीय स्त्रीला शिक्षणाचा, चिकित्सा सेवा, रोजगार हमीचा, कामाचे समान वेतनमूल्य मिळावे, सुरक्षा, देशाच्या विकासामध्ये बरोबरीचा सहभाग असल्याने एक व्यक्ती म्हणून सन्मानाने जगण्याचा अधिकार भारतीय घटनेने दिलेला आहे.

प्रथम दलित, आदिवासी, मुस्लीम मुला-मुलींच्या तुलनेत तथाकथित सवर्ण मुली आणि मुलांची शिक्षणाची टक्केवारी किती ते बघूया -

- २०११ च्या सेंसस रिपोर्टनुसार प्रायमरी व माध्यमिक स्कूलमध्ये अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या मुलींच्या शाळेत नोंदणीचे प्रमाण ९९%, तर मुलांचे ९८.६% आहे.
- आदिवासी मुलींचे प्रमाण ९५.२%, तर मुलांचे प्रमाण ९८.२% आहे.
- ओबीसी व कथित सवर्ण हिंदू मुलींचे प्रमाण क्रमशः ९८.३% व ९८.२%, तर मुलांचे प्रमाण क्रमशः १०१.२%, ९८.५ % आहे.
- मुस्लीम मुला-मुलींच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील नोंदणी क्रमशः ९५.८% मुलांची, तर ९६.६% मुलींचे प्रमाण आहे. राष्ट्रीय ॲव्हरेज हा सवर्ण हिंदू-ओबीसी आणि दलित-आदिवासी मुला-मुलींच्या टक्केवारीत थोडा फरक दिसून येतो. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे वर्ग १ ते ८ पर्यंतचे शिक्षण विनामूल्य आणि सक्तीचे केले आहे. दलित आदिवासी मुस्लीम मुलींचे प्रमाण तथाकथित सवर्ण मुलींच्या तुलनेत बरेच कमी होत जाते.
  - दलित मुलींचे प्रमाण - ७२.६%
  - आदिवासी मुलींचे प्रमाण - ६२.६%६
  - मुस्लीम मुलींचे प्रमाण - ५९.५%
  - ओबीसी मुलींचे प्रमाण - ७९.४%
  - सवर्ण मुलींचे प्रमाण -९४.५%

पहिल्या तीन वर्गांतील मुलींचे प्रमाण, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील प्रमाण हे राष्ट्रीय ॲव्हरेज ७६% पेक्षाही कमी होत गेलेले आहे.

जातिभेदाचे पावलोपावली येणारे अनुभव, शिक्षकांद्वारे वेळोवेळी अपमानित करणे, सहपाठ्यांकडून जातिआधारित भेदभाव, शाळेतील सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी करून न घेणे. मुलींच्या शिक्षणाबाबत सामाजिकदृष्ट्या असलेले गैरसमज आणि पितृसत्ताक पद्धतीमध्ये मुलींबरोबर असमानतेचा व्यवहार. समाजमनावर धार्मिक रूढी परंपरांचा पगडा, तसेच पालकांची कमजोर आर्थिक स्थिती, अशिक्षित असणे कारणीभूत ठरतात. सवर्ण हिंदू व ओबीसी हिंदू मुलींच्या शिक्षणाची टक्केवारी ही जास्त असण्याचे कारण पालकांचे वार्षिक उत्पन्न अधिक, रूढी परंपरांचा निषेध, मुलगा आणि मुलीला समान वागणूक, स्त्रीशिक्षणाचे महत्त्व समजून मुलींच्या शिक्षणावर भर दिला जाणे. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व जातिआधारदृष्ट्या प्रत्येक क्षेत्रात प्राधान्य दिले जाते.

राष्ट्रीय स्तरावर उच्च शिक्षण संस्थांमध्ये मार्जिनवर असलेल्या जाती, वर्ग आणि धर्मांच्या मुला आणि मुलींच्या शिक्षणाची टक्केवारी कमी होत जाते. प्रवेश घेण्याचे एकूण मुलींचे प्रमाण हे २२.८% असे आहे. त्यामधे कथित सवर्ण मुलींचे प्रमाण ३५.२%, तर दलित मुलींचे फक्त १५.६% आहे. जे कथित सवर्ण मुलींच्या तुलनेत निम्म्याहून कमी आहे.

आदिवासी मुलींचे प्रमाण ११%, तर मुस्लीम मुलींचे प्रमाण १२.१% आहे. ● प्राथमिक शाळेत प्रवेश घेण्याचे प्रमाण ९९% असलेल्या मुलींच्या गळतीचे प्रमाण हे अतिशय जास्त आहे. मानव संसाधन विकास मंत्रालयाने दिलेल्या २०१६ च्या स्टॅटिस्टिकनुसार २०१३-२०१४ मध्ये दलित-आदिवासी मुलींचे उच्च शिक्षणातून गळतीचे प्रमाण १८.३२% आहे.

● युनिसेफच्या २०११ च्या रिपोर्टनुसार एलिमेंटरी लेव्हलवरच दलित-आदिवासी मुला-मुलींचे गळतीचे प्रमाण ५१% असून, मुलींमध्ये गळतीचे प्रमाण ६७% पर्यंत जाते.

**निष्कर्षत :** दलित, आदिवासी, मुस्लीम समाजातील स्त्रियांच्या गळतीचे प्रमाण हेच दर्शवते, की व्यवसाय आधारित मजूर स्त्रियांचे संख्याबळ वाढते आहे; पण कौशल्याधारित व्यवसायात मात्र त्याचे प्रमाण अल्प आहे.

भारताच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात तरी भारतीय भारतीय घटनेने दिलेल्या अधिकारांची पायमल्ली होऊ नये, ही समस्त स्त्रीवर्गाने अपेक्षा करणे काही अवाजवी नाही. यासाठी राज्य शासनाने, तसेच केंद्र शासनाने राष्ट्रीय स्तरावर अल्पसंख्याक, दलित, आदिवासी व अन्य स्त्रियांच्या प्रगतीची साधने, संसाधन, सरकारी योजनांचे स्त्रियांना लाभ अधिकाधिक मिळावेत, अशी धोरणे राबवली जाणे अत्यावश्यक आहे. व्यापक स्तरावर मिळू शकेल, असा प्रगतिशील विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी जनतेने निवडून दिलेल्या सरकारने करावा, ही संवैधानिक जबाबदारी राज्य सरकार व केंद्र सरकारची आहे.

नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो २०१४-२०१९ च्या रिपोर्टनुसार दलित स्त्रिया, मुली आणि पुरुषांवर २०१४ ते २०१९ या सहा वर्षांमधे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अत्याचार विरोधी ॲक्ट (SC/ST (PoA) Act) मध्ये रिपोर्ट झालेल्या संपूर्ण केसेसची संख्या ३८,०३८ इतकी आहे. यामध्ये अल्पवयीन मुली आणि स्त्रियांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये झालेली वाढ (४३.९%) एकूण १७,६८७ अत्याचारांच्या घटना स्त्रिया व मुलींवर झालेल्या आहेत. बलात्कार, सामूहिक बलात्काराच्या, बलात्कार व हत्या, अपहरण व बलात्कार, बलात्काराचा प्रयत्न केलेल्या घटनांची संख्या १६,२३६ आहे (५६.१%).

**शासन गुन्हेगारांच्या पाठीशी उभे राहते!**

अत्याचारांच्या घटनांमध्ये सहा वर्षांमध्ये झालेली वाढ ही आत्यंतिक संताप आणणारी आहे. दलितांना सुरक्षा देणारी प्रशासनिक व्यवस्था, पोलीस आणि राज्याचा महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोन अत्यंत असंवेदनशील आहे. दलित-आदिवासी मुली-स्त्रियांवर अत्याचारांच्या घटनांमध्ये पोलीस SC/ST PoA Act लावण्यात टाळाटाळ करून केसचा पंचनामा करण्यात दिरंगाई, पुरावे गोळा करण्यात चुका ठेवल्या जाणे, जेणेकरून केसची फाइल कमजोर राहते, त्यामुळे बलात्कारी सुटतो. बऱ्याचदा पोलीस व शासन अर्थात, राज्य सरकार गुन्हेगारांच्या पाठीशी उभे राहते आणि बलात्काऱ्याला सोडवण्यासाठी प्रयत्न केले जातात. उत्तर प्रदेशच्या हाथरसची दलित मुलीवरील अमानुषपणे केलेल्या सामूहिक बलात्काराची घटना, उपचारादरम्यान मुलीचा मृत्यू. सामुहिक बलात्कार व खूनप्रकरणी राज्य सरकारने बलात्कारी सवर्ण हिंदू म्हणून बलात्कारींना अटक करण्यात दिरंगाई, मुलीचे शव तिच्या स्वजनांना अंत्यसंस्कार करण्यासाठी दिले नाही, तर परस्पर पोलीस निरीक्षक व शासकीय अधिकाऱ्यांनीच रात्रीच्या २ वाजता पेट्रोल टाकून जाळले. राजकीय लाभासाठी राज्य सरकारने प्रशासनास हाताशी धरून दलित मुलीशी क्रूरतम व्यवहार केला जातो.

व्यक्ती स्वातंत्र्य, जगण्याचा अधिकार, सुरक्षेची जबाबदारी राज्य सरकारने सांभाळावी हे संविधानावर हात ठेवून मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणारे स्वतःच संविधानाचा अपमान करतात. अशा क्रौर्याचा कठोर शब्दांत निषेध करूनही दलित मुलींना न्याय मिळणे शक्य दिसत नाही. भारतीय स्त्रीला, मुलींना गावात राहणे असुरक्षित वाटते. शिक्षणाअभावी त्यांना स्वअधिकारांची माहिती नसावी, हे अतिशय क्लेश देणारे आहे. जंगल, दऱ्या, पहाडावर राहणाऱ्या स्त्रियांना स्वातंत्र्य म्हणजे काय, हेही माहीत नसावे, मूलभूत मानवी हक्कांची जाणीव करून देण्याची जबाबदारी राज्य शासनाने पार पाडायची होती; पण स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आदिवासी जीवनशैलीचे प्रदर्शन करणारी, जातिभेदास प्रोत्साहन देणारी, स्त्रीवर्गाला दुय्यम दर्जा देणारी, ब्राह्मणवादी पुरुष सत्ता स्वतःच्या वर्चस्वाला आव्हान दिले जाऊ नये म्हणून स्त्रियांवर घरेलू अत्याचार करण्याचा अधिकार समजतो. स्त्रियांची ही दयनीय अवस्था असताना आदिवासी स्त्री महामहीम द्रौपदी मुर्मू या देशाच्या राष्ट्रपतिपदाची मानकरी झाल्याबद्दल आनंद कशासाठी व्यक्त करावा, हा प्रश्न पडतो.

●●●

**(लेखिका दिल्ली येथील दलित मानवाधिकार राष्ट्रीय अभियानच्या राष्ट्रीय संयोजक आहेत.)**

# आझ़ादी का अनृत उत्सव

**ज्या देशात स्वातंत्र्याचा संकोच फक्त ध्वज, घरे, घोषणा, भाषणे आणि कार्यक्रम यात केला जातो, त्या देशात खरे स्वातंत्र्य नसते. लोक प्रतीकांवर लट्टू होतात आणि प्रत्यक्षाकडे दुर्लक्ष करतात. स्वातंत्र्याला प्रतीके नसतात. प्रत्यक्ष अनुभवाला ते यावे लागते.**



**जयदेव डोळे**

१. (अनृत - संस्कृत्तोद्भव नपुंसकलिंगी : असत्य; विशेषण : खोटे) मराठी शब्दरत्नाकर, वा.गो. आपटे, केशव भिकाजी ढवळे, मुंबई, २०१३, पृष्ठ ८९.

२. (अनृत - वि. खोटे, कपटार्जित (पु.) खोटे बोलणारा, लबाडी) गीर्वाणलघुकोश, ज.वि. ओक, कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि. पुणे, २००२, पृष्ठ ३०.

नमस्कार, हा रिपोर्ट आम्ही कोणत्या देशातून आपणास धाडीत आहोत, ते आम्ही सांगू शकत नाही. तो कोण्या देशाविषयी आहे, ते सांगायचेही स्वातंत्र्य आम्हास नाही. तुम्ही म्हणाल, मग कसले आलाय रिपोर्टर? तर आम्ही रिपोर्टरच आहोत; पण अत्यंत गुप्त आहोत. आम्ही आमच्यावरच प्रकट न व्हायचे बंधन घातलेले आहे. का की आम्ही प्रकटलो, तर भल्या-भल्या लोकांची गुपिते बाहेर पडतील आणि त्या देशाचेही समजून येईल. मग त्या देशात आमचे जिणे, फिरणे मुश्कील होईल म्हणून ही खबरदारी. आमचे नाव काय म्हणता? ठीक आहे. ऑर्वेल जॉर्ज असे समजा. १९८४ साली आम्ही जन्मलो असेही समजा. इंग्रजांनी त्या देशाची हालत काय झालीय ते बघायला आम्हाला पाठवून दिले, असेही समजा. तो देश म्हणे स्वतंत्र झाला आणि बराच वयस्कर झाल्याने काळजी वाटून आम्हाला इंग्रजांनी त्या देशात जायला सांगितले. त्या देशाचे वाढलेले वय आणि थकलेली गात्रे पाहून आम्हीही म्हटले, की जायला पाहिजे तिथे. स्वातंत्र्य-स्वातंत्र्य असे जे काय म्हणतात ते पिकले पान आहे, की अजून हिरवे, तजेलदार आहे, ते टिपावे म्हणून गेलो.



**चहावाल्याचे पॅकिंग करून टाकावे असे वाटले!**

तर झाले असे, की त्यादिवशी आम्ही फुटपाथवरून जात होतो. लोक स्वतंत्र वाटत होते. वाहने त्याहून अधिक स्वतंत्र वाटत होती. फेरीवाले, पथारीवाले, दुकानदार सर्व स्वतंत्र दिसत होते. ज्या देशांत चहावाले, पानटपरीवाले पूर्णपणे स्वतंत्र असतात त्या देशांचे फार भले होते, असे दिसत होते. एका चहावाल्याने फुटपाथ अडवलेला होता. आम्हाला पाहताच तो अचानक किटली व कप घेऊन आला आणि कपात चहा ओतून त्याने खिशामधून काही तरी काढले. पाहतो तर कपाला त्याने पॅकिंग केलेले. आम्ही गोंधळलो. तरी चहा प्यायलो. पैसे देताना चहावाला म्हणाला, पॅकिंगचे चार्जेच धरून जीएसटीमुळे ५० रुपये द्यावे लागतील. आम्ही वैतागलो. त्या चहावाल्याचे पॅकिंग करून टाकावे असे वाटले...

**आम्ही पळत-पळत त्या ताफ्यात सामील झालो**

आमच्या अंगावर त्यादिवशी काळ्या रंगाचा सफारी ड्रेस होता. एकाएकी आमच्या मागून वॉंव वॉंव करीत लाल दिव्यांच्या गाड्या आल्या. एक तर आमच्या पुढ्यातच थांबली. तीमधून एक गोल गुबगुबीत माणूस उतरला. लगेच त्याच्या भोवती काळ्या रंगाच्या सफारी ड्रेसवाल्यांचा गराडा पडला. तो ताफा चालू लागताच कोणी तरी आम्हाला धक्का देऊन हातात एक बंदूक देऊन म्हणाले, 'गो गो गो... फॉलो देम यू इडियट...! बेवकूफ, खडा क्यों है?' प्रचंड घाबरल्याने आम्हाला तसे करण्यावाचून पर्यायच नव्हता. आम्ही पळत-पळत त्या ताफ्यात सामील झालो. ताफा एका मोठ्या बंगल्याच्या दिशेने जात होता. आत पांढऱ्या लांबलचक गाड्या,

पांढरे कपडे घातलेले, त्यावर जॅकीट पहनलेले खूप लोक होते. शांतता होती. फक्त मोर ओरडत होते. ज्या देशांत मोर ओरडत असतात, त्या देशाचे ओरडण्याचे स्वातंत्र्य मोरासारखेच दिसायला सुंदर; पण निरुपयोगी असते, असे मनातल्या मनात आम्ही नोंदवले.

**स्वातंत्र्य काटकसरीने, कंजुषीने वापरले पाहिजे**

इकडे गराड्यामागून आमची वरात त्या बंगल्यातल्या एका प्रशस्त हॉलमध्ये पोहोचली. हा गराडा सोडून ५६ इंचाचे पोट असलेला तो गोल गोळा बाहेर आला आणि एका खुर्चीवर बसला. त्याने आमच्याकडे खूण करून त्याच्या शेजारी बंदूक ताणून धरून उभे राहायला बजावले. आम्ही तसे करून समोर पाहिले, तर सुमारे ५० खुर्च्यांच्या मागे असेच बंदूकधारी समोर नेम धरून उभे. सगळी मीटिंगच अशी! मीटिंगप्रमुखाजवळ तर चौघे उभे होते बंदुका सरसावून. मीटिंगप्रमुखाने जाकीट घातलेले, दाढी वाढवलेली आणि तोच एकटा बोलत राहिला बराच वेळ. तो म्हणत होता, ''मित्रों, यहां आये हुए मेरे पचास देशवासीयों, देश के प्यारो, देश की औलादो... कुछ लोग म्हणजे काही देश आपल्या स्वातंत्र्याविषयी फार अभिमानी असतात. दरवर्षी ते स्वातंत्र्यदीन साजरा करतात. साजरा करणे म्हणजे घरीच सुटी घालवतात. अशा घाबरड्या लोकांमुळे स्वातंत्र्य बदनाम होते. शिवाय त्याचा उपयोगही होत नाही. असे वाया घालवायला स्वातंत्र्यसैनिकांनी आपले सर्वस्व अर्पण केले नव्हते. स्वातंत्र्य असे उधळपट्टीसाठी उपलब्ध झाले, की त्याची किंमत राहत नाही. ज्या देशात स्वातंत्र्याचा ऑक्सिजन उगाचच फुप्फुसांत भरून जगत राहणारे लोक असतात ते आमच्या दृष्टीने राष्ट्रद्रोही. स्वातंत्र्य काटकसरीने, कंजुषीने वापरले पाहिजे, असे मीटिंगप्रमुख म्हणून आमचे म्हणणे आहे. तुम्हाला काय म्हणायचेय?''

**...पण मीटिंगमध्ये सन्नाटाच**

मीटिंग गप्प राहिली. एकाही जाकीटवाल्याने तोंड उघडले नाही. मीटिंगप्रमुखाच्या उजव्या हाताला तिसऱ्या खुर्चीवर बसलेल्या जाकीटाने पाण्याच्या ग्लासाकडे हात पुढे करताच एकदम खटाखट, क्लिक क्लिक असे आवाज मीटिंगप्रमुखाच्या मागून आले. बंदुकांचे नेम त्या खुर्चीवर धरले गेले. ते जाकीट खाकरले व पाणी पिऊ लागले. मग रुमालासाठी हात खिशाकडे जाताना पुन्हा बंदुका रोखल्या गेल्या. त्याने रुमालाने चेहरा, टक्कल, कान असे सगळे पुसून कोरडे केले आणि तो टेबलावरच्या फ्लॉवरपॉटकडे टक लावून बसला.

कोणीच काही म्हणेना. आपल्यासाठी 'कंटिन्यू प्लीज'चा इशारा आहे, असे समजून मीटिंगप्रमुख बोलू लागले, ''स्वातंत्र्याचे दोन प्रकार असतात. एक आभासी. दुसरे प्रत्यक्ष. आपल्या देशात असे स्वातंत्र्याचे तुकडे परवडणार नाहीत. प्रत्यक्ष स्वातंत्र्याचा गैरवापर, अतिवापर होतो. गेल्या ७० वर्षांत अशाच प्रत्यक्ष स्वातंत्र्याने आपला देश मागे पडला. नालायक, मूर्ख, येडपट, बावळट लोकांचे राज्य येत राहिले. माझ्या मते ते पुष्कळ झाले. आता देशाला आभासी स्वातंत्र्याची गरज आहे. 'माझे मन' या माझ्या मासिक कार्यक्रमात मी आवाहन केले, तर ८५ कोटी २७ लाख, ८८ हजार २०९ लोकांनी आभासी स्वातंत्र्य द्या, अशी मागणी प्रत्यक्षपणे केली आहे. लोकांनाही आता स्वातंत्र्य क्वचित वापरायची व ठेवणीतली वस्तू असल्याचे पटले आहे. त्यामुळे आता हुशार, चतुर, उमद्या आणि उदार लोकांचे राज्य देशात असावे, असा कौल आपल्याला मिळाला. आपण सगळे हुशार, चतुर वगैरे आहोत, हे लोकांना कळून चुकले आहे. ते तसे समजून घेत नसतील, तर आपण त्यांचे प्रशिक्षण सुरू करू. ते कंपल्सरी करू आणि जोवर आभासी स्वातंत्र्याची आवश्यकता त्यांना जाणवत नाही तोवर त्यांचा पगार, पाणी, वीज, रस्ता, शिक्षण सारे बंद करू! हां, बोला आता. तुमचे मन काय म्हणते?'' असे म्हणत मीटिंगप्रमुख गडगडाटी हसले. आपण मोठा विनोद केला, असे त्यांना वाटले; पण मीटिंगमध्ये सन्नाटाच.

**जो-जो स्वातंत्र्याची चव चाखील त्याला धरा आणि राष्ट्रद्रोही ठरवा**

तेवढ्यात मीटिंगप्रमुखांच्या उजव्या हाताने ४३ व्या खुर्चीवर बसलेल्या जाकिटाचे डोके दाणकन् टेबलावर आदळले. पुन्हा खटाक्, क्लिक आवाज येऊन बंदुका तिकडे वळल्या. गदगदा हलत, खांदे घुसळत ते डोके वर झाले तेव्हा अश्रूंनी ओला चिंब चेहरा प्रकाशात चमकला. हॉल स्तब्ध होताच. जे जाकीट बोलू लागले, ''प्रमुखांनी, नका हो, नका. असे आम्हाला बोलते करू नका. तुमच्या बोलण्यापुढे आम्ही बोलणे म्हणजे सरदारांच्या पुतळ्यापुढे गांधींचा अर्धपुतळा! चहापुढे हातभट्टी!! का आम्हाला विचारता? आम्हाला असे प्रत्यक्ष स्वातंत्र्य मुळीच नको. आम्ही आभासाला पत्करू. आभासी जगू. प्रत्यक्ष स्वातंत्र्यात आमचा जीव घुसमटतो. प्रमुखजी, सुरुवात आज इथे आमच्यापासून करा. तुमच्या सहकाऱ्यांना प्रत्यक्ष स्वातंत्र्याची गरज नाही, तर ती नागरिकांना का असावी? आम्ही नागरिकांचे प्रतिनिधी म्हणून तुम्हाला सांगतो, की स्वातंत्र्य दुर्मीळ आणि दुर्लभ राहू द्या. जो कुणी स्वातंत्र्याचा लोभ ठेवील, त्याला तुरुंगात डांबले जाईल. घराघरांत बंदुका द्या. घरोघरी हेर तयार करा. जो-जो स्वातंत्र्याची चव चाखील त्याला धरा आणि राष्ट्रद्रोही ठरवा. जय विश्वगुरू!''

**शांतम् शिवम् सुंदरम् हाच देशाचा संदेश करायला हवा!**

एवढे म्हणणे पूर्ण होताच सारा हॉल उभा राहिला व त्याने 'स्वतंत्रता हाय हाय', 'स्वतंत्रता मुर्दाबाद' अशा घोषणा द्यायला आरंभ केला. आता मीटिंगप्रमुखांचे डोळे पाझरू लागले. त्यांना हुंदके फुटले. स्फुंदत-स्फुंदत ते बोलू लागले, ''स्वतंत्रता के प्रती आपका तिरस्कार और मेरे प्रती आदर देखकर मैं प्रसन्न हुआ! चलो, आज का दिन हम सारे स्वतंत्रता की याद में स्वतंत्रता स्मरण दिन मनाते हैं. आजसे हर १५ तारीख को स्वातंत्र्यस्मृती दिन मनाने का मैं देश को आदेश देता हूँ!'' मीटिंग संपली. एकमेकांवर रोखलेल्या बंदुका खाली घेतल्या गेल्या. गोलगृहस्थाने आम्हाला त्यांच्या मागून यायला सांगितले. त्यांचे वाहन त्यांच्यानजीक येताच पुन्हा एक जोरदार धक्का आम्हाला देण्यात आला. कोणी तरी आमची बंदूक हिसकावली व आम्हाला ढकलून दिले. वाँव वाँव करीत साऱ्या गाड्या त्या बंगल्यामधून बाहेर पडल्या. आम्हीदेखील पुन्हा एकदा रस्त्यावर आलो. हुश्श करून उभे राहिलो. चला, आपल्यादेखत स्वातंत्र्याचा स्मृतिदिन आकाराला आल्याने आम्ही धन्य धन्य झालो. आमचे लग्न झाले व मुलांना नातवंडे झाली, की आम्ही त्यांना आमची ही गोष्ट सांगू. स्वातंत्र्यसमर्पणास जनता कशी तयार झाली, ते आम्ही रंगवून-रंगवून त्यांना सांगू. जनतेला स्वातंत्र्याचे नसते

वेड असते. वेडच ते! त्याने स्वतःला व समाजाला फार त्रास होतो. वेडी माणसे अशी फार देशाची बदनामी करतात. त्याकरता त्यांना वेड्यांच्या रुग्णालयात डांबावे लागते. औषधोपचार करावे लागतात. शॉक ट्रीटमेंट द्यावी लागते. समाज नेहमी मीटिंगप्रमुखांसारख्या शहाण्या, चतुर माणसांहाती राहिला पाहिजे. समाज शहाणा झाला, की शांत, गप्प राहतो. शांततेत देशाची प्रगती होते. सब की चुप्पी, सब की शांती, सब का गुमान विकासाकडे नेतो. शांतम् शिवम् सुंदरम् हाच देशाचा संदेश करायला हवा.

**...वाटले, सारा कामधंदा सोडावा आणि चड्डी घालून स्वयंसेवक व्हावे**

आम्ही जोरात श्वास घेऊन पाहिला; परंतु आम्हाला मीटिंगमधले प्रमुखजींचे भाषण आठवले. फुकटछाप श्वास घेणारे असे आम्हाला वाटू लागले. स्वातंत्र्य किती विध्वंसक असते, पर्यावरणाचा नाश करणारे असते, याचा विश्वास वाटू लागला. 'फ्रीडम इज कंडम, फ्रीडम मीन्स बोअरडम्' अशा घोषणा आमच्या डोक्यात घुमू लागल्या. आम्हाला फक्त रिपोर्ट बनवायला पाठवलेले होते; पण आम्ही प्रमुखजींच्या स्वप्नाचे शिल्पकार बनलो. वाटले, सारा कामधंदा सोडावा आणि चड्डी घालून स्वयंसेवक व्हावे. प्रचाराचे महत्कार्य करावे. झाले! आम्ही एकदा का विडा उचलला की उचलला. गणवेश घालून आम्ही शाखा कोठे आहे का शोधू लागलो. कोपऱ्यावरच सापडली. जय विश्वगुरू असे म्हणताच आम्हाला प्रवेश मिळाला. कवायती, खेळ आणि व्यायाम झाल्यावर आमचे बौद्धिक घेण्यास एक युवक उभा राहिला. तो सांगू लागला, ''स्वातंत्र्याची आपल्या देशातून हकालपट्टी करायला पाहिजे. ते इंग्रजांकडे परत पाठवून दिले पाहिजे. आयात स्वातंत्र्य आम्हाला नको. आपण देशी स्वातंत्र्य जन्माला घालू. परमपूज्य घोळवलकर गुरुजी यांनी सांगितले होते, की १९४७ अशा विषम संख्येतले स्वातंत्र्य खोटे असते. २०१४, २०२४ अशा सम आकड्यांमधले स्वातंत्र्य खरे असते; पण स्वातंत्र्य हवे तरी कशाला? आरडाओरडा, टीका, वाद, संघर्ष, प्रतिप्रश्न उद्भवतात त्यामुळे. देशी स्वातंत्र्यात जबाबदाऱ्या व कर्तव्ये वाटून दिलेली असतील. जुन्या समाजव्यवस्थेत स्वातंत्र्याची मागणी होत नसे. कारण कामे ठरलेली असत. कोणाला कोणापासून स्वातंत्र्य नको असे. आपल्याला त्या व्यवस्थेचे पुनरुज्जीवन करायचे आहे. तीत एकाचे स्वातंत्र्य म्हणजे दुसऱ्यावर दुप्पट जबाबदारी येण्याची शक्यता होती. म्हणून स्वातंत्र्याची बातच केलेली नव्हती. इंग्रजांनी आपले फार वाटोळे केले. त्यांनी स्वातंत्र्य बहाल केले आणि हक्काची, अधिकाराची, समान वाट्याची, संधीची भाषा सुरू केली. बघा ना, किती मूर्ख, नादान, बेअक्कल, घाणेरडे लोक आपल्याबरोबर येऊन बसतात. आमचे राज्य आले असे सांगतात. यापुढे आपले राज्य यावे म्हणून आधी स्वतंत्रता नाहीशी व्हायला पाहिजे. आपले प्रमुखजी त्याबाबतीत जागरूक आहेत. ते यशस्वी व्हावेत, अशी आपण प्रार्थना करूया. शुरू कर –

**ओम् नमोजी भारता, समाप्त करी स्वातंत्र्या,**
**सुजलाम् सुफलाम् जगावया, नष्ट करी स्वातंत्र्या,**
**बलवान शक्तिवान असावया, घालवू या स्वातंत्र्या,**
**गांधी, नेहरू, काँग्रेस, समाजवादी, आंबेडकरी विचारांच्या,**
**नकली, पुळचट, तकलादू, अदृश्य करू स्वातंत्र्या!**

सर्वांनी काय मन लावून प्रार्थना गायली. ध्वजप्रणाम करून शाखाप्रमुखाने बिकीर म्हटले. आम्ही जेवढा अभिनय करता येईल तेवढा केला. निघालो; पण आमचे स्वातंत्र्य बहुधा शाखेत हरवले. 'नवीन दिसताय? कुठले?' असे म्हणत तो युवक आम्हाला येऊन चिकटला. इथलाच आहे, बरेच असे म्हणून आम्ही सटकायला बघू लागलो; पण तो पक्का स्वातंत्र्यभक्षक निघाला; पण कोविडच्या काळात प्रमुखजींनी दिलेला राष्ट्र के नाम संदेश आमच्या लक्षात होता : आपदा में अवसर! म्हटले, चला, या पोराला जरा छळू या. आम्ही विचारले, तुम्हाला स्वातंत्र्याचा एवढा द्वेष का बरे? तो सांगू लागला, ''आमच्यात असे ठरले आहे, की जे आमच्यापासून तयार



झाले नाही ते आमचे म्हणायचे नाही! आम्ही म्हणजे कोण? आम्ही अर्थात ईश्वराचे दूत. परमेश्वराचे प्रतिनिधी लोक बरेच काही आमच्या उपस्थितीत करतात. मग स्वातंत्र्यावेळी आम्हाला का टाळले? स्वातंत्र्यसुद्धा द्यावे लागते. दानाचे, दक्षिणेचे महत्त्व आपल्या संस्कृतीत अपरंपार आहे ना? मग स्वातंत्र्याची दीक्षा आमच्याकडून का नाही घेतली. हा आमचा सवाल आहे. कळले?''

''पण तुम्ही लोक स्वतःला देशापेक्षा मोठे समजत आहात त्याचे काय? स्वातंत्र्य देशाचे आहे अन् ते देशाने मिळवले आहे.'' – आम्ही.

**इंग्रजांनी आमच्या धर्मात ढवळाढवळ केली नाही**

चड्डीवाला युवक जरा चिडला. तावातावामध्ये टीव्हीवरच्या चर्चेत भाजपाचे प्रवक्ते बोलतात तसे दावे करू लागला. म्हणाला, ''स्वातंत्र्य तरी देशापेक्षा मोठे असते काय? स्वातंत्र्य नसतानाही देश होताच ना? आम्ही देशातच होतो. आमचे काय बिघडले स्वातंत्र्य नाही म्हणून? इंग्रजांनी आमचा मान राखला. आमच्या धर्मात


आजादी का अमृत महोत्सव

ढवळाढवळ केली नाही. धर्म तर देशापेक्षा प्राचीन आहे. धर्म आणि आम्ही वेगळे नव्हेत. म्हणून आम्ही पुरातन, सनातन असताना आम्हाला न विचारता आणलेले स्वातंत्र्य आम्ही मानत नाही. आम्हाला विटाळ आहे त्याचा.''

युवकाचे घर जवळ आले होते बहुधा. आम्हाला 'जय श्रीराम' करून तो गेला. 'जय हिंद'ची जागा 'जय श्रीराम'ला द्यायचा हट्ट त्यातून ऐकू आला. गंमत वाटली. ये आझादी झूठी है, असे म्हणण्याचेही स्वातंत्र्य त्यांना नकोय! फार पूर्वी कम्युनिस्ट मंडळी देशाचे स्वातंत्र्य खोटे आहे, लोकशाही बनावट आहे, असे म्हणत संसदेत जायची. लोकांना हा दुटप्पीपणा समजला. संसदेची कवाडे त्यांना बंद करण्यात आली. राज्ये हातून गेली. आता या राष्ट्रवाद्यांची पाळी दिसतेय, असे स्वतःला बजावत आम्ही देशाचे निरीक्षण करीत पुढे निघालो.

**ही तर स्वातंत्र्याची उघड-उघड प्रतारणा!**

वाटेत टीव्हीची एक शोरूम लागली. खूप टीव्ही चॅनल्स त्यात काहीबाही दाखवत होती. सर्वच जाहिरातींमध्ये घर आणि त्यातली माणसे आवर्जून दिसत होती. घरामध्येच राहणारी माणसे त्यांना घरपोच वस्तू आणि सेवा देणाऱ्यांच्या जाहिराती भरपूर दिसल्या. काळजी वाटली. अजूनही 'वर्क फ्रॉम होम' चालू ठेवल्याचे दिसत होते. त्यामुळे घरातच औषधे आणून देणारे, खाण्याचे पदार्थ पोहोचवणारे, किराणा सामान भरून देणारे, भाजीपाला भरणारे, घरातच क्लासेस घेणारे, चार भिंतीतच व्यायाम करायला लावणारे, घरामध्ये चित्रपट पाहायला लावणारे, घरात पलंगावर खेळ खेळायला देणारे, घरपोच कर्ज आणून देणारे, घरात हॉस्पिटल उघडून बरे व्हा म्हणणारे, घरापर्यंत तयार कपडे विकणारे, घरामध्ये पुस्तके आणून देणारे, घरात येऊन केस कापून देणारे, असे किती तरी धंदे लोकांचे स्वातंत्र्य घरबंद करीत असल्याचे आम्ही पाहत राहिलो. स्वातंत्र्याचा असा कोंडमारा आश्चर्यकारक होता. लोक आळशी झाले आहेत का? त्यांना रस्त्यांवर, दुकानांत, बागेत जावेसे वाटू नये, याचा अर्थ त्यांना स्वातंत्र्याची काही किंमत उरली नाही, असे समजायचे का? म्हाताऱ्यांचे सोडा, ते एक वेळ घराबाहेर पडू शकणार नाहीत; पण देशाची तरुण पिढीसुद्धा रस्त्यावर येऊ इच्छित नाही म्हणजे काय? ही तर स्वातंत्र्याची उघड-उघड प्रतारणा!

हे झाले बातम्यांच्या आसपास येऊन जाणाऱ्या जाहिरातींविषयी. बातम्यांत आम्हाला काय दिसले? देशात खाजगी चॅनलसचा सुळसुळाट असला तरी साऱ्यांचे वागणे सरकारी चॅनलसारखे दिसू लागले. म्हणजे निखळ प्रचार, सरकारचा बचाव, सत्ताधाऱ्यांची पाठराखण, राज्यावर असलेल्या पक्षाची धोरणे, विरोधी पक्षनेत्यांची टिंगल मस्करी, त्यांना तुरुंगात, अटकेत वा न्यायालयात नेतानाचे चित्र आणि चर्चांविषयी तर काय म्हणावे? ज्या देशात सूत्रसंचालक पक्षपाती असून, तो मुद्दाम सरकारी पक्षाची बाजू भक्कम करू पाहतो, त्या देशाची माध्यमे लोकशाहीनिष्ठ नसतात. ती असतात व्यक्तीनिष्ठ आणि पक्षनिष्ठ. सबब ती हुकूमशाहीची वाहक बनतात. स्वातंत्र्याचे हरण या माध्यमांतून आधी होते.

**लोक प्रतीकांवर लट्टू होतात आणि प्रत्यक्षाकडे दुर्लक्ष करतात**

आम्ही टीव्हीसमोर उभे असताना आमचा मोबाइल क्षणभर ठणकून थांबला. साहेबांचा संदेश आला की काय, असे वाटल्याने आम्ही मोबाइल उघडला. तो काय! घर घर तिरंगा फडकवा, असा साक्षात प्रमुखजींचा संदेश. दुसरा होता, 'वन् नेशन. वन इमोशन. वन आयडेन्टिटी' असे बजावत तिरंगा फडकावण्याचाच. ज्या देशात स्वातंत्र्याचा संकोच फक्त ध्वज, घरे, घोषणा, भाषणे आणि कार्यक्रम यात केला जातो, त्या देशात खरे स्वातंत्र्य नसते. लोक प्रतीकांवर लट्टू होतात आणि प्रत्यक्षाकडे दुर्लक्ष करतात. स्वातंत्र्याला प्रतीके नसतात. प्रत्यक्ष अनुभवाला ते यावे लागते.

वन् नेशन ठीक आहे; पण एक भावना आणि एक ओळख का म्हणून? वैविध्य, वैचित्र्य आणि वैपुल्य जपायचा अधिकार म्हणजे स्वातंत्र्य या देशात नाही? मारून मुटकून एकत्वाचा आग्रह हा धरायला लावायचा? संपूर्ण देशासाठी एकाच प्रकारचा अभ्यासक्रम, एकाच धाटणीचा इतिहास आणि एकाच भाषेचा हट्ट काय म्हणून आणि कोणासाठी? स्वातंत्र्याचा सोपा अर्थ हा, की भरपूर पर्याय उपलब्ध असणे. संधींची संख्या अमाप असणे. क्षमतांचा वापर करण्यासाठी वाव असणे; पण सत्ताधारी तर सारी दुनिया आपल्या हाती एकवटायला निघाले... आम्ही अचानक विचारवंत बनलो की काय?

**वाचा नसलेल्याला मुका म्हणतात...**

नक्कीच आम्ही रस्ता चुकलो होतो. आरामात, निवांत जाणारा एक वयोवृद्ध माणूस आम्हाला दिसला. त्यांना थांबवून आम्ही आम्हाला जिथे जायचे होते ती जागा विचारली. त्यांना बोलता येत नसावे बहुधा. तेवढ्यात शेजारच्या दुकानातून एक बाई आल्या. त्या त्यांच्या पत्नी असाव्यात. आम्ही त्यांना पत्ता सांगितला. त्या सांगू लागल्या, ''तुम्ही सांगताय तो स्वातंत्र्यचौक आता जमीनदोस्त झाला आहे. त्याचे नाव संघालय चौक आहे. तुम्हाला ज्या इमारतीत जायचेय ती 'फोर्टी सेव्हन' इमारतही पाडलेली आहे. तिचे नाव आता ब्रह्मालय झाले आहे. तिथे कोणी स्वातंत्र्यसैनिक राहत नाहीत.''

आम्ही गडबडलो. असे कसे आमचे साहेब चुकले? त्यांनी तर ठामपणे हे पत्ते दिलेले होते. असो. 'जिथे एक संग्रहालय आणि ग्रंथालय होते स्वातंत्र्यसैनिकांचे. ते असेल ना?' आम्ही विचारले. त्यासरशी त्या बाईंचा चेहरा कळवळला. आवाजात एकदम कातरपणा आला. त्या सांगू लागल्या, ''अहो, संगळे संपवले त्या लोकांनी. म्हणजे प्रमुखजींच्या पार्टीने. त्यांचा म्हणे अशा स्वातंत्र्यावर आणि त्याच्या पुराव्यांवर विश्वास नाही. त्यांनी ते उचलून कुठे नेलेय ते माहीत नाही. खोट्या स्वातंत्र्यापेक्षा नसलेले स्वातंत्र्य बरे, असे सांगून त्यांनी सारे कागद गायब केले! खरे-खोटे ठरवणारे ते कोण? त्यांचा काय सहभाग स्वातंत्र्य मिळवण्यात?''

आम्ही चरकलो. आता रिपोर्ट कसा पाठवणार? त्या बाईंना आम्ही विचारले, तुम्हाला कसे काय एवढे माहीत? हसून त्या म्हणाल्या, आमचे हे स्वातंत्र्यसैनिक आहेत. त्यांच्या डोळ्यांदेखत त्या घटना घडल्या. तेव्हापासून त्यांची वाचाच हरपलीय! त्यांचे नाव काय? आम्ही विचारले. त्या बोलल्या, वाचा नसलेल्याला मुका म्हणतात...

**(लेखक ज्येष्ठ माध्यमतज्ज्ञ आहेत.)**




# भारत वय वर्षे 75

**येत्या १५ ऑगस्ट रोजी भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने सरकारने देशभर 'आजादी का अमृत महोत्सव' साजरा करण्याचे ठरविले आहे. त्यादिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी लाल किल्ल्यावरून देशाला उद्देशून काय सांगणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**



विजय नाईक

२००८ मध्ये केंद्रात सत्तेवर आल्यापासून आपण ''देश कसा बदलला, संपन्न केला, सब का साथ, सब का विकास, सब का विश्वास, या घोषणेनुसार सरकारच्या धोरणांनी कशी वाटचाल केली, भारत कसा विश्वगुरू बनला आहे,'' असे प्रशंसोल्लेख ते करण्याची शक्यता आहे. भाजपच्या गेल्या आठ वर्षांच्या कारकीर्दीत देशाला कसे स्थैर्य लाभले, जगात भारताची प्रतिमा व मान कशी उंचावली, याचा उल्लेख ते करण्याची शक्यता टाळता येत नाही.

तथापि, स्वतंत्र भारताच्या इतिहासात, पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी, डॉ. मनमोहन सिंग व काँग्रेस तसेच, विरोधकांचा देशाला विसर पडावा, या दिशेने सरकारची पावले पडत आहेत. ज्या-ज्या राज्यात काँग्रेस व अन्य विरोधी पक्षांची सरकारे आहेत, त्यांच्यामागे राज्यपालांचा वा त्यातील विरोधी नेत्यांच्या गुप्तचर संघटना, सीबीआय, एनफोर्समेन्ट संचालनालय, तसेच, इंडियन पिनल कोड, परकीय चलन नियमन कायदा, प्रिव्हेन्शन ऑफ मनी लाँड्रिंग ॲक्ट, (या कायद्याला सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडील निकालाने वाघनखे प्रदान केली असून, त्याचा पुनर्विचार व्हावा, अशी याचिका सतरा विरोधी पक्षांतर्फे सर्वोच्च न्यायालयात करण्यात येणार आहे. त्यांच्या मते हा कायदा लोकशाहीला घातक आहे) देशद्रोहविषयक कायदा आदींचा जोरदार ससेमिरा लावून ते कसे भ्रष्टाचारात आकंठ बुडालेले आहेत, हे देशाच्या चव्हाट्यावर टांगले जात आहे. जनतेच्या दैनंदिन समस्यांची चर्चा जवळजवळ बंद झाली आहे.

**मनी लाँड्रिंगचा ठपका असलेले नेते**

मनी लाँड्रिंगचा ठपका असलेल्या नेत्यांत सोनिया गांधी, राहुल गांधी, डॉ. फारुख अब्दुल्ला, संजय राऊत, तृणमूल काँग्रेसचे पार्था चटर्जी, अर्पिता मुखर्जी या अतिमहत्त्वाच्या नेत्यांचा समावेश झाला आहे. अब्दुल्ला यांना कारावासात राहण्याची सवय आहे. राऊत यांना ती करावी लागेल. आता सोनिया गांधी व राहुल गांधी यांची अटक केव्हा होणार, हे पाहायचे.

उपलब्ध आकडेवारीनुसार, भारतात प्रतिवर्षे होणाऱ्या मनी लाँड्रिंगचे (अवैध सावकारी-काळा पैसा पांढरा करणे, त्यात कर बुडविण्याच्या उद्देशाव्यतिरिक्त तो पैसा जमीन खरेदी, स्थावरजंगम मालमत्तेत गुंतविणे आदींचा समावेश होतो). २०१४-१५ मध्ये १११, २०१६-१७ मध्ये २००, २०१७-१८ मध्ये १४८, २०१८-१९ मध्ये १९५, २०१९-२० मध्ये ५६२, २०२०-२१ मध्ये ९८१ व २०२१-२२ मध्ये १,१८० खटले दाखल करण्यात आले. यावरून, सरकारने चालविलेल्या चढत्या क्रमाच्या मोहिमेची कल्पना यावी. लोकसभेला देण्यात आलेल्या माहितीनुसार, फेमा (फॉरेन एक्स्चेंज मॅनेजमेंट ॲक्ट व पीएमएलए-प्रिव्हेन्शन ऑफ मनी लाँड्रिंग ॲक्ट) या कायद्यांच्या अंतर्गत २०१९ ते २०२२ दरम्यान १४,१४३ खटले दाखल करण्यात आले असून, त्याचे प्रमाण २०१४ ते २०१७ या वर्षांच्या मानाने १८७ टक्के अधिक आहे. न्यायालयांनी मनी लाँड्रिंगसंदर्भात आजवर केवळ २५ लोकांना दोषी ठरविले व ईडीने

आजवर ४०० लोकांना अटक केली.

याठिकाणी प्रश्न उपस्थित होतो, की भारतीय जनता पक्ष, त्यांचे मित्रपक्ष व त्यांची सरकारे ज्या राज्यांत आहेत, ते सारे धुतल्या तांदळासारखे स्वच्छ आहेत काय? पश्चिम बंगालमध्ये अमाप संपत्ती असल्याचे, मनी लॉंड्रिंग करण्याचे आरोप होते, ते भाजपमध्ये प्रवेश करताच निर्दोष झाले, हे कसे? भाजप हाच भ्रष्टाचारमुक्त पक्ष आहे, अशी प्रतिमा उभी करण्याचा क्षणाक्षणाला प्रयत्न चालू आहे. २००० ते २००१ दरम्यान भाजपचे अध्यक्ष असलेल्या बंगारू लक्ष्मण यांना कार्यालयात पैसे घेताना 'रंगेहाथ' पकडले होते, हे आता इतिहासजमा झाले आहे.


भ्रष्टाचाराचे निर्मूलन केले पाहिजे, यात कुणाचेही दुमत नाही; पण ते करताना पक्षपात नसावा, डूख धरून अथवा सुडाच्या भावनेने कारवाई नसावी. 'लॉ विल टेक इटस् ओन कोर्स' हे वाक्य वारंवार उच्चारताना केवळ विरोधकांपुरता त्याचा वापर केला जाऊ नये, ही किमान अपेक्षा आहे. या प्रकारचे धोरण रशिया, चीन, तुर्कस्तान, सिरिया व ज्या देशात एकाधिकारशाही आहे, तेथे राज्यकर्ते अवलंबिताना दिसतात.

**सरकारची सुधारणावादी प्रतिमा अद्याप जनतेत रुजलेली नाही**

पंतप्रधान मोदी यांनी चेन्नई येथील अण्णा विद्यापीठाच्या ४२ व्या वर्धापना निमित्त ३० जुलै रोजी केलेल्या भाषणात मात्र वेगळा सूर लावला. ते म्हणाले, की शक्तिशाली सरकार साऱ्या गोष्टींचे नियंत्रण करू शकत नाही. हे विधान एका दृष्टीने खरे आहे. कारण, भारतासारख्या खंडप्राय देशात केव्हा, कुठे काय घडेल, याचे भाकीत अथवा अंदाज कोणत्याही सरकारला करता येणार नाही. घटना घडून गेल्यावरच सरकारची कार्यवाही, कृती सुरू होते, हे आपण पाहत आलो आहोत. उदा. सुरक्षा संघटनांनी डोळ्यात तेल घालून कितीही पाळत ठेवली, तरी दहशतवाद्यांचे हल्ले होणे थांबलेले नाहीत. निरनिराळ्या अपघाती घटना, नैसर्गिक संकटे यावर कोणत्याही सरकारचा काबू नसतो. मोदी म्हणाले, ''शक्तिशाली सरकार सारे काही नियंत्रण करू शकत नसले, तरी आम्ही एक बदल केलाय. तो म्हणजे, हस्तक्षेप करण्याचा शासनाचा आवेग (इम्पल्स) यावर नियंत्रण केले आहे. सुधारणा झाल्या पाहिजेत, या विचाराचे केंद्र सरकार असून, त्या दिशेने आम्ही काम करीत आहोत.'' प्रत्यक्षात, सरकारची सुधारणावादी प्रतिमा अद्याप जनतेत रुजलेली नाही.

काही वर्षांपूर्वी मोदी यांनी नोटाबंदीची एकाएकी घोषणा केली होती. काळा पैसा संपुष्टात आणण्यासाठी ते आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले होते. तसेच, ''बाहेरचा काळा पैसा देशात आणून प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये जमा करीन,'' असे आश्वासन त्यांनी २०१४ च्या निवडणूक प्रचारादरम्यान जनतेला दिले होते. त्याचा सोईस्कर विसर त्यांना पडला आहे. दरम्यान, पश्चिम बंगालचे माजी मंत्री पार्था चटर्जी व त्यांची सचिव अर्पिता मुखर्जी यांच्या घरांवर घातलेल्या छाप्यादरम्यान मिळालेले ५० कोटी रुपये व काही किलो सोने, यामुळे तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष व मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या चांगल्याच कोंडीत सापडल्या आहेत. एनफोर्समेन्ट डायरेक्टोरेट एकामागून एक राजकीय नेते, व्यापारी, उद्योगपती यांचे गैरव्यवहार प्रकाशात आणीत आहे. कोट्यवधी रुपये व तितक्याच किमतीची संपत्ती जप्त करताना दिसत आहे. यावरून, मोदी यांचा भ्रष्टाचाराविरुद्धचा लढा हे 'वर्क इन प्रोग्रेस' असल्याचे दिसते.

'नॅशनल हेराल्ड'प्रकरणी काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी व राहुल गांधी यांची गेले काही दिवस चाललेल्या तपासणीनंतर ३ ऑगस्ट रोजी ईडीने बहादूरशहा झफर मार्गावरील हेराल्ड हाउसवर छापा घातला व तेथील संपत्तीचा ताबा (अटॅचमेंट ऑफ असेटस्) घेण्याचे जाहीर केले. ईडी आता रायसीना मार्गावरील राजीव गांधी भवनाच्या भव्य इमारतीकडे वळण्याची शक्यता नाकारता येत नाही. सत्तेत असताना काँग्रेसने निरनिराळ्या राज्यांतून कार्यालये स्थापन करण्याच्या नावाखाली जमीन व इमारती घेतल्या होत्या. त्यावर आता गंडांतर येणार.



**देशाची कोणतीही समस्या सामोपचाराने सुटण्याची शक्यता नाही**

केंद्रात माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार असताना भाजपने येथील राऊज एव्हेन्यू मार्गावरील काही इमारती ताब्यात घेतल्या होत्या. डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली यूपीएचे सरकार आल्यावर त्याविरुद्ध कारवाई करण्यात आली होती. सारांश, राजकारणात 'बळी तो कान पिळी' या प्रथेनुसार, सत्तेत येतो तो विरोधकांविरुद्ध कारवाई करणार, या अलिखित प्रथेचेच पालन आता होत आहे. सोनिया गांधी व राहुल गांधी, पी. चिदंबरम, चिरंजीव कार्ती चिदंबरम यांच्याविरुद्ध ईडीतर्फे कारवाई आदी होत असताना काँग्रेस पक्षाचे संसद व संसदेबाहेर धरणे, मोर्चे, आंदोलन आदी

चालू असले, तरी सामान्य जनतेला त्यात काही स्वारस्य नसल्याने त्यांना पाठिंबा देण्यासाठी सामान्य माणूस रस्त्यावर उतरलेला नाही. सत्तारूढ पक्ष व विरोधक यांचे वैमनस्य इतके शिगेला पोहोचले आहे, की देशाची कोणतीही समस्या सामोपचाराने सुटण्याची शक्यता नाही.

शक्तिशाली सरकारच्या हातात सारे काही नसते, याचे दुसरे उदाहरण होय, केंद्राच्या तीन कृषिविधेयकांना शेतकरी समुदायाकडून झालेला कट्टर विरोध, त्यात सातशे शेतकऱ्यांचा झालेला मृत्यू व अखेर सरकारला घ्यावी लागलेली माघार. त्या कायद्यांबाबत मोदी, शहा वा कृषिमंत्री नरेंद्रसिंग तोमर आता एक शब्दही बोलत नाहीत.

सरकार काँग्रेसचे असो की भाजपचे, आर्थिक परिस्थिती नाजूक झाली, की तिचा दोष सर्वस्वी आंतरराष्ट्रीय घटनांवर टाकला जातो. इंदिरा गांधी यांच्या काळात त्यांचे सरकार पदच्युत करण्यासाठी परकीय शक्तींचा वारंवार उल्लेख केला जायचा. आता देशाच्या ढासळणाऱ्या आर्थिक परिस्थितीसाठी रशियाच्या युक्रेनवरील युद्धाला जबाबदार धरले जात आहे. देशात चलनवाढ झाली आहे, जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढल्या, पेट्रोलियम पदार्थांचे भाव अवाच्या सव्वा झाले, रुपयाची घसरण झाली. याला युद्ध व आंतरराष्ट्रीय स्थिती जबाबदार असल्याचे सरकारतर्फे सांगितले जाते. हे सांगितले, की सरकार हात झटकायला मोकळे. अलीकडे तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी एक भारी विनोद केला. तेलंगणातील ढगफुटीनंतर पूरग्रस्त भागाची विमानाने पाहणी केल्यावर ते म्हणाले, ''हे परकीय शक्तींचे कारस्थान दिसते!'' रोजगारनिर्मितीबाबत बोलणेही सरकारने सोडले आहे.

नोटाबंदी झाल्यापासून ग्रामीण भागातील लाखो लोक शहरातून गावाकडे गेले होते. त्यात कोरोनाची भर पडल्याने गेली दोन वर्षे लोकांना अतोनात हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. कोरोनाने अजूनही पिच्छा सोडलेला नाही. आता मंकी पॉक्सची भीती भेडसावते आहे. आरोग्य क्षेत्रात आणखी काय काय संकटे येतील, याचे भाकीत सरकारसह कुणी करू शकत नाही. म्हणूनच, 'रात्रंदिवस वैऱ्याचा आहे,' अशी स्थिती आहे.

**...याचा अर्थ त्यांच्यासाठी पैशाच्या थैल्या सैल करण्यात येणार काय?**

मोदी म्हणतात, तसे साऱ्या गोष्टी शक्तिशाली सरकारच्या हाती नसल्या, तरी विरोधकांची राज्याराज्यांतील सरकारे मोडकळीस आणून त्याजागी भारतीय जनता पक्षाची सरकारे स्थापन करण्याचा हस्तक्षेप सत्तारूढ पक्ष सातत्याने करीत आहे. मध्य प्रदेश, महाराष्ट्र ही ताजी उदाहरणे असून, दिल्ली, राजस्थान, छत्तीसगढ व पश्चिम बंगाल येथे पक्षफोडीचे काम चालू आहे. त्यासाठी कोट्यवधी रुपये उडविले जात आहेत. तो पैसा आला कुठून? त्याचा मनी लाँड्रिंगशी काही संबंध आहे काय? तीस-चाळीस आमदार पंचतारांकित हॉटेलमध्ये अनेक दिवस कसे राहू शकतात? यावर भाजप वा आमदार चकार शब्दही उच्चारीत नाहीत. जनतेने या उधळपट्टीकडे डोळे झाकून पाहावे, अशी त्यांची अपेक्षा असते. भाजपनेते व अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांनी असा दावाही केलाय, की तृणमूल काँग्रेसचे ३८ आमदार भाजपच्या संपर्कात आहेत. याचा अर्थ त्यांच्यासाठी पैशाच्या थैल्या सैल करण्यात येणार काय? मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना सर्वाधिक त्रास देणाऱ्या राज्यपाल जगदीप धनखड यांना मोदींनी उपराष्ट्रपतिपदी निवडले. राज्यसभेच्या सभापटलावर तृणमूल काँग्रेसच्या खासदारांना ताळ्यावर आणण्याचे काम त्यांना करावे लागणार आहे. त्याचबरोबर, विरोधकांवर अंकुश ठेवण्याचे काम ते करतील. लोकसभेचे सभापती व राज्यसभेचे सभाध्यक्षांनी निःपक्षपातीपणे काम करणे अपेक्षित असते; परंतु विरोधी पक्ष त्यांच्यावर वारंवार पक्षपातीपणाचा आरोप करीत आहेत. दोन्ही सदनातील विरोधी पक्ष सदस्यांचे निलंबन करण्याचे प्रकार वाढलेत. पावसाळी अधिवेशनात निलंबन करण्यात आलेल्या सदस्यांची संख्या तब्बल २३ वर गेली. संसदेचे कामकाज पहिले दहा एक दिवस चालले नाही, याला केवळ विरोधकांना नव्हे, तर सत्तारूढ पक्षालाही जबाबदार धरावे लागेल.

**न्याय देणे ही सोपी जबाबदारी नसते**

लोकशाहीला धक्का देणाऱ्या दोन गोष्टी प्रकर्षाने जाणवत आहेत. न्यायाधीशांवर सत्तारूढ पक्ष व त्यांच्या समर्थक ट्रोल्सकडून होणारी टीका व दुसरे म्हणजे, सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश एन.व्ही.




रमणा यांनी दृक्‌श्राव्य माध्यमांवर समांतर न्यायालये चालविण्याबाबत ठेवलेला ठपका. ३ जुलै रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्या. जे.बी. पार्डीवाला म्हणाले, ''न्यायमूर्तींवर होणाऱ्या वैयक्तिक हल्ल्यांमुळे एक घातक स्थिती निर्माण होत आहे. निकालांवर हल्ले होत असून, कायद्याच्या राज्याची (रूल ऑफ लॉ) हानी होत आहे.'' टीका, हल्ले प्रामुख्याने सोशल मीडिया व डिजिटल मीडियातून होत आहेत. त्यांच्यावर कोणताही अंकुश नाही. टीव्ही चॅनल्समधून एखाद्या विषयावर संतुलित चर्चा घडवून आणण्याऐवजी एकमेकांशी भांडणे लावण्याच्या उद्देशाने प्रश्नांची योजना केलेली असते. त्यातून काही निष्पन्न होत नाही. पार्डीवाला यांच्यानुसार, ''न्यायव्यस्थेचे नुकसान होत असून, तिच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचत आहे.'' न्या. धनंजय चंद्रचूड यांनीही प्रसारमाध्यमांना संयमाने कार्य करण्याचा सल्ला दिला आहे, तर मुख्य न्यायाधीश रमणा यांनी म्हटले आहे, की न्याय देणे ही सोपी जबाबदारी नसते.

**इलेक्ट्रॉनिक माध्यमे व सोशल मीडियाने जबाबदारीने वागावे**

रांची येथे माजी न्या. सत्यव्रत सिन्हा यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'न्यायमूर्तींचे जीवन' या विषयावर दिलेल्या भाषणात त्यांनी लोकशाही

कमकुवत करण्याचा ठपका 'कांगारू कोर्टस्' चालविणाऱ्या प्रसारमाध्यमांवर ठेवला. ते म्हणाले, की विशिष्ट हेतू मनात योजून पूर्वग्रहदूषित व द्वेषमूलक माहितीच्या आधारे चालविल्या जाणाऱ्या चर्चा लोकशाहीला कमकुवत करीत आहेत. ''इलेक्ट्रॉनिक माध्यमे व सोशल मीडियाने जबाबदारीने वागावे,'' असा सल्ला त्यांनी दिलाय. तथापि, टीआरपीच्या मागे लागलेली माध्यमे न्यायमूर्तींचा सल्ला किती गांभीर्याने घेणार, हा प्रश्नच आहे.

आणखी एक खटकणारी बाब म्हणजे, अल्पसंख्याकांवर होणारे हल्ले व टीका व भाजपमध्ये त्यांचे कमी झालेले महत्त्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात सिकंदर बख्त व आरीफ बेग हे ज्येष्ठ नेते होते. त्यानंतर भाजपमधील मुस्लीम नेत्यात शहानवाझ हुसेन, आरीफ खान, एम.जे. अकबर, सईद झफर इस्लाम, नजमा हेपतुल्ला, मुख्तार अब्बास नक्वी यांचा समावेश होतो. त्यापैकी नक्वी, इस्लाम व अकबर राज्यसभेतून जूनमध्ये निवृत्त झाले. परिणामतः राज्यसभेत भाजप हा 'मुस्लीम सदस्यमुक्त' पक्ष बनलाय. केरळचे राज्यपाल आरीफ खान वगळले, तर भाजपमध्ये कोणताही ज्येष्ठ मुस्लीम नेता आता उरलेला नाही. प्रवक्त्यांपैकी शजिया इल्मीक, शहानवाज हुसेन व सईद झफर इस्लाम हे अल्पसंख्याक आहेत.

## पंतप्रधानांनी केलेले आवाहन 'संघ' पाळणार का?

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'हर घर तिरंगा'ची घोषणा दिली आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने प्रत्येकाने राष्ट्रध्वज आपापल्या घरी लावण्याचे आवाहन करण्यात आले आहे; परंतु ''ज्या मुशीतून जनसंघ व नंतर भारतीय जनता पक्ष राजकारणात आला, त्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंचालक मोहन भागवत व दत्तात्रय होसबाळे यांच्या घरावर तो झळकणार काय,'' असा प्रश्न विरोधक विचारीत आहेत. रा.स्व. संघाच्या फेसबुक पेजवरही तो झळकलेला दिसत नाही. काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी पृच्छा केली आहे, की ज्या रा.स्व. संघाच्या नागपूरच्या मुख्यालयावर ५२ वर्षे राष्ट्रीय ध्वज दिसला नाही, ते पंतप्रधानांनी केलेले आवाहन पाळणार का?**



### ...तर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरीतून कुणी वाचू शकणार नाही

राज्यसभेचे अध्यक्ष व उपराष्ट्रपतीपदी असल्यापासून सईद महंमद हमीद अन्सारी हे मुस्लीम असल्याने भाजपच्या टीकेचे लक्ष्य बनले आहेत. पाकिस्तानी पत्रकार नुसरत मिर्झा याने अन्सारी यांच्यावर 'आपल्याला गुपिते' सांगितल्याचा आरोप केला. तो मुद्दा भाजपने इतका उचलून धरला, की अन्सारी यांनी 'संबंधित पत्रकाराला आपण भेटलोही नाही,' असे खंडन करून फरक पडलेला नाही. नुसरत मिर्झा हा केवळ बढाया मारणारा पत्रकार असून, त्याच्या वक्तव्यांकडे पाकिस्तानातदेखील गांभीर्याने पाहिले जात नाही. असे असताना अन्सारी यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याची तळी भाजपने उचलून धरणे, हे शोभत नाही. ज्या व्यक्तीने अनेक वर्षे भारताचा राजदूत म्हणून इस्लामी व अरब देशात कार्य केले, जे देशाचे चीफ ऑफ प्रोटोकोल (शिष्टाचारप्रमुख) होते व नंतर देशाचे उप राष्ट्रपती झाले, त्यांच्याबाबत जाहीर शंका व्यक्त करणे, ही संस्कृती रुजली, तर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरीतून कुणी वाचू शकणार नाही.

विरोधकांवर व पत्रकारांवर देशद्रोहाचे आरोप आधीच झाले आहेत. तो सिलसिला अद्याप संपलेला नाही. यातून स्पष्ट होणारी गोष्ट म्हणजे, सरकारला स्वतंत्र पत्रकार व विरोधकांचे भय वाटते. अन्यथा, जम्मू-काश्मीर राज्यातील राजकीय नेते, पत्रकार, व्यापारी व वकील आदी एकूण ४५० व्यक्तींच्या परदेश प्रवासावर सरकारने बंदी घातली नसती. काश्मिरी लोकांनी आपली व्यथा आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर मांडावी, यालाच सरकारचा विरोध आहे. वस्तुतः या राज्यातील 'परिस्थिती सामान्य व सुधारली आहे,' असे वारंवार जाहीर करणाऱ्या खंबीर सरकारला त्यांचे भय वाटते आहे.

### देशातील कायदा व सुरक्षा चिंताजनक

भारत अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत असताना, केंद्र सरकारच्या स्थैर्याला कोणताही धोका नसताना, कुठे, काही खुट्ट झाले, की लगेच दंडुका घेऊन सरकारने त्यांच्या मागे लागणे, पोलीस कारवाई करणे, यामुळे देशात दहशतीचे वातावरण पसरले आहे. लोकशाहीपेक्षा एकाधिकारशाहीचेच प्रतिबिंब पडले आहे. भाजपप्रणीत बजरंग दल, विश्व हिंदू परिषद, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद व राज्याराज्यांतील भगव्या संघटनांनी कायदा हातात घेण्याचे काम चालविले असून, ''काय करावे व काय करू नये'' याचा आदेश ते सरकारला देत आहेत. भाजपच्या प्रवीण नेतारू या कार्यकर्त्याचा खून होताच, कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी कर्नाटकात 'उत्तर प्रदेशचे (वचपा काढण्याचे) मॉडेल' राबविण्याची घोषणा केली. त्याही पुढे जाऊन कर्नाटकचे उच्चशिक्षण खात्याचे मंत्री अश्वथ नारायण यांनी 'कम्युनल फोर्सेसचे एनकाउंटर' करण्याचा संकेत दिला. परिणामतः देशातील कायदा व सुरक्षेचे वातावरण चिंताजनक पातळीवर जाणार, अशीच चिन्हे दिसत आहेत. •••

**(लेखक दिल्लीस्थित ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**

# कुठे आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील सामाजिक स्वातंत्र्य?

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाने धर्मनिरपेक्षता, सर्वसमावेशक राष्ट्रवाद, लोकशाही आणि समाजवाद या चार मूल्यांचा स्वीकार केला आहे. आता मात्र या चारही मूल्यांना आव्हान मिळत आहे. अलीकडे धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाऐवजी सांस्कृतिक राष्ट्रवादाचा पुरस्कार होतोय. या सांस्कृतिक राष्ट्रवादाचा 'आत्मा' हिंदुत्व आहे.**



बी.व्ही. जोंधळे



डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात कधीही सहभागी झाले नव्हते. याचा अर्थ ते स्वातंत्र्याच्या विरुद्ध होते असा नव्हे, तर मिळणाऱ्या स्वातंत्र्यात दलित-वंचितांना समान अधिकार मिळणार आहेत की नाही, हा त्यांचा ठाम सवाल होता. खरे तर, बाबासाहेबांचा स्वातंत्र्यलढा इतरांच्या स्वातंत्र्यलढ्यापेक्षा वेगळा होता. बाबासाहेब एकाच वेळी राज्यसंस्थेसह धर्मसत्तेशीही लढत होते. राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यावर सर्व सामाजिक प्रश्न सुटतील, असे बाबासाहेबांना वाटत नव्हते नि ते खरेही होते. म्हणून बाबासाहेब आमच्या अधिकारांचे काय, हा प्रश्न पोटतिडकीने विचारून स्वातंत्र्यलढ्याला ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करीत असतानाच दलितोद्धारासाठी कायद्याच्या राज्याची, राज्यघटनेची व लोकशाही समाजव्यवस्थेची मागणी करीत होते. तेव्हा आता असा प्रश्न आहे, की स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणजे स्वातंत्र्याची पंचाहत्तरी साजरी करीत असताना बाबासाहेबांच्या संकल्पनेतील सामाजिक न्यायाचे स्वातंत्र्य खरोखरच दलित-वंचितांच्या वाट्याला आले आहे काय हा!

### दलित समाज मात्र दारिद्र्यातच खितपत पडला आहे

आता एक खरे, की स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांत दलित-शोषित-वंचित समाजाच्या जीवनात कुठलेच परिवर्तन आले नाही, असे नाही. ते जरूर आले. म्हणजे दलित समाज शिक्षण घेऊ लागला, महिला शिकू लागल्या, त्यांचा नोकऱ्यांत शिरकाव झाला. काही सनदी अधिकारी झाले. काही कुलगुरू, इंजिनिअर, प्राचार्य, प्राध्यापक, डॉक्टर झाले. काही राष्ट्रपती, राज्यपाल, मुख्यमंत्री, आमदार, खासदार, मंत्री झाले. काहींनी शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. मूठभर का असेना छोटे-मोठे उद्योजक झाले. साहित्य-संस्कृती, कलेच्या क्षेत्रात दलित साहित्यिकांनी आपल्या वादळी साहित्याद्वारे आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळविली. शहरी दलितवर्गात असे काही चांगले-सकारात्मक बदल होत असतानाच दुसरीकडे डोंगरदऱ्यांत, ग्रामीण भागातील दलित समाज मात्र दारिद्र्यातच खितपत पडला आहे. त्याचे रोजी-रोटी-शिक्षण-आरोग्याचे प्रश्न सुटलेच नाहीत. आता तर खासगीकरणामुळे सरकारी नोकऱ्यांचे प्रमाण घटत असून, खासगी उद्योगधंद्यात आरक्षण नसल्यामुळे कंत्राटीकरणाच्या धोरणामुळे दलितांच्या आर्थिक प्रगतीचा मार्गच खुंटला आहे. शिक्षणाच्या खासगीकरणामुळे दलित समाज व्यवसायाभिमुख, माहिती-तंत्रज्ञानाच्या उच्चशिक्षणाला मुकला आहे. भटक्या विमुक्त समाजाची स्थिती दयनीय आहे. त्यांना गाव नाही, घर नाही, गावोगाव भटकणे आणि गावकुसाबाहेर हगणदारीत राहणे हे त्यांचे प्रारब्ध आहे.

### सावकार-ठेकेदार-शासकीय यंत्रणेनेही त्यांचे शोषण केले

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आदिवासी मतपेढीवर डोळा ठेवून भाजपाने भारताच्या राष्ट्रपतिपदी आदिवासी समाजातील द्रौपदी मुर्मू यांना बसविले. निवडणुकीचे राजकारण क्षणभर बाजूला ठेवले, तरी आजवर देशभरात वंचित राहिलेल्या आदिवासी समाजातील



75 आजादी का अमृत महोत्सव

एका महिलेला स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात देशाच्या सर्वोच्चपदी विराजमान होण्याची संधी दिली, ही बाब सर्वार्थाने चांगलीच झाली, असे म्हणावे लागेल. कारण देशातील आदिवासी समाजात त्यांच्या राष्ट्रपतिपदावरील निवडीमुळे देशात आपणाला मानसन्मान मिळतो, असा जो एक सकारात्मक संदेश जाणार आहे, तो निश्चितच मोलाचा नि महत्त्वपूर्ण आहे, याविषयी शंकाच नसावी; पण वास्तवात स्वातंत्र्याच्या पंचाहत्तरीत आदिवासी समाजाची सामाजिक स्थिती काय आहे? देशाच्या एकूण लोकसंख्येत ८.७ टक्के असलेल्या आदिवासी समाजाला सर्वच राजकीय पक्षांनी एका विशिष्ट अंतरावर ठेवून त्यांची उपेक्षाच केलेली दिसते. सर्व बाजूंनी आदिवासी समाजाचे शोषण होत आले. नक्षली चळवळीचे आदिवासी जसे बळी ठरले, तसेच सावकार-ठेकेदार-शासकीय यंत्रणेनेही त्यांचे शोषण केले. आदिवासींच्या जंगल, जमीन, पाणी यावर नागरीकरणाचे अतिक्रमण सरकारकडूनच होत आले. आदिवासींसाठी आखलेल्या शासकीय योजना त्यांच्यापर्यंत पोहोचल्याच नाहीत. पिळवणूक, अंधश्रद्धा, रोगराई, कुपोषणाचा सर्वाधिक बळी आदिवासी समाजच ठरत आला. स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी अमृत आदिवासींच्या तांडे-वाड्यात कधी पोहोचलेच नाही.

**स्वातंत्र्याची फळे आज भांडवलदार-जमीनदार-श्रीमंत वर्गच चाखत आहे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'अस्पृश्य मूळचे कोण होते' या त्यांच्या ग्रंथात लिहितात, शूद्रांशिवाय हिंदू संस्कृतीने आणखी तीन सामाजिक वर्गांना जन्म दिला असून, त्यांच्याकडे जेवढे लक्ष द्यायला पाहिजे होते, तेवढे ते दिले गेले नाही. या देशात गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या जमातीची लोकसंख्या सुमारे दोन कोटी, तर आदिवासी जमातीची लोकसंख्या अंदाजे दीड कोटी आहे. अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातींची लोकसंख्या ६ कोटी आहे. उपजीविकेचे साधन नसल्यामुळे गुन्हेगारीचा धंदा करणारे २५ लाख लोक आहेत (हे आकडे १९४६ सालचे आहेत). बाबासाहेब म्हणूनच असे वारंवार विचारत होते, की ज्या देशात कोट्यवधी लोक अस्पृश्य नि गुन्हेगार मानले जातात, त्यांचे स्वराज्यात स्थान काय आहे? बाबासाहेबांनी भटक्या विमुक्त, आदिवासी समाजाबाबत ७५ वर्षांपूर्वी विचारलेला हा प्रश्न अजूनही कायम आहे. बाबासाहेबांचा सरंजाम-जमीनदारांच्या हाती सत्ता देण्यास विरोध होता; पण स्वातंत्र्याची फळे आज भांडवलदार-जमीनदार-श्रीमंत वर्गच चाखत आहे. बाबासाहेब सांगत होते, की भांडवलदार-सरंजामदारांनी अस्पृश्य-आदिवासी व वन्य जमातींना सुधारणेच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न कधीच केला नाही. अशा लोकांच्या हाती सत्ता देणे म्हणजे फाशी देणाऱ्याच्या हाती सुरी देण्यासारखेच आहे. बाबासाहेब सांगत होते त्याप्रमाणे आजही स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर खेडोपाडी धनदांडगे, जमीनदार दलित-आदिवासींचे जीव घेऊन वर त्यांचे आर्थिक शोषण करून त्यांच्या बायका-मुलांवर अत्याचार करीत असतात. हे आपले खरे क्रूर समाजवास्तव आहे. मग बाबासाहेबांच्या संकल्पनेतील सामाजिक न्यायाचे स्वातंत्र्य कसे येणार?

**जातीव्यवस्था मोडून न पडता ती अधिकाधिक घट्ट होत आहे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील प्रत्येक समस्येचे मूळ कारण म्हणजे जात होय नि जातीव्यवस्था हा लोकशाहीसमोरील मोठा धोका होय, हे सांगून ठेवले; पण स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही जातीव्यवस्था मोडून न पडता ती अधिकाधिक घट्ट होत गेल्यामुळे जातीअहंकारातून देशात दररोज कुठे ना कुठे दलित-आदिवासी समाजावर माणुसकीला लाजविणारे क्रूर अत्याचार होतच असतात. चांगले कपडे घातले, दलितांनी मिशा राखल्या, त्यांनी आंतरजातीय विवाह केला, दलित नवरदेव घोड्यावर बसला, तो मंदिरात गेला, मृत गायीची चामडी सोलली वा गोमांस खाल्ल्याच्या संशयावरून आजही दलितांना बेदम मारहाण वा खूनखराबा होत असतो. उत्तर प्रदेशातील हाथरस जिल्ह्यातील भुलगडी गावात दोन वर्षांपूर्वी म्हणजे १४ सप्टेंबर २०२० रोजी क्रौर्यालाही लाज वाटावी असे क्रौर्य घडले. वाल्मीकी समाजातील एका मुलीवर सामूहिक बलात्कार करून तिची जीभ कापण्यात आली. तिच्या पाठीचा आणि मानेचा मणका तोडण्यात आला. पोलिसांत गुन्हा नोंद व्हायला तब्बल १५ दिवस लागले. अखेर १५ दिवस ती मुलगी मृत्यूशी झुंज देत मरण पावली. वर निर्दयतेचा कहर असा, की पोलिसांनी प्रारंभी त्या मुलीवर बलात्कार झालाच नाही, असे जाहीर करून पुरावा नष्ट करण्यासाठी त्या मुलीचा मृतदेह तिच्या आई-वडिलांच्या गैरहजेरीत मध्यरात्री पेट्रोल टाकून जाळून टाकला. मध्यंतरी दिल्लीतील नांगल भागात ९ वर्षांच्या एका दलित मुलीवर बलात्कार करून तिचा खून केल्याची बातमी आली. गुजरातमधील उना गावात मृत गायीची चामडी सोलणाऱ्या दलित तरुणांना मारहाण केल्याचे प्रकरण देशभर गाजले. हैदराबाद विद्यापीठातील रोहित वेमुला या दलित विद्यार्थ्यास जातीय अत्याचारास कंटाळून आत्महत्या करावी लागली. अशी किती म्हणून उदाहरणे द्यावीत? जातीयतेचे विष भारतीय समाजाच्या मनीमानसी इतके भिनले आहे, की खेळही त्यास आता अपवाद राहिलेला नाही. मागील टोकियो ऑलिम्पिक स्पर्धेत आपल्या महिला हॉकी संघाने चांगला खेळ केला; पण अर्जेंटिना विरुद्धच्या सामन्यात आपला महिला संघ हरला आणि या सबंध स्पर्धेत गोलची हॅट्ट्रिक करणाऱ्या वंदना कटारियाच्या घरासमोर लोकांनी फटाके फोडत तिला जातिवाचक शिवीगाळ केली. कोण आहे ही वंदना कटारिया? तर ती आहे दलित समाजातील खेडाळू. तिची निंदानालस्ती करताना दलितांना संघात घेतले, की असेच होणार, असे प्रलाप काढण्यात आले. अजून असे, की वर्षानुवर्षे उलटतात तरी दलितांना न्याय मिळत नाही. उदा. भंडारा जिल्ह्यातील खैरलांजी गावात भोतमांगे या दलित कुटुंबातील सुरेखा व प्रियंका या मायलेकींची सामूहिक बलात्कार करून हत्या करण्यात आली. या घटनेला आता १६ वर्षे उलटून गेली. भैयालाल भोतमांगे न्यायाची प्रतीक्षा करीत-करीत अखेर मृत पावले; पण स्वातंत्र्यात अजूनही न्याय झाला नाही.

**दलितद्वेषाला फोडणी**

राष्ट्रीय आपत्ती येवो, नैसर्गिक संकटे येवोत, की साथीचे आजार येवोत. या अशा संकटसमयी जातपात-धर्म विसरून समाज एकत्र येतो, त्यांच्यातील मानवता जागी होते व लोक एकमेकांना मदत करतात, असे सांगितले जाते; पण दलितांच्या बाबतीत नेमके उलटे घडते. याचा ताजा पुरावा म्हणजे कोविडकाळाच्या टाळेबंदीतही दलित समाजावर झालेले अत्याचार होत. नॅशनल क्राइम रेकॉर्ड

ब्युरो म्हणजेच राष्ट्रीय गुन्हे नोंद संस्थेने (एनसीआरबी) देशात २०२० साली म्हणजे कोविडकाळात देशभर नोंदवलेल्या गुन्ह्यांची आकडेवारी नुकतीच प्रसिद्ध केली. त्या आकडेवारीनुसार २०२० या वर्षात लहान मुले व महिलांवरील अत्याचारात काहीशी घट झाली. म्हणजे महिलांवरील अत्याचारात ८.३ टक्क्यांनी घट झाली, तर लहान मुलांवरील अत्याचार १३.२ टक्क्यांनी कमी झाले; पण असे असूनसुद्धा अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींवरील अत्याचार २०२० सालीसुद्धा वाढले. २०१९ साली अनुसूचित जातींवरील अत्याचाराच्या ४५,९६१ तक्रारी नोंदविल्या गेल्या होत्या. त्यात २०२० साली वाढ होऊन दलितांवरील अत्याचाराच्या ५०,२९१ तक्रारी नोंदविल्या गेल्या. उत्तर प्रदेशातील दलितांवरील अत्याचाराचे प्रमाण २५.२ टक्के राहिले. दलित अत्याचाराच्या सर्वाधिक म्हणजे १२,७१४ तक्रारी उत्तर प्रदेशात नोंदविल्या गेल्या. त्याखालोखाल ७,३६८ बिहारमध्ये, ७,०१६ राजस्थान, तर ६,८९० तक्रारी मध्य प्रदेशात नोंदविल्या गेल्या. देशभरात आदिवासी समाजावरील अत्याचाराच्या एकूण ८,२७२ तक्रारी नोंदविल्या गेल्या. फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र म्हणून जे राज्य टेंभा मिरविते. त्या आपल्या महाराष्ट्रातसुद्धा २०२० साली दलित अत्याचाराच्या ६३३ तक्रारी नोंदविल्या गेल्या. ही आकडेवारी काय दर्शविते? तर संकटे कोणतीही येवोत, संकटकाळात तथाकथित मानवतावादाचा कितीही पूर येवो; पण ही मानवता दलितांच्या वाट्याला काही येत नाही. दलित समाजावर अत्याचार होत असताना बहुसंख्याक समाज मूक राहतो. उलट, दलितांना सुरक्षाकवच म्हणून लाभलेला ॲट्रॉसिटीचा कायदा रद्द करण्यात यावा, अशा मागण्या मात्र तो करतो. दलितद्वेषाला फोडणी देताना त्यांच्या आरक्षणामुळे तुमची बेकारी वाढली, असे सांगून दलितेत्तर तरुणांची दिशाभूल करण्यात येते.

सर्वांत वाईट गोष्ट ही, की सर्वच राजकीय पक्ष जाती-धर्मांचे राजकारण करून जाती-धर्मांच्या आधारे मतांचे ध्रुवीकरण करून निवडणुका लढवितात. ज्या मतदारसंघात जी जात-धर्म बहुसंख्य आहे त्याच जाती-धर्मांचा उमेदवार दिला जातो. मतदारसुद्धा जातीच्या उमेदवारालाच मते देतात. कुठल्याही राजकीय पक्षाकडे जातीनिर्मूलनाचा कार्यक्रम नाही.

**आरक्षणास विरोध**

भारतीय संविधानातील १५ आणि १६ व्या कलमानुसार अनुसूचित जमाती, आदिवासी, ओबीसी व महिलांसाठी आरक्षण लागू करण्यात आले. सामाजिक न्याय, समानसंधी हा आरक्षणाचा खरा हेतू आहे; पण सामाजिक न्यायाचे आरक्षणच विरोधकांच्या डोळ्यात सलू लागले. पूर्वी अस्पृश्यता होती आता ती नाही. आरक्षणामुळे गुणवत्ता मार खाते, आरक्षणामुळे जातीयता वाढते, आरक्षण जातीवर नव्हे, तर आर्थिक मागासलेपणावर द्यावे, असे तर्कदुष्ट युक्तिवाद करून आरक्षणास विरोध करण्यात येतो. मुद्दा असा आहे, की जिथे दलित समाजावर रोज अत्याचार होत असतात आणि माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना 'अछूत' म्हणून पुरीच्या जगन्नाथ मंदिरात प्रवेश नाकारला जातो, तिथे अस्पृश्यता आता कुठे आहे, असे विचारून आरक्षणास विरोध केला जातो हा दलितद्वेष्टा लबाडपणा नव्हे, तर दुसरे काय आहे?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाने धर्मनिरपेक्षता, सर्वसमावेशक राष्ट्रवाद, लोकशाही आणि समाजवाद या चार मूल्यांचा स्वीकार केला आहे. आता मात्र या चारही मूल्यांना आव्हान मिळत आहे. अलीकडे धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाऐवजी सांस्कृतिक राष्ट्रवादाचा पुरस्कार होतोय. या सांस्कृतिक राष्ट्रवादाचा 'आत्मा' हिंदुत्व आहे. धर्माधिष्ठित राष्ट्रवादात दलित, वंचित, अल्पसंख्याक, महिला यांचे हित भरडले जाणार हे उघड आहे. भारत हे एक बहुवांशिक, बहुधर्मीय, बहुसांस्कृतिक, बहुभाषिक राष्ट्र आहे. देश टिकवायचा तर विविधतेचे संरक्षण झाले पाहिजे व हे संरक्षण धर्मनिरपेक्ष लोकशाहीच करू शकते. घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना म्हणूनच लोकशाही उद्ध्वस्त करणाऱ्या पुनरुज्जीवनवादी शक्तींचे उदात्तीकरण मान्य नव्हते. धर्म, रूढी, परंपरांची चिकित्सा करणाऱ्या



विचारवंतांच्या हत्या मान्य नव्हत्या. दलितांच्या अस्मितेला छेद देणारा चातुर्वर्ण्य ईश्वरनिर्मित आहे, हा विषमतावादी विचारही मान्य नव्हता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगत होते, की भारत हे एक राष्ट्र आहे या भ्रमातून जेवढ्या लवकर आपणाला बाहेर पडता येईल, तेवढ्या लवकर आपण बाहेर पडले पाहिजे. कारण भारत हा जातीपातींनी एवढा लुळापांगळा आणि शबलीत झाला आहे, की तो एक राष्ट्र म्हणून उभाच राहू शकत नाही. भारतास जर एक राष्ट्र म्हणून उभे राहावयाचे असेल, तर जातीपातीचा अंत झाला पाहिजे. राजकीय स्वातंत्र्याचे सामाजिक स्वातंत्र्यात रूपांतर झाले पाहिजे. दलित शोषित-पीडित-वंचितांना न्याय मिळाला पाहिजे. तरच भारताची लोकशाही टिकून भारत एक राष्ट्र म्हणून उभे राहू शकेल. भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांत आपण खरोखरच या दिशेने वाटचाल केली आहे काय? याचा अमृतमहोत्सवी स्वातंत्र्य सोहळ्यात जरूर विचार झाला पाहिजे. देश नि समाजहित यातच आहे. दुसरे काय? ●●●


**(लेखक आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक आहेत.)**

# अण्णा सावंत यांचे 'फुलटायमर' म्हणजे कामगार चळवळीचा इतिहास



प्रा. डॉ. शशिकांत पाटील

जागतिकीकरणानंतर मराठी साहित्यामध्ये जी एक वैचारिक घुसळण झाली आणि त्याचा प्रभाव साहित्यामध्ये स्पष्टपणे जाणवू लागला. महात्मा फुले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने शिक्षण अतिशय तळागाळातल्या लोकांपर्यंत जाऊन पोहोचले. त्यातून साहित्यापासून कोसो दूर असणारा तरुणवर्ग लिहिता झाला. साठोत्तरी वाङ्मयामध्ये दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, जनवादी साहित्य, आदिवासी साहित्य, असे अनेक प्रवाह निर्माण झाले. कथा, कविता, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र आणि आत्मकथने या साहित्य प्रकारांतून आपण व्यक्त होऊ लागलो. त्यातला आत्मकथन वाङ्मय प्रकार विशेषत्वाने दलित साहित्यात आणि अलीकडच्या काळात फार मोठ्या प्रमाणात लिहिला जाऊ लागला. आत्मकथन म्हणजे आपल्या जीवनात भोगलेले, साहिलेले, पाहिलेले आणि प्रत्यक्ष जगलेले जीवन व त्यातला तो अनुभव याचे केलेले कथन म्हणजे आत्मकथन...




**कामगार आणि कामगार चळवळीच्या कार्यकर्त्यांचे आत्मकथन**

आत्मकथन या संज्ञेचे स्पष्टीकरण करताना डॉक्टर वासुदेव मुलाटे म्हणतात, ''यातील 'मी'चे भोगणे, घडत जाणे हे नुसतेच व्यक्तिगत पातळीवर राहत नाही, तर त्याला आम्हीचे स्वरूप प्राप्त होते. असे असले तरी आम्हीचे चित्रण करताना आम्हीतला 'मी' त्यातून कधी वेगळा होऊन पुढे येत नाही. काही झाले तरी माणसाला सर्वप्रथम 'स्व'प्रेम आधी असते. म्हणून आत्मकथनात ते अपरिहार्यपणे प्रकट होते. अण्णा सावंत यांच्या 'फुलटायमर' आत्मकथनासंदर्भात त्यांच्या 'मी'चा एक कामगार म्हणून 'आम्ही' झालेला आहे. म्हणून मी याठिकाणी अधोरेखित करू इच्छितो, 'फुलटायमर' हे आत्मकथन एकट्या अण्णा सावंत यांचे राहत नाही, तर ते देशभरातील कामगार आणि कामगार चळवळीच्या कार्यकर्त्यांचे बनलेले आहे. एकूणच या आत्मकथनातून समकालीन सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि धार्मिक जीवनासोबत भांडवलदार शोषणकर्ते, ज्यांचे शोषण होते तो कामगार आणि कामगार चळवळीचा लढा लढताना कार्यकर्त्यांची होणारी होरपळ ही केवळ व्यक्तिगत पातळीवर राहत नाही, तर ती सार्वत्रिक बनते. जो जीवनानुभव सार्वत्रिक असतो तेथे येणारा नायक हा नामधारी असतो. त्याचा सभोवताल, वास्तव परिस्थिती, अधिक ठळक होत जाते.

आत्मकथन हे तृप्त झालेल्या मनाने आयुष्याचे केलेले सिंहावलोकन नाही, तर ते मनाच्या खोल गाभाऱ्यातल्या असंख्य जखमा आणि वेदनांचे खोललेले गाठोडे असते. या अनुषंगाने 'फुलटायमर' हे केवळ रंजनतेसाठी केलेले लेखन नाही, तर तो महाराष्ट्राच्या कामगार चळवळीचा आणि जालना जिल्ह्याच्या कामगार संघर्षाचा इतिहास आहे.

**कामगार चळवळीचा फुलटायमर कार्यकर्ता**

लातूर जिल्ह्यातील टाकळगावसारख्या ग्रामीण भागातील छोट्याशा खेड्यात जन्माला आलेले अण्णा सावंत घरातील वारकरी संप्रदायातील प्रभाव, बालपण संस्कारित अध्यात्म पोथी, पारायण यात गुरफटलेले असताना कुटुंबातील शिक्षणाचे महत्त्व, मोठे भाऊ नागोराव नित्य वारी करणारे, शेती व्यवसाय सांभाळणारे रामराव, रंगराव हे दोन भाऊ, तर देवराव हे शिक्षक, चाकूर, उदगीर, औरंगाबाद, असा शिक्षणाचा प्रवास आणि या प्रवासात वाचनातून मूर्तिपूजा, अवतारवाद, जातिसंस्था, रामायण, महाभारत यासारख्या धर्मग्रंथांसोबत महात्मा गांधी, शहीद भगतसिंग, सुभाषबाबू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचंड प्रभाव, कम्युनिस्टांची चळवळ आणि त्याच्याशी जुळत जाणारी अण्णा सावंत यांची भूमिका त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अधिकच पकडली गेली. कार्ल

मार्क्स, लेनीन यांचा विचार, रशियन क्रांती, चीन, क्युबेन क्रांती याविषयीचे वाचन, फिडेल कॅस्ट्रो आणि चे गव्हेरा यासंदर्भात प्रचंड वाचन असलेले अण्णा सावंत कम्युनिस्ट विचारसरणीच्या अनेक अभ्यासवर्ग आणि शिबिरांतून कामगार क्रांतीसंदर्भातल्या जगातल्या चळवळीचा अभ्यास त्यांचा झालेला होता. कॉम्रेड भवलकर, कॉम्रेड मानव, कॉम्रेड ओक, कॉम्रेड संझगिरी, कॉम्रेड रांगणेकर, कॉम्रेड अशोक गायकवाड, कॉम्रेड मराडे, कॉम्रेड पडोळे यांच्या सहवासात अण्णा सावंत यांच्या आयुष्याचा झालेला प्रवास एस.एफ.आय.च्या माध्यमातून विद्यार्थी चळवळीच्या सहभागातून जालना जिल्ह्यातील सिटूच्या पक्षनेतृत्वापर्यंत अनेक संघर्षशील लढा देत अनेक प्रश्न सोडवत, एक कामगार चळवळीचा फुलटायमर कार्यकर्ता आपल्याला या आत्मकथनातून भेटतो.

'फुलटायमर' हे साधारण तीनशे पृष्ठांचे आत्मकथन. या आत्मकथनाला डॉ. प्रल्हाद लुलेकर यांची पाठराखण आणि नागनाथ कोतापल्ले यांची प्रस्तावना अधिक वाङ्मयीन मूल्य प्राप्त करून देते. समाजात झालेले परिवर्तन, बदललेल्या वृत्ती-प्रवृती क्रांतीची स्वप्ने आणि त्या भोवतीचा परीघ, जात, धर्म जाणिवेने न आलेले वर्गभान, ही या आत्मकथनाची वैशिष्ट्ये आहेत. कोत्तापल्ले सरांनी प्रस्तावनेत ''राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील राजकारणाच्या अर्थकारणाचे कामगार जीवनावर होणाऱ्या परिणामाचे चित्रण करणारे आत्मकथन आहे'', अशी दखल घेतली आहे. मराठी साहित्यात आत्मकथन म्हणून एक वेगळा ठसा उमटवणारे आणि स्वतःचे वेगळेपण सिद्ध करणारे हे आत्मकथन आहे, असे डॉ. प्रल्हाद लुलेकर अधोरेखित करतात.

**समाजव्यवस्थेशी जोडलेल्या अनुभवाला आत्मकथनात स्थान**

परिवर्तनवादी चळवळी आणि परिवर्तनवादी विचार घेऊन डाव्या पक्षांमध्ये काम करत असताना प्रस्थापित व्यवस्थेच्या, भांडवलशाही व्यवस्थेच्या, आर्थिक विषमतेविरुद्ध आवाज उठवून ही चळवळ यशस्वी करताना येणारे असंख्य अडथळे, होणारे जीवघेणे हल्ले, कायदा सुरक्षेच्या पातळीवर सत्ता आणि अर्थसत्तेच्या दावणीला बांधलेली प्रशासकीय व्यवस्था, होणारे विविध आरोप, त्यातून भोगाव्या लागणाऱ्या यातना, समाजहितासाठी आणि अन्यायाने ग्रासलेल्या समूहाला त्यातून बाहेर काढणे. स्वतःच्या कौटुंबिक आणि वैयक्तिक जीवनाला बाजूला सारून एका विचाराचे पाईक होऊन त्या विचाराला कायमस्वरूपी एकनिष्ठ राहत, वैयक्तिक स्वार्थ आणि प्रलोभनाला बळी न पडता जालना जिल्ह्यातील कितीतरी प्रश्नांना न्याय देण्यासाठी सहकाऱ्यांच्या माध्यमातून निर्माण केलेला लढा यशस्वीतेपर्यंत नेऊन पोहोचवणारे अण्णा सावंत स्वतःच्या कौटुंबिक नात्यातील भावनिक गुंत्याला थोडाही वाव न देता स्वतः तला मी बाजूला सारून कामगार समूहाची व्यथा आणि एकूण समाजव्यवस्थेशी जोडलेल्या अनुभवाला आपल्या आत्मकथनातून स्थान देतात.

**अण्णा सावंत यांच्यातील सत्यधर्म**

कोरोना काळातील अतिशय वेदनादायक घटनांपैकी जालना जिल्ह्यातील परप्रांतातील कामगारांसंदर्भात रेल्वे पटरीवर घडलेल्या दुर्दैवी घटनेच्या उल्लेखाने या आत्मकथनाची सुरुवात होते. ही सुरुवातच मुळात कामगार जीवनाविषयीची आपली संवेदना जागृत करते. अतिशय संयमी लेखणीने अन्य जीवनानुभवाला कुठेही वाट न करून देता केवळ कामगार आणि सामाजिक समस्या, प्रश्न केंद्रस्थानी ठेवून हे आत्मकथन पुढे चालते. आत्मकथनातील लेखकाचा काल आजच्या जीवनानुषंगाने तसा नगण्य असतो. त्याच्या लेखनातून गतकाळाला चैतन्य मिळते. या आत्मकथनाच्या माध्यमातून भूतकाळातील असंख्य गूढ उकलले जातात. अण्णा सावंत यांनी या आत्मकथनातून अशा अनेक घटना अतिशय निर्भीडपणे कोणताही आडपडदा न ठेवता चार भिंती आड झालेल्या बैठकीसुद्धा जशाच्या तशा वास्तव स्वरूप मांडलेल्या आहेत. आत्मकथन लिहीत असताना लेखकाला ते स्वातंत्र्य असते, कोणती गोष्ट समोर आणायची, कोणती सांगायची नाही; परंतु अण्णा सावंत यांच्यातील सत्यधर्म जसेच्या तसे 'फुलटायमर' या आत्मकथनातून त्यांना व्यक्त करून जाते.

**कामगार हा सत्ताधारीवर्गाच्या व भांडवलदारांच्या हातचे खेळणे**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना आजही भांडवलशाही धनिकांची एक फळी कामगारांचे कसे शोषण करते आहे. अनेक कामगार नेते या भांडवलदारांच्या हातचे खेळणे बनलेले आहेत, या वास्तवाला नजर अंदाज करता येणार नाही. हाही एक कंगोरा या आत्मकथनातून आलेला आहे. कामगार संघटित येताना त्यांच्या मनात निर्माण झालेल्या भांडवलदारांविषयाची भीती, प्रचंड दारिद्र्यामुळे संपकाळात होणारी उपासमार, कमी श्रममूल्यावर राबवला जाणारा कामगारवर्ग, कामगार युनियनमधील अंतर्गत मतभेद, कामगार युनियनमधील श्रेयवादाचे राजकारण, स्व-स्वार्थासाठी पडलेली फूट, परप्रांतातून कामगार मागवून स्थानिकांना कामावरून कमी करण्याची समस्या, अनेक कंपन्यांतील वेगवेगळे कामगारांचे प्रश्न, सफाई कामगारांचे प्रश्न, तेलघाण्यातील कामगारांचे प्रश्न, अंगणवाडी सेविका, विडी कामगार, या सर्व क्षेत्रातील कामगारांना एकत्रित करत एका युनियनपासून झालेले सुरुवात, जालना जिल्ह्यातील कामगारांना एकत्रित गुंफण्याचे काम पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून अण्णा सावंत यांनी प्रामाणिकपणे केलेले दिसते. फक्त पगारवाढ आणि बोनससाठी न लढता कामगारांनी रशियन क्रांती समजून घेतली पाहिजे. कामगारांचे राज्य आणून होणारे शोषण कायमचे थांबवले पाहिजे, असा आशावाद मांडत कामगार जात, धर्म, भाषा, पक्ष यामध्ये विभागला आहे. सत्ताधारी वर्गाच्या आणि भांडवलदारांच्या हातचे खेळणे बनलेला आहे. हा वास्तव विचार मांडणारे 'फुलटायमर' हे आत्मकथन आहे. जिल्ह्यामध्ये एस.एफ. आय.च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या फीवाढीचा प्रश्न असेल, वसतिगृहातील निवास आणि भोजनाची समस्या असेल, यांनाही एका केंद्रभूत संघटनेकडे आणण्यासाठी अण्णा सावंत यांनी प्रयत्न केलेला आहे.

**फुलटायमर**

**पृष्ठ :** ३००

**प्रकाशन :** लोकवाङ्मय गृह

**किंमत :** ३२५


75 आजादी का अमृत महोत्सव

# मैं स्कूल जा रहा हूँ... कोणत्या शाळेत आणि कशासाठी ?

जा आपल्या देशातील सरकारी शिक्षणाविषयी कोणी काहीही म्हणो; पण वास्तव हेच सांगते, की या शिक्षणातील गुणवत्ता आणि एकूणच आम्ही शिक्षण देतो, अशी सांगणारी व्यवस्था बुडत्या जहाजासारखी झाली आहे. याला दोन कारणे आहेत. एक जागतिकीकरणातून आलेले खासगीकरण आणि दोन सूज आलेली, उदासीन झालेली, खुशालचेंडू आणि जबाबदारीहीन बनलेली शिक्षणव्यवस्था. अर्थात, तिच्यातील घटक म्हणजे सरकार, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक इत्यादी. भारत स्वतंत्र झाल्यापासून सरकारने अनेकदा साक्षर भारताचे म्हणजे शंभर टक्के साक्षर भारत निर्माण करण्याचे वायदे केले; पण ते पूर्ण झाले नाहीत. ते कधी पूर्ण होणार हे बसच्या ढुंगणावर चिकटवलेल्या आणि 'स्कूल चले हम' या चित्रातील पोरालाही सांगता येणार नाही. अजून सांगायचे तर सरकारी शाळांमध्ये मिळणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता काय, यावरही कोणी जबाबदारीने भाष्य करू शकणार नाही. ऐंशीच्या दशकापासून खासगीकरणाने सरकारी शिक्षणाच्या कपाळावर, गालावर इतक्या चोची मारल्या, की त्याला आता ओळखताही येत नाही. त्याची विश्वासार्हता, गुणवत्ता यावर एनजीओच्या मदतीने सातत्याने प्रश्नचिन्ह कोरले गेले आहे. हे प्रश्नचिन्हही इतके गडद झाले, की सर्वप्रथम सरकारी शाळांतील शिक्षकांनी आपली पोरे आपल्या शाळांमध्ये दाखल करण्याचे बंद केले. जणू काही त्यांना कळून चुकले, की पोरगा सरकारी शाळेत गेला, की त्याची वाट लागते आणि खासगीत गेला, की त्याला सोनेरी वाट सापडते. शिक्षकांच्या मनातील विचार अन्य पालकांच्या आणि मुलांच्या मनातही झिरपला. सरकारी शाळा ओस पडायला लागल्या आणि तेथे धनदांडग्यांनी ग्रूप ऑफ इंडस्ट्रीज चालू करावे त्याप्रमाणे ग्रूप ऑफ स्कूल, नॉलेज सेंटर, करिअर सेंटर, इंटरनॅशनल वगैरे नावाने खासगीत शाळा चालू केल्या. सरकारी पोरे खासगीत भरती करणाऱ्यासाठी कमिशन चालू केले. सेल लावला. दोन पोरे आणल्यास तिसऱ्याची फी माफ, असा तो सेल होता. आता एक दिवस शाळाच बंद पडणार याचा साक्षात्कार या शाळांमध्ये शिकवणाऱ्या शिक्षकांना न झाल्यास नवलच म्हणावे लागेल. त्याने शिकवणे कागदोपत्री ठेवले आणि त्याऐवजी नव्या वेतन आयोगामुळे पगारपाणी किती होणार याचे गणित कॅल्क्युलेटर किंवा पोरांच्याच वह्यांतून फाडलेल्या पानावर करत बसले. शाळेत दाखल होईल तो पासच होणार, यामुळे शिकवायची आणि स्वतः वेगळे शिकण्याची गरज कमी होऊ लागली. अनेक शिक्षकांनी साइड बिझिनेस चालू केले. एकूण काय, तर शाळेपासून तो दूर जाऊ लागला. जे काय आहे ते कागदोपत्री शिल्लक राहिले. ग्रामीण आणि दुर्गम भागात हे चित्र खूप गडद पाहायला मिळते. 'स्कूल चले हम' असे बडबडत येणाऱ्या पोरांचा मेंदू रिकामा आणि पोट मध्यान्ह



भोजनाने म्हणजे खिचडीने भरले जाऊ लागले. शिक्षण आणि त्याची गुणवत्ता वळचणीला पडली. पाचवी-सातवीतल्या पोरांना जोडाक्षरे येत नाहीत, तेराच्या पुढचे पाढे येत नाहीत, हे सरकारच निर्लज्जपणे सांगू लागले. ते जसे सांगेल तशी खासगी शाळांची संख्या वाढू लागली. या शाळाही धनदांडगे आणि पुढाऱ्यांच्या मालकीच्या बनल्या. पहिल्या धारेप्रमाणे खुळखुळणारा पैसा त्यांच्या हातात पडू लागला. जेथे शिक्षण मोफत तेथे गुणवत्ता नाही आणि जेथे जमीन गहाण ठेवून, डोनेशन भरून प्रवेश घेतला तेथे ते गुणवत्तापूर्ण, असा नवा सिद्धांत तयार झाला.

शिक्षकाची ढासळणारी गुणवत्ता आणि तिचा शिक्षणाच्या गुणवत्तेवर होणारा परिणाम, ही काही नवी गोष्ट राहिली नाही. शिक्षकाकडे फक्त कागदोपत्री गुणवत्ता आहे; पण विद्यार्थ्यांना बुद्धिमान आणि गुणवान करण्याची साधने त्यांच्याकडे नाहीत. याचीही चाचपणी अनेकदा होते. गुणवत्ताहीन शिक्षकांना ओळखले जाते; पण कारवाई काही होत नाही. ज्याची नोकरी कधीच जाऊ शकत नाही असा एकमेव घटक म्हणजे शिक्षक. ज्याचे विद्यार्थी पास-नापास झाले काय, त्यांनी शाळेला दांडी मारली काय किंवा ते कच्चे राहिले काय, शिक्षकांवर कारवाई करण्याची तरतूद नाही. सबब गुणवत्तेच्या नावाने शिमगा आणि मागण्यांच्या नावाने दसरा, असा हा प्रकार सुरू आहे. डॉ. बाबासाहेबांनी शिक्षणाला वाघिणीचे दूध म्हटले होते. प्रत्यक्षात शेळीचे, गाढविणीचे किंवा एखाद्या बोगस डेअरीतील दूधही त्यांच्या वाट्याला येत नाही. सरकारी शिक्षकांची बौद्धिक लायकी काय, हे तपासण्याचा प्रयत्न बिहारमधील शिक्षण खात्यातील एका बड्या बाबूने केला. तर बिहारच्या मोतिहारी जिल्ह्यातील पकरिदयाल येथील सरकारी शाळेला एसडीओ या पदावर असलेल्या रवींद्र कुमार याने मुख्याध्यापकाचीच बौद्धिक चाचणी म्हणजे सामान्य ज्ञान तपासण्यासाठी कॅमेऱ्यासमोर एक अतिशय साधा प्रश्न विचारला. 'मैं विद्यालय जाता हूँ, मैं विद्यालय जा रहा हूँ' या वाक्याचा इंग्रजी अनुवाद करा, असा तो प्रश्न होता. आता

सगळीकडेच पहिलीपासून इंग्रजी सुरू असल्याने तिला खूप महत्त्व आले आहे. हेडमास्तरला अनुवाद करता आला नाही. बुद्धीने मठ्ठ; पण व्यवहाराने चतुर असलेल्या मुख्याध्यापकाने चटकन उत्तर दिले, की मी संस्कृतचा शिक्षक आहे, मला इंग्रजीशी संबंध ठेवायचा नाही. मग अधिकाऱ्यानेच फळ्यावर आपल्या प्रश्नाचा अनुवाद लिहून दाखवला आणि संस्कृतवाल्या शिक्षकाला ते म्हणाले, इंग्रजी येत नसेल तर मग मी शाळेला जातो आणि जात आहे, याचा संस्कृतमध्येतर अनुवाद करा. गुरुजी इथेही फेल झाले; पण त्यांना त्याबद्दल कसलीही लाज वाटली नाही. विद्यार्थी मात्र आशाळभूत नजरेने त्यांच्याकडे बघत राहिले. या बाबूने मग चैता पंचायत विभागात एका शाळेत शिकवत असलेल्या विशेष म्हणजे विज्ञान विषय मोठ्या तावातावाने शिकवत असलेल्या सहायक शिक्षकाला विचारले, जलवायू, मोसम आणि पर्यावरण यातील फरक काय? विज्ञानाच्या शिक्षकाला उत्तर देता आले नाही. तोही फेल झाला. इथेही अधिकाऱ्याने योग्य उत्तर सर्वांना सांगितले. हा सर्व प्रकार कॅमेऱ्यात कैद झाला. त्याचा व्हिडीओ जगभर व्हायरल झाला; पण तरीही शिक्षकांवर त्याचा परिणाम शून्य. ज्याच्यावर पगारवाढीच्या आकड्याशिवाय कसलाच परिणाम होत नाही आणि बुडणाऱ्या जहाजात बसूनही जहाजाच्या मजबुतीवर भाषण ठोकतो, तोच तर शिक्षक...

# बोले तो अमित भाई सुने तो सारा देश...



सत्ताधारी आणि त्यांचा पक्ष यांनी काहीही बोलले तरी काही होत नाही. सत्ताधारी बोलण्यासाठीच असतात. त्यांनी बोलताना कसलेही विधिनिषेध, तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान आदी बाबी पाळायच्या नसतात. 'सब कुछ खुला है' या तत्त्वानुसार ते चालत असतात. भाजपचे आर्य चाणक्य म्हणजे काहीही करून आपल्या पक्षाची सत्ता आणणारे वाक्‌बगार म्हणून त्यांची ख्याती आहे, तर अशा अमित भाईंने हैदराबादमध्ये आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांसमोर बोलताना सांगितले, की येणाऱ्या तीस-चाळीस वर्षांत भारतात फक्त भाजपचीच सत्ता असणार आहे. खरे म्हणजे अमित भाई आकड्यांत का अडकले कळत नाही; पण हेही वास्तव, की त्यांना आकडे खूप आवडतात. त्यांनी यापुढे या देशात, इथल्या लोकशाहीमध्ये फक्त भाजपच राहणार आहे आणि बहुपक्षीय जाऊन एकपक्षीय लोकशाही येणार आहे, हेही सांगायला हवे होते. जाऊ द्या, पुढे-मागे हेही ते कोणत्या तरी ठिकाणी राहतील. खरे तर यांच्या भाकितामध्ये विशेष फारसे काही नाही. एक तर भाजपच्या विरोधातला एक-एक पक्ष संपवण्याचे कारस्थान चालूच आहे. कोणत्या तरी सरकारी एजन्सीचा वापर करून, विरोधकांना बदनाम करून, त्यांच्यावर घराणेशाहीचा आरोप करून किंवा त्यांना कमळात जागा देऊन हे प्रयत्न सुरू आहेत. फुटीत आणि बेऐक्यात मशगूल झालेले विरोधक सहजपणेच अशा भाकिताचे बळी ठरतात. एक खोटी गोष्ट शंभर वेळा बोलली, की ती यांनाही खरी वाटायला लागते. जर त्यांचेच खरे ठरणार असेल, तर मग लढायचे कशाला या भावनेने हेही तलवारी म्यान करतात. त्या म्यान झाल्या, की मग अमित भाईसारखे लोक भाकीत करायला लागतात. ज्यांना स्वतःकडे बोट करण्याची सवयच नाही, ते इतरांच्या घराणेशाहीकडे बोट करतात. भाजपमधल्या घराणेशाहीवर बोलत नाहीत. लोक खरोखरच घराणेशाहीला कंटाळले असतील, तर मग ते भाजपमधील घराणेशाहीचे समर्थन कसे करतील, हेही विचार करण्यासारखे आहे; पण अमित भाई विचार करणार नाहीत. कारण तेही पंतप्रधानांच्या रांगेत आहेत. भाजपमधील घराणेशाहीही त्यांनी जाहीर करावी. पाचपेक्षा जास्त वेळा स्वतःच निवडून येणाऱ्या नेत्यांची नावे सांगावीत. स्वतःपासून, साधू, साध्वीपर्यंत कोणाचीही नावे घ्यावीत आणि एक-एक मतदारसंघ एकेका नेत्याच्या मालकीचा कसा होतो, हेही सांगावे. आपल्या देशातील नागरिकांच्या रक्तातच घराणेशाही, राजेशाही अजून गच्च आहे. तिचा परिणाम म्हणून अनेक राजघराण्यांतील लोक स्वातंत्र्यापासून ते आजपर्यंत निवडून येतात. विशेष म्हणजे, त्यातील अनेक घराण्यांनी कमळात घरटी बांधली आहेत. भाजपने अशा घरट्यांना सुरक्षा दिली आहे. प्रतिष्ठा दिली आहे. इतिहास असलेली ही घरटी आहेत आणि भाजप इतिहासात रममाण होणारा आणि इतिहासाचे पुनर्लेखन करणारा पक्ष आहे. तो स्वतः राजेशाही, घराणेशाही कुरवळतो आणि इतर पक्षांतील घराणेशाहीवर भाष्य करतो. टाळ्या घेतो आणि झालेच तर मतांच्या पेट्याही पळवतो. देशातील सगळे राजकारण दोन-तीनशे कुटुंबांत एकवटले आहे. हे भाजपच्या सायबर सेलला आणि अतिशय सक्रिय झालेल्या ईडीफिडीला ठाऊक नाही काय?

अतिम भाईंनी याचा कार्यक्रमात मोठे कारभारी नरेंद्र भाईंना थेट शंकराच्या रांगेत बसवले. यापूर्वी त्यांना अवतार कल्पनेत विष्णूच्या रांगेत बसवण्याचा प्रयत्न झाला. त्यांचे मंदिर उभारण्याचा प्रयत्न पहिल्याच टर्ममध्ये झाला. आता दुसरी टर्म सुरू आहे आणि अमित भाई म्हणतात अजून तीस-चाळीस वर्षे भाजपच सत्तेत राहणार आहे. त्यानंतर कोण याविषयीचे भाकीत त्यांनी केलेले नसले, तरी पुन्हा भाजपच येणार हे सांगताना त्यांनी संकोच केला असावा, तर मोदी यांनी शंकराप्रमाणे विष पचवले, असे भावुक होऊन सांगितले. गुजरात दंगलीच्या मागे मोदींचाच हात आहे, असे आरोप तेव्हा झाले. सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निर्णय दिला. २००२ च्या दंगलीप्रकरणी एसआयटीने (स्पेशल इन्व्हेस्टिगेशन टीम) मोदी आणि इतर ६४ जणांना क्लीन चिट दिली. दरम्यान, आपल्यावर झालेले आरोप शांत, संयम होऊन पचवणे म्हणजे विषच पचवण्यासारखे होते. ते मोदी यांनी मोठ्या मनाने पचवले, म्हणून तर अमित भाईंनी नरेंद्र भाईंची तुलना शंकराशी केली. खरे तर असे विष पचवण्यात अमित भाईही होते. त्यांना तर गुजरातचे गृहमंत्री असताना तडीपार करण्यात आले होते; पण तरीही त्यांनी मोठ्या धीराने हे विष पचवलेच. विष पचवण्याची एक परंपरा तयार झाली. हे सर्व पाहता त्यांनी स्वतः

ला छोटा शंकर म्हटले असते तरी कोणी आक्षेप घेतला नसता. कारण सत्ताधारी कोणीही असला तरी त्यांच्या नादाला कोणी लागत नाही. या सत्ताधाऱ्यांकडे कायदे आणि व्यवस्था असतात. राष्ट्रप्रेमी, राष्ट्रद्रोही, घराणेशाही वगैरे पत्रे असतात. विशेषणे असतात. ६४ जणांनी विष पचवले, असा अर्थ घ्यायचा झाल्यास हे विष कोणी तयार केले आणि विषनिर्मितीचा कारखाना बंद होणार नाही का, यावरही अमित भाईंनी बोलायला हवे. गृहमंत्र्यांशिवाय ही माहिती अन्य कोणाकडे असण्याची शक्यता नाही.

# एनजीओ का वाढताहेत कशासाठी वाढताहेत...

भारतात स्वयंसेवी संस्था म्हणजे बिगर सरकारी संस्था म्हणजेच एनजीओ किती आहेत, याची एक अतिशय अवघड गिणती सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार देशातील सी.बी.आय. या गुप्तचर यंत्रणेने केली आहे. अनेक बाबतीत यापूर्वी अपयशी ठरलेली ही संस्था एनजीओ मोजण्याच्या बाबतीत मात्र यशस्वी ठरली आहे, असेच म्हणावे लागेल. जी कामे सरकार करू शकत नाही, ज्या गोष्टीत सरकार विशेष लक्ष घालू शकत नाही, ज्या कल्याणकारी योजनांत सरकार कमी पडते, अशा ठिकाणी पदरमोड आणि वेळमोड करून काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांची आपल्या देशात एक दीर्घ परंपरा आहे. समाज बदलण्यासाठी डोंगराएवढे काम अनेक स्वयंसेवी संस्थांनी करून ठेवले आहे. आजही समाज या कामाचा लाभार्थी आहे. शिक्षण, आरोग्य, शेती, जातिनिर्मूलन, स्त्री-पुरुष भेद, वेगवेगळ्या कारणांसाठीचे पुनर्वसन आदी विविध क्षेत्रांत या एनजीओंनी उमटवलेल्या पाऊलमुद्रा आजही आपल्याला दिसतात किंवा सांगता येतात. स्वातंत्र्यानंतरच्या काही वर्षांत एनजीओंची संख्या वाढू लागली. जागतिकीकरणाच्या काळात त्यांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली. असे म्हणता येईल, की अगोदर एनजीओ तयार करण्यात आले आणि जागतिकीकरण, खासगीकरणासाठी त्यांची मदत घेण्यात आली. अतिशय अत्याधुनिक आणि राज्य-राष्ट्रांशी टक्कर देतील, अशा एनजीओ निघाल्या. महाराष्ट्रात वीज क्षेत्रात खासगीरीतीने उतरू पाहणारी 'एन्रॉन' हीसुद्धा एनजीओच होती. तीही आर्थिकदृष्ट्या एखाद्या देशापेक्षा सक्षम होती. मोठमोठ्या एनजीओ एखाद्या देशाची नैसर्गिक साधन संपत्ती आणि कल्याणकारी योजना नव्या भांडवलशाहीकडे सोपवण्याच्या कार्यात शिडीप्रमाणे मदत करतात. त्यासाठी सरकार दुबळे करण्याचे काम असो, ते बदनाम करत अविश्वासू बनवण्याचे काम असो, सारे काही या एनजीओ जनतेचा विश्वास संपादन करून आणि जणू काही त्यांच्याच हितासाठी हे चालले आहे, असे सांगत मोठ्या चातुर्याने हे काम करत होत्या आणि आहेत. भांडवलशाहीच्या हातात आपल्या देशाची साधन संपत्ती देणाऱ्या काही राष्ट्रप्रमुखांचे अपघाती मृत्यू कसे झाले आणि ते कोणी घडवले, यावर एनजीओच चालवणाऱ्या पार्कीन यांनी एका आर्थिक गुन्हेगाराचा कबुलीजबाब (द कन्फेशन ऑफ ॲन इकॉनॉमिक हिट मॅन) या ग्रंथात पुराव्यानिशी प्रकाश टाकला आहे.

नव्या एनजीओचे मुख्यालय स्वित्झर्लंड या श्रीमंत देशात आहे आणि तेथे या संस्थांची कार्यपद्धती आणि रणनीती ठरवली जाते. जगभर ती पोहोचवली जाते. सरकारची साधनसामग्री मग ती नैसर्गिक किंवा कमावलेली असेल ती भांडवलशाहीच्या हातात देणे, सरकारला कल्याणकारी राष्ट्रातून मुक्त करून ती एनजीओकडे सोपवणे, भांडवलशाहीने कंपन सोशल वेल्फेअरसारख्या कल्पना राबवून समान सेवेचे व्रत स्वतःच्या हातात घेणे, सबसिडीराजऐवजी स्पर्धाराज तयार करण्यास मदत करणे आणि भांडवलशाहीने आपणच जन्माला घातलेल्या आणि महाकाय बनवलेल्या एनजीओंना पैशाची अंघोळ घालणे, अगदी तळापर्यंत त्यांचे जाळे विणणे, समर्पितऐवजी पगारी कार्यकर्ते तयार करणे, आदी काही सूत्रे जागतिकीकरणात जन्माला घालण्यात आलेल्या एनजीओंमागे आहेत. पैसा योग्य मार्गाने आणणे आणि त्याचा समाजासाठी खर्च दाखवणे एनजीओमुळे सोपे होते. अध्यात्म आणि दहशतवादी क्षेत्रातही एनजीओचे पीक आले. जगभरातून पैशाचा ओघ या संघटनांमध्ये सुरू होता. काही वेळा राष्ट्र आणि धर्मविरोधी कारवाया करण्यासाठीही याचा उपयोग केला जात होता. पुढे काही राष्ट्रांत अशा एनजीओ बंद करण्यात आल्या; पण कल्याणकारी सोंग घेऊन जन्माला येणाऱ्या एनजीओंची संख्या काही कमी झालेली नाही.

तर सीबीआयने जो सर्वोच्च न्यायालयाला अहवाल सादर केला त्यात भारतात एनजीओंची संख्या एकतीस लाख आहे. नोंदणी न केलेल्या, नोंदणी करूनही निष्क्रिय असलेल्या संस्थांची त्यात भर टाकली, तर ही संख्या कोटीच्या कोटी उड्डाणे घेईल. ज्या ३१ लाख सीबीआयच्या संशोधनात आल्या त्यांच्या संख्येची तुलना शाळा, दवाखाने आणि पोलिसांच्या संख्येशी केल्यास आणखी भयावह चित्र निर्माण होते. ३१ लाखांहून अधिक एनजीओ असलेल्या देशात शाळांची संख्या १५ लाख, मोठ्या इस्पितळांची संख्या ११ हजार ९९३, पोलिसांची संख्या १७ लाख, तर एनजीओंची संख्या ३५ लाख आहे. प्राथमिक आणि पायाभूत क्षेत्रात काम करणाऱ्या सरकारी संस्थांपेक्षा यांची संख्या कुठे दुप्पट तर कुठे चारपट आहे. विशेष म्हणजे, ही संख्या फक्त एकतीस राज्यांतील आहे आणि राज्यातील एनजीओ मिसळल्यास आकडा आणखी फुगेल. एनजीओंच्या जन्मदात्यांमध्ये उत्तर प्रदेश सर्वांत आघाडीवर (५ लाख ८५ हजार), तर महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर (५ लाख १८ हजार) आहे. त्यानंतर केरळ, दिल्ली असा क्रम लागतो. मुंबईत नोंदणीकृत आणि नोंदणीबाह्य एनजीओंची गणती केल्यास प्रत्येक आठ-दहा माणसांमागे एक एनजीओ सापडते. असाच आकडा फुगत गेल्यास एक दिवस असा येईल, की इथल्या देव-देवता आणि धर्मस्थळांपेक्षा एनजीओंची संख्या वाढलेली राहील. गेल्या काही वर्षांत परिवर्तनाच्या, सामाजिक, कामगार आणि अन्य चळवळी क्षीण का झाल्या, याचे एक कारण या एनजीओंच्या महाकाय संख्येतही सापडते. चळवळमुक्त, लोककल्याणकारीमुक्त, नैसर्गिक साधनसामग्रीमुक्त देश घडवल्याशिवाय भांडवलशाही नीट बागडू शकत नाही. तिच्यासाठी मैदान करण्याचे काम एनजीओ करत आल्या आहेत. अर्थात, याला काही चांगले अपवाद असणाऱ्याही एनजीओ आहेतच. •••

**- पंक्चरवाला**

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2020-22
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

